(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

<u>नियम 289 अन्वये प्रश्नोतराचा तास स्थगित करण्याबाबत.</u>

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी आपल्याकडे म.वि.प. नियम 289 अन्वये नियम स्थगित करण्याबाबतची सूचना दिलेली आहे. काल दिनांक 25 मार्च 2007 रोजी लातूर जिल्ह्यातील वांजरवाडी येथील शेतकरी श्री.नागनाथ आरदवाड यांनी माननीय मुख्यमंत्र्यांच्या साखर कारखान्याला वारंवार विनंती करुनही ऊस उचलला नाही म्हणून शेतातील ऊसाच्या बांधावरील चिंचेच्या झाडाला गळफास लावून आत्महत्या केली. हा शेतकरी 32 वर्षाचा होता. यापूर्वी सुध्दा माननीय मुख्यमंत्र्यांच्या साखर कारखान्याकडून ऊस तोडला जात नाही म्हणून गंगापूर येथील एक तरुण शेतकरी श्री. खुदारी यांनी सुध्दा गळफास लावून आत्महत्या केली. कालपासून दोन शेतकऱ्यांच्या आत्महत्या झालेल्या आहेत. विदर्भामध्ये सुध्दा काल 9 शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. त्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत- श्री.अंकुश लटाला, अकोला, नामदेव टाक-अकोला, बबन निभटे-वाशिम, रमेश निमामे-वाशिम, सुरेश कदम, वर्धा, देशवट्टीवार-यवतमाळ, टिकराम थुटूरकार-नागपूर, प्रभाकर काळे- वर्धा आणि भगवंतराव फुंडकर- अमरावतीया शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. 2007 मध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्या कमी होत जातील असे माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते. परंतु 2007 सुरु झाल्या झाल्या पहिल्या तीन महिन्यात जवळपास 230 शेतकऱ्यांनी आत्म्हत्या केलेल्या आहेत. या अगोदर कापूस उत्पादक शेतकरी आत्महत्या करीत होते, आता ऊस उत्पादक शेतकरी सुध्दा आत्महत्या करायला लागले आहेत. माननीय पंतप्रधानांनी पॅकेज जाहीर केले. परंतु या पॅकेजचा कोणताही लाभ शेतकऱ्यांना मिळालेला नाही म्हणून शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे सत्र सुरु आहे. तेव्हा माझी आपणास विनंती आहे की, कामकाजपत्रिकेतील सर्व कामकाज बाजूला ठेवून या विषयावर ताबडतोब चर्चा घ्यावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी गेल्या आठवड्यातच ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या संदर्भात अत्यंत गांभीर्याने येथे विषय मांडला होता. त्यावर माननीय मुख्यमंत्र्यांनी आम्हाला आश्वासन दिले होते की, या संदर्भात आम्ही योग्य ती काळजी घेऊ. आपल्या निदेशामुळे माननीय सहकार मंत्र्यांना येथे निवेदन करावे लागले. त्यांनी केलेल्या निवेदनात नवीन असे काही नव्हते. सभागृहाचे कामकाज संपत असताना माननीय सहकार मंत्र्यांनी निवेदन केले. त्यांचे निवेदन ऐकून मी त्याचवेळी सांगितले होते की, या निवेदनामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबणार नाहीत. मराठवाड्यात आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या घरी मी जाऊन आलो आहे. ती व्यथा मी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेत मांडली होती.

यानंतर श्री.रोझेकर.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

मोठया प्रमाणावर आत्महत्यांचे सत्र सुरु झाले आहे. विदर्भामध्ये, मराठवाडयामध्ये शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. परंतु, आता हे सर्व विस्ताराने मांडण्यापेक्षा प्रश्नोत्तराचा तास व इतर सर्व कामकाज बाजूला सारुन या विषयावर तातडीने चर्चा करण्याची आमची इच्छा आहे. महाराष्ट्रातील मराठवाडा व विदर्भातील शेतक-यांच्या आत्महत्या हा अतिशय महत्वाचा आणि गंभीर प्रश्न आहे. आत्महत्या कमी झालेल्या आहेत, असा दावा करणा-या माननीय मुख्यमंत्र्यांना, त्यांचा दावा खोटा असून आता शेतकरी त्यांच्या दाव्यावर जगू शकत नाहीत, अशी जी परिस्थिती निर्माण झाली आहे, हे सांगण्याची आमची इच्छा आहे. हा विषय आता कोणा एकाचा राहीला नसून तो सर्वांचा आहे. जे जे आमदार ग्रामीण भागातून निवडून आलेले आहेत त्या सर्वांच्या जिव्हाळयाचा विषय आहे. त्यामुळे तातडीने या विषयावर चर्चा सुरु करावी, अशी आपल्या माध्यमातून सरकारला विनंती करतो. यासंदर्भातील सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन सरकारने चर्चेला तयार व्हावे, अशी आपल्या माध्यमातून माझी विनंती आहे. त्यामुळे आजच्या कार्यक्रम पत्रिकेवरील कोणतेही कामकाज चालविण्यापेक्षा शेतक-यांच्या आत्महत्येसारख्या गंभीर विषयावर तातडीने चर्चा सुरु करावी, अशी विनंती करतो आणि थांबतो.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते, श्री.पांडुरंग फुंडकर, शिवसेनेचे नेते, या सभागृहाचे ज्येष्ठ सदस्य, श्री.दिवाकर रावते यांनी शेतक-यांच्या आत्महत्येबाबतचा विषय येथे मांडला आहे. यासंदर्भातील दोन धटना माझ्यासमोर आहेत. पहिली म्हणजे, सन्माननीय मुख्यमंत्री असे म्हणतात की, शेतक-यांच्या आत्महत्येचे प्रमाण खूप कमी इ ालेले आहे. आणि दुसरी घटना म्हणजे सन्माननीय अर्थमंत्री असे म्हणतात की, ही सर्व परिस्थिती असतांना सुध्दा लोकांनी आम्हाला मतदान केले आणि आम्ही निवडून आलो, याचा अर्थ आमच्या कारभारावर सगळी जनता सुखी-समाधानी आहे. या दोन संदेशांमधून असा अर्थ निघतो की, आत्महत्या झालेल्या असल्या तरी सर्व जनता सुखी-समाधानी आहे. परंतु, जनतेचे म्हणणे असे आहे की, शेतक-यांना जगणे असहय झालेले असल्यामुळे आत्महत्येशिवाय त्यांच्याकडे दुसरा पर्याय राहिलेला नाही. अशाप्रकारे विरोधाभास दाखविणा-या घटना आपल्यासमोर घडल्या आहेत.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार.....

सभापती महोदय, लातूर येथे घडलेली घटना तर आणखी भयानक आहे. कोण कोणत्या समाजाचा आहे, हा महत्वाचा प्रश्न नाही. आम्हाला अशी माहिती मिळाली आहे की, माननीय मुख्यमंत्र्यांच्या कुटुंबातील एक सदस्य हे संबंधित कारखान्याचे अध्यक्ष आहेत, बहुदा मुलगाच आहे, आणि त्यांनी त्या शेतक-याला असे उत्तर दिले की, तुम्ही 'रेड्डी' आहात आणि त्या भागात भारतीय जनता पक्षाचा उमदेवार निवडून आला आहे, काँग्रेसचा उमेदवार निवडून आला नाही. भारतीय जनता पक्षाच्या उमेदवाराला निवडून दिलेल्या लोकांचा ऊस घेतला जाणार नाही, असे स्पष्टपणे म्हटले नसले तरी त्यांच्या बोलण्याचा मतितार्थ तसाच होता. म्हणून जगून उपयोग नाही, कुटुंबाचे पालनपोषण करणे शक्य होणार नाही, अशी टोकाची भूमिका घेतलेल्या शेतक-यापुढे एकच पर्याय असतो, तो म्हणजे स्वत:चे जीवन संपविण्याचा आणि हाच पर्याय स्वीकारुन त्या शेतक-याने चिंचेच्या झाडाला गळफास लावून आत्महत्या केली. यामुळे माननीय मुख्यमंत्र्यांच्या मुलाला समाधान मिळाले का ? असा माझा सवाल आहे.

सभापती महोदय, विदर्भामध्ये आठ शेतक-यांनी आत्महत्या केल्याबाबतची बातमी मी वृत्तपत्रात वाचली. वृत्तपत्र हे माध्यम असे आहे की, आमच्यापर्यन्त योग्य बातम्या पोहोचविण्याचे काम करते. इलेक्ट्रॉनिक माध्यमाकडून याबाबतची बातमी कशी दिली जाईल, हे सांगता येणार नाही. कारण, 'क्रिकेट वर्ल्डकप' हा विषय इलेक्ट्रॉनिक माध्यमाकडून ज्याप्रकारे प्रसारित करण्यात आला त्यामुळे भारतीय खेळाडू आपल्या घरी जाण्यास देखील घाबरत आहेत. राज्यातील ग्रामीण भागातील शेतकरी आत्महत्या करीत आहेत तर भारतीय क्रिकेट खेळाडू आपल्या घरी जाण्यास घाबरत आहेत, मात्र, राज्यातील कायदा व सुव्यवस्था योग्य आहे, अशा प्रकारचे निवेदन राज्याचे गृहमंत्री, श्री.आर.आर.पाटील करीत आहेत. या सगळयाचा मेळ कसा घालायचा यासाठी या विषयावर चर्चा व्हावी, शासनाने ती मान्य करावी, अशी आमची मागणी आहे. या प्रश्नावर उत्तर शोधण्यासाठी आम्ही अशी मागणी केली आहे की, नियम 289 नुसार प्रश्नोत्तराचा तास स्थगित करावा. शेतक-यांच्या जीवनमरणाशी निगडित असा हा प्रश्न आहे, हा प्रश्न हातामध्ये घेऊन त्यावर चर्चा घ्यावी, अशी आपल्याला विनंती आहे. तेव्हा, सहानुभूतिपुर्वक विचार करुन शेतक-यांच्या जीवनमरणाशी निगडित अशा या प्रश्नावर चर्चा मान्य करावी, अशी या सदनाला आणि आपल्याला विनंती आहे.

यानंतर कुमारी जयश्री.....

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल : महोदय, माननीय मुख्यमंत्री साहेबांच्या मुलाच्या " इंडो शुगर्स " या शुगर फॅक्टरीच्या सरव्यवस्थापकास तेथील स्थानिक शेतक-यांनी 20 मार्च,2007 रोजी दिलेले हे निवेदन मी सभागृहात वाचून दाखवित आहे.

श्री.दिवाकर रावते : सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेलजी ज्या वेळी सभागृहामध्ये या विषयावर चर्चा उपस्थित करण्यात येईल, त्यावेळी आपण सदर निवेदन वाचून दाखवावे.

श्री.पाशा पटेल : महोदय, श्री.नागनाथ आदरवाड या शेतक-यांने समस्त गावक-यांच्या वतीने एक निवेदन देऊन आत्महत्या केलेली आहे.

श्री.अरविंद सावंत : सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेलजी हे निवेदन आपण नंतर वाचावे.

श्री.पाशा पटेल : श्री.नागनाथ आदरवाड यांनी दिनांक 20 मार्च,2007 रोजी वैतागून कुटुंबियांसमवेत आत्महत्या केलेली आहे. " इंडो शुगर्स " या कारखान्याच्या एम.डी.ला स्थानिक गावक-यांनी व उक्त शेतक-याने निवेदन दिलेले होते, एवढेच नव्हे तर मृत शेतकरी श्री.आदरवाड याने आपल्या सर्व नातेवाईक मंडळींना एस.एम.एस. करुन नंतर आत्महत्या केलेली आहे. आदरवाड या कुटुंबातील पहिली आत्महत्या दिनांक 20 मार्च,2007 रोजी व दुसरी आत्महत्या दिनांक 25 मार्च,2007 रोजी झाली आहे. यापूर्वी या सभागृहात यासंदर्भात चर्चा उपस्थित करण्यात यावी, अशी मी विनंती केली होती. अतिरिक्त ऊसाच्या संदर्भामध्ये जर सरकारने लवकर निर्णय घेतला नाही तर या आत्महत्या वाढणारच आहेत. श्री.नागनाथ आदरवाड या शेतक-याचे वय वर्ष होते 32 आणि त्याला दोन मुले आणि एक मुलगी अशी अपत्ये होती, याच्या कुटूंबियांनी आता काय करावयाचे ? हा अतिशय तातडीचा आणि गंभीर प्रश्न असून, या विषयावर तातडीने चर्चा उपस्थित करण्यात यावी, अशी मी आपल्या माध्यमातून या सभागृहाला विनंती करतो.

श्री.दिवाकर रावते : महोदय, सदर चर्चा आता उपस्थित करण्यात यावी, अशा प्रकारचा एक फॅक्स आताच मला प्राप्त झालेला आहे. या विषयावर चर्चा सुरु करण्याचे आपण ताबडतोब आदेश द्यावेत, अशी मी आपल्याला विनंती करतो.

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : सन्माननीय सभागृहाचे विरोधी पक्ष नेते श्री.भाऊसाहेब फुंडकर यांनी जो प्रस्ताव या ठिकाणी मांडलेला आहे, त्यावर चर्चा उपस्थित करण्यास काही हरकत नाही कारण तो अतिशय तातडीचा आणि गंभीर अशा स्वरुपाचा प्रश्न आहे.

श्री.दिवाकर रावते : सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी हे सरकार आहेत का ?

C - 2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

आम्हाला सरकारचेच निवेदन पाहिजे.

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सदर विषयावर चर्चा उपस्थित करावयास आमची हरकत नाही, परंतु प्रश्नोत्तराचा तास पूर्ण होऊ द्या.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, चर्चेकरिता आपण निर्देश द्यावेत.

(गोंधळ)

उपसभापती : सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे.

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, हा प्रश्न खरोखर अतिशय महत्वाचा आहे, सदर विषयावर प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर कोणत्यातरी दुस-या आयुधाच्या माध्यमातून चर्चा उपस्थित करण्यात यावी. आमची काहीही हरकत नाही.

श्री.विनोद तावडे : सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर,सन्माननीय सदस्य सर्वश्री.दिवाकर रावते, पाशा पटेल, यांनी जो विषय मांडलेला आहे. आय.बी.एन.सेव्हन या वाहिनीवर माननीय मुख्यमंत्री साहेबांच्या " इंडो शुगर्स " या कारखान्याबद्दल व शेतक-यांच्या आत्महत्येबाबत त्यांच्या नातेवाईकांकडून जे सांगितले जात आहे, ते अतिशय गंभीर आहे. माननीय मुख्यमंत्री हे राज्याचे प्रमुख आहेत, त्यांच्या मुलाच्या कारखान्यात जर हे असे होत असेल तर त्याचे गांभीर्य लक्षात घेतले पाहिजे.

उपसभापती : प्रथम प्रश्नोत्तराचा तास होऊ द्यावा, त्यानंतर आपण सदर प्रश्नावरील चर्चा उपस्थित करण्याबद्दलचा निर्णय घेऊ.

यानंतर श्री.बोरले..

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखापाठी नाही

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे.

पुण्यांमध्ये पोलिसांनी अति सावध राहण्याचा दिलेला इशारा

(३) * २४३९१ डॉ. निलम गोऱ्हे , श्री. गोविंदराव आदिक , श्री. संजय दत्त , श्री. जैनुद्दीन जव्हेरी, श्री. धनाजी साठे , श्री. रमेश निकोसे : सन्माननीय उप मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बंगळूर येथे अटक करण्यात आलेला काश्मिरी अतिरेकी याने पुण्यातील स्थानिक अतिरेक्यांकडून शस्त्रास्त्रे घेतल्याची कबूली दिल्याने पुणे शहरात रेड अलर्ट जारी करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पकडण्यात आलेल्या काश्मिरी अतिरेक्यांकडून मोठ्या प्रमाणावर दारु गोळा व शस्त्रास्त्रे जप्त करण्यात आली आहे, हे खरे काय,

(३) असल्यास, पुण्यातील अतिरेक्यांना शस्त्रास्त्रे पुरविण्याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचा निष्कर्ष काय आहे ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता : (१) बंगळूर पोलिसांकडून बंगळूर येथे अटक करण्यात आलेल्या काश्मिरी अतिरेक्याबाबत माहिती बंगळूर पोलिसांशी संपर्क साधून प्राप्त करण्यात आली. त्यानुसार सदर अतिरेक्याने राजेश (पूर्ण नाव, पत्ता माहिती नाही) नावाच्या व्यक्तीने त्याला शस्त्रास्त्रे दिल्याचे सांगितले. राजेश ही व्यक्ती पुण्यातील स्थानिक आहे किंवा कसे याबाबत अद्याप माहिती मिळालेली नाही. अतिरेक्यांचे लक्ष हे महत्वाचे आय.टी.उद्योग क्षेत्र व विमान तळ असल्याबाबत विविध गुप्तचर संस्थांकडून मिळालेल्या माहितीमुळे पुणे शहरातील सर्व पोलीस ठाणे व अधिका-यांना सतर्क करण्यात आले आहे व सुरक्षाविषयक सर्व सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच अतिरेक्यांची संभाव्य आश्रयस्थाने, हॉटेल्स/लॉजेस इत्यादी चेक करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

(२) बंगळूर पोलिसांनी दि.५.१.२००७ रोजी अटक आरोपी इम्रान जलाल ऊर्फ बिलाल अहमद कोटा ऊर्फ सलीम ऊर्फ हादी याचे अंगझडतीत दोन रेक्झीन बॅगा, १ एके-४७ रायफल, २ मॅगझीन, ५ हॅन्डग्रेनेड, २०० जीवंत काडतुसे,१ सॅटेलाईट फोन, २ नोकिया मोबाईल हँडसेट जप्त केले आहेत. त्याचे चौकशीत हॉस्पेट येथील त्याचे घरझडतीत १ एके-४७ रायफल, २ मॅगझीन, ५ हँडग्रेनेड, २०० जीवंत काडतुसे, १ सॅटेलाईट फोन चार्जर अशी शस्त्रास्त्रे जप्त केली आहेत.

(३) व (४) होय. अतिरेकी विरोधी विभाग व गुन्हे शाखा यांचे माध्यमातून बंगळूर पोलिसांकडून अधिक माहिती घेण्यात आली आहे व चौकशी करण्यात आली आहे. सदर चौकशीत निष्पन्न झाले आहे की, सदर अतिरेकी नामे इम्रान जलाल ऊर्फ बिलाल अहमद कोटा ऊर्फ सलीम ऊर्फ हादी हा दि.६.११.२००६, दि.१४.११.२००६, दि.२०.१२.२००६ आणि पुन्हा दि.२६.१२.२००६ रोजी पुण्यामध्ये येऊन राहून गेला आहे. दि.२६.१२.२००६ रोजी राजेश नावाच्या व्यक्तीने त्यास स्वारगेट जवळ २ रेक्झीनच्या बॅगा दिल्या. त्या बॅगांमध्ये एके-४७ रायफल व शस्त्रास्त्रे होती. सदर राजेश नावाच्या व्यक्तीचा शोध अतिरेकी विरोधी विभाग व गुन्हे शाखा पुणे शहर यांचे मार्फत कसून करण्यात अला परंतु तो मिळाला नाही. अधिक चौकशी चालू आहे.

..२....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.२४३९१ .....

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, मागच्या आठवडयामध्ये हा प्रश्न राखून ठेवण्यात आला होता. सुधारित उत्तरासह आज हा प्रश्न सभागृहामध्ये चर्चेला आलेला आहे. माझा प्रश्न असा आहे की, पुण्यामध्ये रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे काय ? कोणत्या प्रकारच्या उपयायोजना करण्यात आल्या आहेत, याबाबत उत्तरामध्ये माहिती देण्यात आलेली आहे. सभापती महोदय, सॅटेलाईट फोन ही सहजासहजी मिळणारी गोष्ट नाही. रेड अलर्ट कोणत्या परिस्थितीमध्ये जाहीर केला जातो ? पुण्यामध्ये अरुणकुमार वैद्य यांची हत्या झाल्यापासून अतिरेक्यांनी त्यांचा मोर्चा मुंबईकडे वळविला आहे. बंगलोर पोलिसांना धागेदोर सांपडल्यानंतर त्याचा पुण्याशी काय संबंध आहे, हे प्रश्नाला दिलेल्या लेखी उत्तरावरुन आमच्या लक्षात आलेले आहे. रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे काय, आताची परिस्थिती काय आहे आणि आता हे अतिरेकी कोठे आहेत ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, जलील नावाच्या लष्कर-ए-तोयबाच्या अतिरेक्याला बंगलोर पोलिसांनी अटक केलेली आहे. त्या अतिरेक्याने पुण्यातील राजेश नावाच्या व्यक्तीकडून शस्त्रास्त्रे घेतल्याचे बंगलोर पोलिसांना जबानीमध्ये सांगितलेले आहे. त्या दृष्टीने तपास करण्यात आला आहे. राजेश नावाची व्यक्ती पुण्यातील नाही. ती पुण्याबाहेरची व्यक्ती आहे. पुण्यातील आय.टी.पार्क आणि महत्वाच्या स्थळांवर पोलीस बंदोबस्त वाढविण्यात आला आहे. या प्रकरणासंबंधी वर्तमानपत्रामध्ये बातमी आली होती. दिनांक 24.03.2007 रोजी त्या अतिरेक्याला बंगलोर पोलिसांनी ए.टी.एस.कडे सोपविलेले आहे.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, पुण्यामध्ये रेड अलर्ट जारी केला आहे काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, पुण्यामध्ये रेड अलर्ट जारी केलेला नाही. पुण्यातील आय.टी.पार्क आणि महत्वाच्या स्थळांवर पोलीस बंदोबस्त वाढविण्यात आला आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझा माननीय मंत्री महोदयांना असा प्रश्न आहे की, इंटरनेटवर "गुगल अर्थ" नावाची वेब साईट आहे. त्या वेब साईटवर मुंबईतीलच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील मोक्याची ठिकाणे दाखविलेली आहेत. आपण या वेब साईटवरुन सांताक्रुझ एअर पोर्ट, बी.ए.आर.सी. अशी महत्वाची ठिकाणे बघू शकतो. एअर पोर्टच्या कंपाऊंडसमोर उभी असलेली गाडी सुध्दा आपल्याला या वेब साईटवरुन बघता येते. इंटरनेटवर अशी वेब साईट

..3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.२४३९१ .....

डॉ.दीपक सावंत .....

उपलब्ध आहे, याची शासनाला माहिती आहे काय, आणि असल्यास शासन त्या वेब साईटवर बंदी आणणार काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, वेब साईटसंबंधी पोलिसांकडे माहिती उपलब्ध नाही. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी जी माहिती सांगितली त्या माहितीच्या आधारे तपास करण्यात येईल आणि इंटरनेटवर अशी वेब साईट उपलब्ध असल्यास त्यावर बंदी घातली जाईल.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मी दिलेली माहिती सत्य आढळून आली तर माननीय गृह राज्यमंत्री त्या वेब साईटवर बंदी घालतील काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, इंटरनेटवर अशा प्रकारची वेब साईट आहे किंवा नाही याची पोलिसांकडे माहिती उपलब्ध नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या वेब साईटसंबंधी संपूर्ण महाराष्ट्राला माहिती आहे. गृह विभागाला या वेबसाईटसंबंधी माहिती नाही काय ? ही वेब साईट सर्व जगभर सुरु आहे.

यानंतर श्री.गागरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी शांतता राखावी, मी सभापतीस्थानी बसलो आहे याचे त्यांनी भान ठेवावे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मला सभागृहात सांगावयाचे आहे की, " गुगल अर्थ " नावाची एक वेबसाईट आहे व सरकारला या वेबसाईटची माहिती नाही. सरकारकडे ही माहिती नसेल तर तसे सभागृहाच्या रेकॉर्डवर आले पाहिजे. मंत्री महोदयांनाही वेबसाईटचे नाव माहिती नाही, हे समजले तर मंत्री महोदयांची बेइज्जती होईल, हे कृपया लक्षात घ्यावे. माझ्या मते सरकारला हे माहिती नाही असे असू शकत नाही. ही वेबसाईट बंद करणे महाराष्ट्र शासनाच्या हातात नाही, त्यामुळे मंत्री महोदयांनी त्यांचे वक्तव्य मागे घ्यावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या कामासंबंधी जे अधिकारी नेमले आहेत, त्यांना निलंबीत करण्यात यावे.

उपसभापती : सभापती महोदय "गुगल अर्थ" या वेबसाईटवर सर्व महत्वाच्या ठिकाणांची माहिती उपलब्ध आहे अशी सभागृहात चर्चा चालू आहे, असे असेल तर ही महत्वाची ठिकाणे या वेबसाईटवर दिसू नयेत यासाठी सरकारतर्फे प्रयत्न केले जात आहेत.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, अणुभट्टी, संशोधन केंद्र इत्यादी महत्वाची ठिकाणे या वेबसाईटवर दिसत असतील तर ती दिसून नयेत म्हणून प्रयत्न केले जातील.

(गोंधळ)

उपसभापती : मंत्री महोदयांकडे या प्रश्नाचे उत्तर नसेल तर त्यांनी वेळ मागवून घ्यावी. मंत्री महोदयांनी तशी विनंती केल्यास मी हा प्रश्न राखून ठेऊ शकतो.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, या प्रश्नावर यापूर्वीही चर्चा झालेली आहे. तरीही मी सांगतो की, "गुगल अर्थ" या वेबसाईटवर महत्वाच्या ज्या ठिकाणांची माहिती उपलब्ध आहे, ती यापुढे दिसणार नाही याची काळजी घेण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी पुन्हा विचारतो की, यासाठी कोणते प्रयत्न केले जाणार आहेत. ?

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ KTG/ KGS/

ता.प्र.क्र.24391.....

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, महत्वाची ठिकाणे व अणुभट्टया आहेत, त्या "गुगल अर्थ" या वेबसाईटवर दिसू नयेत म्हणून प्रयत्न करण्यात येतील.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, "गुगल अर्थ" वेबसाईटर जी महत्वाची ठिकाणे दाखविण्यात आलेली आहेत ती दिसू नयेत म्हणून शासन नेमके कोणते प्रयत्न करणार आहे? या प्रश्नाचे उत्तर सभागृहाला हवे आहे. महत्वाची ठिकाणे वेबसाईटवर दिसून नयेत म्हणून आपण कोणती टेक्नॉलॉजी वापरणार आहात ? जगभर उपलब्ध असलेली "गुगल अर्थ" ही वेबसाईट तुम्ही कशी बंद करणार आहात ?

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, महाराष्ट्र सरकारच्या अखत्यारीत ही बाब येत नसली तरी केंद्र सरकारला याबाबत विनंती करून ज्या मोक्याच्या जागा आहेत की ज्या अतिरेक्यांचे लक्ष्य होऊ शकतात, त्या बंद करण्याबाबत वा त्या दिसू नयेत या दृष्टीने व्यवस्था करण्याबाबत गुगल साईटला सूचना वा ताकीद देण्यात येईल.

उपसभापती : मी आता पुढील प्रश्न पुकारतो ...

काही सन्माननीय सदस्य : सभापती महोदय, आम्हाला यावर आणखी उपप्रश्न विचारावयाचे आहेत. ...

उपसभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, प्रश्नोत्तराच्या तासामध्ये एका प्रश्नाला किती वेळ द्यावा यालाही काही मर्यादा आहेत. यापुढे देखील अजून बऱ्याच सन्माननीय सदस्यांचे प्रश्न आहेत. तेव्हा मी फार तर एकच उपप्रश्न विचारण्यास संधी देईन. सन्माननीय सदस्य श्री. अनिल परब यांना मी प्रश्न विचारण्याची संधी देत आहे.

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, आज हे सर्वज्ञात आहे की, मुंबईमध्ये बाहेरून शस्त्रास्त्रे येतात तसेच मुंबई आणि परिसरातील आयटी पार्क्स आणि विमानतळ हे अतिरेक्यांनी लक्ष्य केलेले आहे. पण अजूनही आपण यातील एक आरोपी, ज्याचे नाव 'राजेश' आहे असे समजले आहे तो कोण आहे याचा छडा लावू शकलो नाही. तेव्हा किती दिवसात याचा छडा आपण लावणार आहात आणि त्याला पकडण्याच्यादृष्टीने काय कारवाई करणार आहात ?

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, या प्रकरणामध्ये लष्कर-ए-तोयबाचा 'जलाल' नावाचा जो अतिरेकी सापडला आहे त्याला दिल्ली पोलिसांनी पकडले आहे आणि आता 24 तारखेला त्याला कोर्टाचा आदेश घेऊन आपण आपल्या ताब्यामध्ये घेतलेले आहे. त्यानंतर आज पुन्हा त्याला कोर्टात उभा करून त्याच्या कस्टडीमध्ये वाढ करवून घेऊन, 'राजेश' बाबत माहिती घेऊन त्याला पकडण्याच्या दृष्टीने कारवाई करण्यात येईल.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, 'इमरान' हा पुण्यामध्ये नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये दोन आठवडे राहून गेला होता, तेथे त्याने दोन आठवडे वास्तव्य केलेले होते. पुण्यामध्ये सीआयडीचे हेडक्वार्टर आहे, तेथे सीआयडीचे महासंचालक बसतात. तरीही या गोष्टीचा सुगावा सीआयडीला का लागला नाही ?

..... एफ 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, जलाल हा पुण्यामध्ये त्या काळात दोन वेळा नाही तर चार वेळा येऊन, राहून गेला आहे. 1.11.2006 ला तो आला होता आणि लगेचच दुसऱ्या दिवशी निघून गेला होता. हॉटेल मिलन, अमन लॉजमध्ये तो या काळात उतरत होता. 20.11.2006 ला आला होता आणि 21.11.2006 ला निघून गेला होता. या दोन महिन्यांच्या कालावधीमध्ये तो चार वेळा आला होता. तो रात्री येऊन सकाळीच निघून जात होता म्हणून त्याचा सुगावा लागला नव्हता.

****

..... एफ 3 ...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाचा विस्तार करण्याचा एसएसआरडीसी ने घेतलेला निर्णय

(1) * 24451 श्री. नितीन गडकरी, श्री. पांडुरंग फुंडकर, श्री. विनोद तावडे : तारांकित प्रश्न क्रमांक 23552 ला दिनांक 4 डिसेंबर, 2006 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम)मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) जून, 2006 ते सप्टेंबर, 2006 या कालावधीत मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाचा विस्तार करण्याचा निर्णय महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, मुंबई बाजूला कळंबोली पर्यंत असलेला द्रुतगती मार्ग मुंबईला भाभा अनुसंशोधन केंद्रापर्यंत वाढविण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय,
(3) असल्यास, सदर 25 कि.मी. चा रस्ता तयार करण्यासाठी सल्लागार कंपनीची नियुक्ती करण्यात आली आहे काय,
(4) असल्यास, कंपनीला सादर करण्यास किती मुदत देण्यात आली आहे वा येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

श्री.अनिल देशमुख : (1) शासनाने ऑक्टोबर, 2006 मध्ये सायन-पनवेल महामार्गाची सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे.
(2) वरीलप्रमाणे.
(3) सल्लागारास निविदा स्विकृतीपत्र देण्यात आले आहे.
(4) सल्लागारास अहवाल सादर करण्यास 150 दिवसांची मुदत देण्यात येत आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मुंबई-पुणे द्रूतगती मार्गाचा विस्तार करण्याचा निर्णय महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने घेतला आहे, हे खरे आहे काय ? असा प्रश्न आम्ही विचारता असता मंत्री महोदयांनी 'शासनाने ऑक्टोबर 2006 मध्ये सायन-पनवेल महामार्गाची सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे.' असे छापील उत्तर दिलेले आहे. सभापती महोदय, ऑक्टोबर 2006 मध्ये निर्णय शासनाने घेतला आहे आणि आज मार्च 2007 चालू आहे. परंतु अजूनही त्या रस्त्याचे काम सुरू झालेले नाही. त्यानंतर तिसरा प्रश्न आम्ही असा विचारला होता की, सदर 25 कि.मी.चा रस्ता तयार करण्यासाठी सल्लागार कंपनीची नियुक्ती करण्यात आली आहे काय ? त्यावर उत्तर देताना येथे म्हटले आहे की, 'सल्लागारास निविदा स्वीकृतीपत्र देण्यात आले आहे. तेव्हा त्यावर माझा उपप्रश्न असा आहे की, हे सल्लागार कोण आहेत आणि त्यांची यासाठी किती एस्टिमेट दिलेले आहे आणि या सल्लागारास आपण अहवाल सादर करण्यासाठी 150 दिवसांची मुदत कशासाठी दिली आहे ?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, मुंबइ-पुणे प्रवासासाठी हा एक्स्प्रेस हायवे सुरू केला हे खरे आहे. परंतु त्याचबरोबर हा रस्ता करताना ..... (यानंतर श्री. सरफरे ...जी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 24451...

श्री. अनिल देशमुख...

कळंबोली ते बी.ए.आर.सी. हा एक्सप्रेस हायवे पनवेल येथे संपतो. परंतु पुढे मोठया प्रमाणावर वाहतुकीची कोंडी होते. ती दूर करण्यासाठी शासनाने कळंबोली फाटा ते बी.ए.आर.सी. पर्यंत 14 पदरी रस्ता तयार करण्याचा निर्णय घेतला आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी या कामाला उशीर कां झाला? असे विचारले. याचे कारण असे की, या कामाकरिता तीन वेळा टेंडर बोलाविण्यात आले. पहिल्या वेळेस मलेशिअन कंपनीने टेंडर भरले होते, परंतु त्या कंपनीने आवश्यक त्या अटी पूर्ण केल्या नाहीत. दुसऱ्या वेळेस भरण्यात आलेल्या टेंडरमध्ये 12 कोटींची किंमत सांगण्यात आली, ती किंमत जास्त असल्यामुळे ते टेंडर रद्द करण्यात आले. आणि तिसऱ्या वेळेस 1 कोटी 48 लाख रुपयांचे टेंडर स्टुप इंजिनिअरींग कंपनीने भरले. त्यामुळे या कंपनीला हे काम देण्यात आले. या कामाची वर्कऑर्डर 16 मार्च रोजी देण्यात आली. या कामाचा अभ्यास 5 महिन्याच्या आत करुन शासनाला अहवाल दिला जाईल. कळंबोली ते बी.ए.आर.सी. या रस्त्याची अंदाजे किंमत 700 कोटी रुपये रहाणार आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या कामाचा प्रस्ताव तयार करण्यासाठी 5 महिन्यांचा कालावधी लागणार आहे. या रस्त्याचे काम केव्हां सुरु होईल ? आणि सुरु झाल्यानंतर केव्हा पूर्ण होईल?

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मुंबई-पुणे वहातुकीच्या दृष्टीने अतिशय महत्वाकांक्षी प्रकल्प आहे. आपण पुण्याहून कळंबोलीपर्यंत सव्वा तासामध्ये येतो, परंतु पुढे मुंबईमध्ये येण्याकरिता आपल्याला तीन तास लागतात. बी.ए.आर.सी पासून सायनला येण्याकरिता आपण दुसरा पूल बांधणार आहात काय? या संपूर्ण प्रकल्पाकरिता शासनाला किती जमीन संपादित करावी लागणार आहे? तेवढी जमीन शासनाकडे उपलब्ध आहे काय? आपण 14 पदरी रस्ता करीत असतांना नव्या मुंबईमध्ये कॉंक्रिटचे जाळे पसरले आहे. हे लक्षात घेता हा प्रकल्प फिजिबल होईल यादृष्टीने आपण विचार केला आहे काय? प्रकल्पाकरिता प्रस्तावित करण्यात आलेली किंमत खर्च झाल्यानंतर ती रक्कम टोलच्या माध्यमातून वसूल करण्याकरिता आणखी किती वर्षे टोल वाढविण्यात येणार आहे?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, कळंबोली-बी.ए.आर.सी. हा चौदा पदरी रस्ता तयार करण्याकरिता 60 मीटर लांबीची जमीन आवश्यक असून ती जमीन शासनाकडे उपलब्ध आहे. त्याकरिता गावामधून जमीन संपादित करावी लागणार नाही. दुसरी बाब अशी की, बी.ए.आर.सी. ते सायनपर्यंत 8 कि.मी.चा रस्ता सुध्दा अतिशय महत्वाचा आहे. पुण्याहून पनवेलपर्यंत व पुढे बी.ए.आर.सी. पर्यंत आपण अधिक वेगामध्ये आल्यानंतर सायनपर्यंत तो वेग कायम ठेवण्याच्या दृष्टीने हा रस्ता होणे आवश्यक आहे. या संपूर्ण रस्त्याचे नियोजन एम.एम.आर.डी.ए. मार्फत केले जात आहे. कुलाबा ते मानखूर्द आणि चारकोप ते बांद्रापर्यंत 32 कि.मी. च्या रस्त्याचा प्रस्ताव एम.आर.टी.एस. ने तयार केला असून त्याचे टेंडर काढण्यात आले आहे. बी.ए.आर.सी. ते सायन पर्यंतच्या रस्त्याचा कामाचा अभ्यास केला जात आहे, त्यापध्दतीने एम.आर.टी.एस. च्या माध्यमातून इतका मोठा कशाप्रकारे करता येईल यादृष्टीने नियोजन केले जात आहे. कळंबोली ते बी.ए.आर.सी. पर्यंत 25 कि.मी. चा चौदा पदरीचा हा रस्ता अर्बन ॲक्सेस कंट्रोल रोड म्हणून भारतामध्ये प्रसिध्द होईल. चौदा पदरी रस्त्यांपैकी सहा पदरी तीन रस्ते अर्बन ॲक्सेस कंट्रोल रोड करणार आहोत. या रस्त्याच्या बाजूला जाळी लावून कळंबोलीपासून थेट बी.ए.आर.सी.पर्यंत जाता येईल. ज्यांना बाजूला जावयाचे असेल तर त्यांच्याकरिता रस्त्याच्या बाजूला उतरता येईल. अशाप्रकारे यू.ए.सी. रोड हा भारतातील सर्वात महत्वाचा रस्ता असून त्याचे काम डिसेंबरला सुरु करणार आहोत.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.24451 (पुढे सुरु...

उपसभापती : या कामासाठी 700 कोटी रुपये खर्च येणार आहे. तो खर्च एमएमआरडीसीमार्फत राबविणार आहात काय ? एमएसआरडीसीमार्फत राबविणार असाल तर प्रश्न असा आहे की, दोन महिन्यामध्ये एमएसआरडीसीने कित्येक कोटी रूपये लोकांकडून पैसे घेतलेले आहेत, संस्थांकडून पैसे घेतलेले आहेत ते देणे आहे. त्यांच्याकडे देणी देण्यासाठी पैसे नसतील तर ते महत्वाकांक्षी प्रकल्प कसे राबविणार आहे ?

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, या प्रश्नालाच जोडून माझा प्रश्न आहे. मुंबई पुणे रस्त्यासाठी सुरुवातीला टेंडर मागविले तेव्हा रिलायन्स कंपनीने प्रचंड मोठे टेंडर दिले होते. परंतु नंतर एमएमआरडीसीने आपली योग्यता सिध्द केली. माझे असे म्हणणे आहे की, एमएस आरडीसीच हा प्रकल्प का राबवू शकत नाही ?

उपसभापती : मी त्या कमिटीवर सदस्य म्हणून आहे त्यामुळे मला माहिती आहे. आदरणीय मुख्यमंत्री महोदय चेअरमन आहेत. एमएमआरडीऐमध्ये 15 दिवसापूर्वीच बैठक झाली. एमएसआरडीसीने एमएमआरडीसीऐला 150 कोटी रुपये द्यायचे होते त्यापैकी 50 कोटी रुपये दिलेले आहेत. महानगरपालिका आयुक्तांनी मिटिंगमध्ये सांगितले की, एमएसआरडीसी डिफॉल्टर आहे त्यामुळे एमएसआरडीला कोणतेही फंडस् देता येणार नाहीत. घेतलेले पैसे देण्याची क्षमता नसल्यामुळे एमएसआरडीसीला पैसे देण्याचे नाकारलेले आहे. अशा परिस्थितीमध्ये नेमके मोठे प्रकल्प एमएसआरडीसी कशाप्रकारे राबविणार आहे ?

श्री.अनिल देशमुख : एमएमआरडीऐकडून एमएसआरडीसीला 500 कोटी रुपये यावयाचे आहेत. त्या संदर्भात माननीय मुख्यमंत्री महोदयांना विनंती केली.

उपसभापती : एमएसआरडीसीने एमएमआरडीऐला पैसे देणे आहे.

श्री.अनिल देशमुख : एमएमआरडीऐने 500 कोटी रुपये देण्याचे मान्य केले होते.ती रक्कम एकदम न देता 100 कोटीप्रमाणे इन्स्टॉलमेंटने देण्याचे कबूल केलेले होते. त्याप्रमाणे त्यांना सूचना दिलेल्या आहेत. सायन ते कळंबोली या रस्त्याच्या कामासाठी 700 कोटी रुपये कोठून आणणार असा प्रश्न उपस्थित केला. या कामासाठी एकूण खर्च किती येणार आहेत याचा अभ्यास चालू आहे प्रत्यक्षात त्या कामाचे एस्टीमेट आल्यानंतर तो प्रकल्प 500 कोटीचा आहे की, 600 कोटीचा आहे ते कळेल. हा प्रकल्प बीओटी तत्वावर राबवायचा, की कॅश कॅन्ट्रॅक्टवर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KTG/ KGS/

ता.प्र.क्र.24451 (पुढे सुरु...

श्री.अनिल देशमुख (पुढे सुरु....

राबवायचा की ॲन्युअल कॉन्ट्रॅक्टवर राबवायचे हे ठरायचे आहे. बॉम्बे एन्ट्री पॉईन्टला सिक्युररायझेशन करावयाचे आहे. लेनचा काही भाग सोडून जाळी लावणार आहोत. म्हणजे ज्यांना डायरेक्ट जावयाचे असेल तर ते त्या लेनमधून जातील आणि ज्यांना बाजूला वळावयाचे असेल ते दुसऱ्या लेनमधून जातील. हा प्रकल्प 2008 पर्यन्त होईल. यामधून जे काही 1200-1300 कोटी रुपये उपलब्ध होणार आहेत. त्यामध्ये पेडर रोडच्या कामासाठी 200 कोटी रुपये उपलब्ध करुन देण्याचा एमएसआरडीसी विचार करत आहे.

यानंतर श्री.बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 24451 ....

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या रस्त्याच्या बाबतीत माननीय मंत्रिमहोदयांनी चौदा पदरी रस्ता आहे, हिदुस्थानातील एकमेव रस्ता होणार आहे वगैरे सांगितले त्यावर आम्ही विश्वास कसा काय ठेवावयाचा ? ठाण्याच्या बाबतीतील प्रश्न उपस्थित केला होता त्यावेळी टेंडर रद्द करतो असे सांगितले होते पण तसे केले नाही. पेडर रोड पुलाच्या संदर्भात माननीय मंत्रिमहोदयांनी या सभागृहामध्ये ठोस आश्वासन दिले होते की, कोणत्याही परिस्थितीमध्ये डिसेंबर महिन्यामध्ये नारळ फोडला जाईल आणि काम सुरु होईल. आता मार्च महिना संपत आलेला आहे. हे वर्ष संपता संपता डिसेंबरमध्ये या पुलाच्या कामाचे उद्घाटन करु असे सांगितले होते. निविदा फायनल होत आलेली आहे आणि या पुलाचे काम डिसेंबरमध्ये सुरु करु असे सांगितले होते. काम कधी पूर्ण होईल हेही सांगितले होते. या ठिकाणी माननीय मंत्रिमहोदय सांगतात परंतु काहीच काम होत नाही. त्या पुलाचे काय झाले हे काहीच समजलेले नाही.

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, बी.ए.आर.सी. ते कळंबोली रस्त्याचे काम डिसेंबर अखेरपर्यंत शंभरटक्के चालू करु असे मी सन्माननीय सदस्यांना आश्वासन देऊ इच्छितो. पेडर रोडचा फ्लायओव्हर पूल महत्वाचा आहे त्यासंबंधी मी सांगू इच्छितो. त्याची तयारी चालू आहे. त्यामध्ये अनेक प्रकारचे नाहरकत प्रमाणपत्र पाहिजेत. मी सभागृहाच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, पेडररोडचा फ्लायओव्हर पूल कॅडबरीकडून केम्प्स कॉर्नर पर्यंत आणि पुढे बाबुलनाथ मंदिरापर्यंत आल्यानंतर नरीमन पॉइन्टकडे राईट टर्न घ्यावा लागतो. त्या ठिकाणी 90 डिग्री एवढे टर्निन्ग आहे. त्या ठिकाणी 60 किलोमीटर वेगाने गाडी आल्यानंतर पुढे जर 10 किलोमीटरचा वेग असेल तर वाहतुकीचा खोळंबा होण्याची शक्यता आहे. म्हणून आम्ही असे प्लानिंग केले होते की, गिरगाव चौपाटीच्या वाळूवरुन थोडे अलाईनमेंट घ्यावे. परंतु एन्व्हायर्नमेंट विभागाने त्याला हरकत घेतली आणि सांगितले की, या पुलासाठी गिरगाव चौपाटीवरुन अलाइनमेंट देऊ नका. सध्याचा जो रस्ता आहे त्या ठिकाणी ॲडजस्टमेंट करावयाचे असेल तर ...

श्री. दिवाकर रावते : या पुलाचे काम चालू केल्यानंतर चौपाटीपर्यंत पोहोचण्यासाठी दोन वर्षे लागतील. शासनाने या पुलाचे काम सुरु केले पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 24451 ....

श्री. अनिल देशमुख : आपल्यापेक्षा शासनालाही या पुलाचे काम लवकर चालू करावयाचे आहे. परंतु त्या ठिकाणी तांत्रिक अडचण तसेच एन्व्हायर्नमेंटचा प्रश्न आहे. शासनाची तयारी झालेली आहे. हे प्रश्न मार्गी लागले तर लवकरात लवकर पेडररोडच्या पुलाचे काम चालू करु.

श्री. दिवाकर रावते : या ठिकाणी लवकरात लवकर करु असे माननीय मंत्रिमहोदय सांगत आहेत. मागच्या वेळी डिसेंबरमध्ये काम सुरु करु असे या सदनामध्ये का सांगितले ?

श्री. अनिल देशमुख : मी सांगितले की, पेडररोड पुलाच्या बाबतीत वेगवेगळी नाहरकत प्रमाणपत्रे पाहिजेत. आपल्याला माहीत आहे की, प्रत्येक गोष्टीबद्दल लोक कोर्टात जातात आणि संपूर्ण काम थांबवतात. पेडररोड असोसिएशन सुध्दा मोठ्या प्रमाणावर विरोध करीत होती. त्यामुळे प्रत्येक गोष्ट तपासून आणि प्रत्येक गोष्टीची मान्यता घेऊन शासन या कामाला सुरुवात करणार आहे.

श्री. दिवाकर रावते : यासंदर्भात माझे सबमीशन आहे. प्रत्येक वेळी असे काही तरी सांगितले जाते. मागच्या वेळी असे सांगण्यात आले होते की, सर्व हरकती संपलेल्या आहेत. लता मंगेशकर यांचा सुध्दा प्रश्न संपलेला आहे असे सांगितले होते.

श्री. अनिल देशमुख : लता मंगेशकर यांनी जी हरकत घेतली होती तो तांत्रिक मुद्दा नव्हता. त्या ठिकाणी जे तांत्रिक मुद्दे आलेले आहेत त्यामध्ये मघाशी सांगितल्याप्रमाणे जे टर्निन्ग आहे त्या ठिकाणी गिरगाव चौपाटीचा काही पोर्शन येतो. या पोर्शनमध्ये पूल आणू नका असा तांत्रिक मुद्दा आहे. त्या ठिकाणी कशा पध्दतीने टर्निन्ग घेता येईल यादृष्टीने परवानगी घेण्यासाठी प्रयत्न करीत आहोत. त्याची परवानगी मिळालेली नाही. परवानगी मिळाल्यानंतर त्याबाबत पुढची कार्यवाही सुरु होईल. पेडर रोडचा पूल बांधण्याचा शासनाचा शंभरटक्के मानस आहे.

उपसभापती : मी सभागृहाच्यावतीने माननीय मंत्रिमहोदयांना विचारु इच्छितो. आपण एन्व्हायर्नमेंटचा उल्लेख नेहमी करतो. एन्व्हायर्नमेंट खाते हे शासनाच्या वर नाही. हे खाते केंद्र शासनाचे आहे याची मला जाणीव आहे. परंतु दरवेळी एन्व्हायर्नमेंटचे भूत सगळ्यांच्या मानेवर बसविले जाते. विकासाची कोणतीही बाब आली की, एन्व्हायर्नमेंटचा प्रश्न येतो. त्यांच्या कक्षेत जे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG

ता.प्र.क्र. 24451 ....

उपसभापती .....

काम असेल त्याबाबत त्यांना मर्यादा घालून दिली पाहिजे. यामुळे जर विलंब होत राहिला तर कामाची कॉस्ट वाढते. विशिष्ट मुदतीत त्यांनी अहवाल द्यावयास पाहिजे. आपण एन्व्हायर्नमेंट विभागाला सांगून मान्यता घ्यावयास पाहिजे. यामध्ये दुसऱ्याचा दोष असेल पण दुसऱ्याचा दोष आपल्या खांद्यावर का घेता ? हा जनतेच्या जिव्हाळ्याचा प्रश्न आहे हे आपण केंद्र सरकारला सांगू शकत नाही काय ? आपण सांगितले की, एन्व्हायर्नमेंटचा प्रश्न आहे. आम्ही इकडून ठाण्याकडे जाण्यास निघालो तर जे.जे.चा उड्डाणपूल आहे तसेच दादर आणि चेंबूरचे उड्डाणपूल आहेत. त्या ठिकाणी मध्यमवर्गीय मराठी लोक राहतात. त्या ठिकाणी त्यांच्या सजेशन्स किंवा हरकती मागवल्या नाहीत तसेच त्यांनीही विरोध केला नाही. पेंडररोड भागामध्ये मोठे लोक राहतात म्हणून त्यांच्या विरोधाला बळी पडून असे होत असेल तर ते चुकीचे आहे.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल देशमुख : हा पेडररोड फ्लायओव्हर गिरगाव चौपाटीवर 10 फुटापर्यन्त जातो. त्यामुळे केन्द्र शासनाची परवानगी घेण्याचे प्रयत्न सुरु आहेत...

श्री. दिवाकर रावते : राज्य शासनाच्या कार्यपध्दतीबाबतच माझा आक्षेप आहे..

श्री. अनिल देशमुख : सन्मानीय सदस्यांनी प्रथम माझे उत्तर ऐकून घ्यावे.

श्री. दिवाकर रावते : ज्यावेळी मुंबईतील फ्लायओव्हर बांधायला घेतले होते त्यावेळी हा फ्लायओव्हर देखील बांधण्याचे निश्चित झाले होते. परंतु त्यावेळी लतादीदींनी विरोधी केला आणि हे काम थांबले. अन्यथा हे काम सुरु झाले असते. मग त्यावेळी पर्यावरणाचा प्रश्न निर्माण झालेला नव्हता का ?

श्री. अनिल देशमुख : पेडररोडचा उड्डाण पूल बांधण्यासाठी लतादीदींनी तांत्रिक मुद्दा उपस्थित केलेला नव्हता.

डॉ.दीपक सावंत : त्यावेळी तसे सांगण्यात आले होते... रेकॉर्डवर तसे आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, याबाबतीत आपण माननीय मंत्री महोदयांकडून कमिटमेंट घ्यावी.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सभागृहामध्ये दुसरा प्रश्न सुरु आहे. माननीय मंत्री महोदय उत्तर द्यायला लागल्यानंतर त्यांचे उत्तर पूर्ण होऊ न देताच विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य त्यांना प्रश्न विचारीत आहेत. हे कामकाज कोणत्या पध्दतीने चालले आहे ? आम्हाला देखील प्रश्न विचारावयाचे आहेत ?

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

उपसभापती : सन्माननीय सदस्यांनी कृपा करुन माननीय मंत्री महोदयांचे उत्तर ऐकून घ्यावे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे हे दोन वेळा सभागृहाच्या बाहेर गेले आणि आत आले. आता ते हातवारे करुन प्रश्न विचारु पहात आहेत. त्यांची ही पध्दत योग्य नाही. गॅलरीमध्ये बसलेले लोक हा प्रकार पहात आहेत.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माझ्या नावाचा उल्लेख केला म्हणून मी स्पष्टीकरण देतो. हे खरे आहे की, मी दोन वेळा सभागृहाच्या बाहेर गेलो. कारण हे आहे की, "महाराष्ट्र टाईम्स"चे पत्रकार श्री. नरेंद्र पाठक यांचे हृदयविकाराने निधन झाल्याचे समजले. ही घटना कन्फर्म करण्यासाठी मी बाहेर गेलो होतो. मला तेथे तातडीने जाणे आवश्यक आहे. परंतु मुंबईचा प्रश्न येथे चर्चिला जात असल्यामुळे मी थांबलो.

श्री. अनिल देशमुख : मूळ प्रश्न सायन-पनवेल महामार्गासंबंधीचा असला तरी पेडररोडच्या संदर्भातील प्रश्नांची उत्तरे देण्याची माझी तयारी आहे. मी सांगू इच्छितो की, पेडररोड उड्डाण पुलाच्या बाबतीत संपूर्ण तयारी जोरात सुरु आहे. सदरहू उड्डाण पुलास पेडररोड असोशिएशनचा विरोध आहे. नंतर लिटिगेशनचे प्रश्न निर्माण होऊन काम खोळंबू नये म्हणून प्रत्येक तांत्रिक गोष्ट तपासून घेऊन आणि त्यास मंजुरी घेऊन कामाला लवकरात लवकर सुरुवात करण्यात येणार आहे.

...नंतर श्री. भोगले...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.24451.....

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मुंबईच्या दृष्टीने हा अतिशय ज्वलंत प्रश्न आहे. सभागृहात अनावश्यक चर्चा अधिक होते आणि अनावश्यक उत्तरे जास्त येतात. माझा साधा प्रश्न आहे, पेडर रोडवरील उड्डाणपूल बांधण्याच्या विषयावर सदनाचा तासन्तास वेळ खर्च झालेला आहे. कधी लतादीदी तर कधी अन्य कोणी आडवे येतात, त्यामुळे हे काम थांबले गेले. अद्याप कामाला सुरुवात व्हावयाची आहे. दररोज वांद्र्याहून विधानभवनाकडे येण्यासाठी आमचा सव्वा ते दीड तासाचा वेळ खर्ची पडतो. वाहतुकीच्या कोंडीमुळे कठीण परिस्थिती निर्माण होते. माहीम, प्रभादेवी, वरळी याठिकाणी वाहतुकीची प्रचंड कोंडी निर्माण होते. तेथून पुढे आल्यानंतर हाजीअली येथे व चौपाटीकडे वळताना पुन्हा वाहतुकीची कोंडी निर्माण होते. अशी परिस्थिती असताना त्यावर एकमेव इलाज आहे तो म्हणजे पेडर रोड येथे उड्डाणपूल तयार करणे. 5 वर्षे हा प्रश्न सभागृहात चर्चिला जात आहे. अद्यापही श्रीफळ वाढवून कामाला सुरुवात झालेली नाही. काही ना काही अडचण येते. येथील अडचण संपली की म्हणतात, चौपाटीचा भाग केंद्र सरकारच्या अखत्यारित असल्यामुळे केंद्र सरकारची परवानगी मिळविण्यासाठी पाठपुरावा सुरु आहे. या उड्डाणपुलाकरिता ज्या ज्या गोष्टी आवश्यक आहेत त्यापैकी अद्याप कोणत्या गोष्टी शिल्लक आहेत, कोणत्या परवानग्या मिळणे शिल्लक आहेत त्याची मंत्रीमहोदयांनी माहिती द्यावी. या सगळ्या परवानग्या क्लिअर झाल्यानंतर श्रीफळ वाढविले जाईल असे उत्तर द्यावे. ज्या पध्दतीने सदनामध्ये चर्चा चाललेली आहे त्यामध्ये फक्त वेळ वाया जातो, उत्तरे मिळत नाहीत व प्रश्न देखील सुटत नाही ही आमची भावना आहे. या अनुषंगाने मी मंत्रीमहोदयांना विनंती केली होती की, माहीम कॉजवे येथे वाहतुकीची कोंडी होते ती दूर करण्यासाठी डाव्या व उजव्या बाजूला एक लेन वाढवावी. जे जाहिरातीचे होर्डिंग्ज लावले आहेत ते दूर करुन डाव्या बाजूला एक लेन वाढविली तर तो मार्ग सतत रहदारीसाठी खुला होईल. माहीमच्या बाजूला जी गृहनिर्माण वसाहत आहे तिच्या शेजारुन ट्रॅफिक नेण्यास परवानगी दिली तर सेनापती बापट मार्गावरुन काही प्रमाणात ट्रॅफिक सुरु झाल्याने दिलासा मिळू शकेल. दुर्दैवाने मंत्रीमहोदयांना विभागाचे इंजिनिअर उत्तरे लिहून देतात आणि ती उत्तरे मंत्रीमहोदय सभागृहात देत असतात. जोपर्यंत हा प्रश्न सुटत नाही तोपर्यंत वाहतुकीची कोंडी कमी करण्याचा प्रयत्न करण्यात येईल का असा माझा सर्वसमावेशक प्रश्न आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, फार व्यापक प्रश्न उपस्थित केला आहे. संपूर्ण मुंबईत वाहतुकीची कोंडी होते त्याबद्दल स्वतंत्र चर्चा करावी लागेल. ताडदेव येथील अडचणीबद्दल आश्वासित करु इच्छितो की, तांत्रिक बाबी पूर्ण करीत आहोत. याठिकाणी काही लिगल मॅटर इ ाले तर अडथळा येऊ शकतो. त्यामुळे तांत्रिक बाबी लवकर पूर्ण करण्याचा प्रयत्न करीत आहोत. पेडर रोड असोसिएशनकडून नामांकित वकील उभे करण्याची तयारी सुरु आहे. शासनाकडून सर्व बाबी परिपूर्णतेने तयार करुन कोणतीही लूपहोल्स राहणार नाहीत असा प्रयत्न आहे. त्यानंतर जर कोणी कोर्टात गेले तरी अडथळा येणार नाही यादृष्टीने तांत्रिक बाबी पूर्ण करुन त्या पुलाचे काम सुरु करणार आहोत.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

वैराग (ता. करमाळा, जि.सोलापूर) येथील सराफांच्या दुकानावर दरोडे पडल्याबाबत

(२) * २८०१५ श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री. संजय दत्त : : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैराग (ता. करमाळा जि.सोलापूर) येथील सराफ दुकानावर दरोडे पडले आहेत असे दिनांक ६ फेब्रुवारी, २००७ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने दरोडेखोर शोधण्यासाठी प्रयत्न केले आहेत काय,

(३) दरोडेखोर सापडले असल्यास त्यांचेवर कोणत्या स्वरुपाची कार्यवाही करण्यात आली आहे तसेच त्याचे स्वरुप काय आहेत,

(४) अद्याप, त्यावर कार्यवाही केली नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता : (१) वैराग ता.मोर्शी येथील सराफ दुकानात दिनांक २० नोव्हेंबर, २००६ रोजी दरोडा पडलेला आहे. सदर प्रकरणी फिर्यादी याने दिलेल्या फिर्यादीवरुन वैराग पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.१३५/०६ भा.दं.वि.सं.कलम ३९५,३९७ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

(२) होय.

(३) व (४) सदर प्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर संयुक्त तपास पथक स्थापन करण्यात आले. गुन्ह्यामध्ये एकूण ३० आरोपी निष्पन्न झाले असून त्यापैकी ५ आरोपीना अटक करण्यात आली आहे. चोरीला गेलेल्या ६१,६९,८७०/- रु.ऐवजापैकी ३१,५०,०००/- रु. किंमतीचा ऐवज जप्त करण्यात आला आहे. उर्वरीत २५ आरोपींचा तपास पथकामार्फत शोध चालू आहे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, सराफाच्या दुकानावर पडलेल्या दरोड्याच्या प्रकरणी 30 आरोपी निष्पन्न झाले असून 5 आरोपींना अटक करण्यात आल्याचे उत्तरात म्हटले आहे. प्रश्न असा आहे की, उर्वरित 25 आरोपींना अद्याप अटक न होण्यामागे विलंबाची कारणे काय आहेत? सोलापूर जिल्हा हा कार्यक्षम गृहराज्यमंत्री यांचे होम डिस्ट्रिक्ट आहे. या जिल्हयात वारंवार होत असलेल्या दरोड्याच्या घटनांना आळा घालण्यासाठी पोलिसांनी कोणती ठोस उपाययोजना राबविली आहे?

(नंतर श्री.जुन्नरे....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 28015 .....

श्री. सिध्दाराम म्हेत्रे :सभापती महोदय, या दरोडयात एकूण 30 आरोपी निष्पन्न झालेले असून ज्यांनी या दरोडेखोरांना आसरा दिला तसेच ज्यांनी या दरोडेखोरांकडून माल घेतला ते सुध्दा निष्पन्न झालेले आहेत. कालच यासंदर्भात एका आरोपीला अटक करण्यात आलेली असून आता अटक करण्यात आलेल्या आरोपींची संख्या 6 झालेली आहे. ज्यांनी या आरोपींना आसरा दिलेला आहे अशा 3 व्यक्तींना अटक करण्यात आली असून, या प्रकरणातील मालाची विल्हेवाट लावणा-या 3 आरोपीनांही अटक करण्यात आलेली आहे. चोरीला गेलेल्या 61,69,870/- रु ऐवजापैकी 31,50,000/- रु. किमतीचा ऐवज जप्त करण्यात आलेला आहे. तसेच या गुन्हयाच्या संदर्भात चांगल्या प्रकारे तपासू सुरु असून अशाच प्रकारे जे 8-9 गुन्हे घडले होते त्यांचाही तपास सुरु आह. या दरोडयाच्या संदर्भातील धागे-दारे पकडण्यासाठी ॲडीशनल डी.जी.,आय.जी., डी.वाय.एस.पी, 4 पी.एस.आय. तसेच 24 पोलीस या केसच्या संदर्भात तपास करीत आहेत.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सदर दरोडा कधी पडला होता? तसेच उर्वरित आरोपी कधी पकडले जातील?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सदर गुन्हा 20.11.2006 रोजी घडला व त्याच दिवशी म्हणजे 20.11.2006 रोजीच गुन्हा दाखल झालेला आहे. या गुन्हयातील 30 आरोपींपैकी 7 आरोपी पकडले गेले असून उर्वरित आरोपी सुध्दा लवकरच पकडले जातील.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, महाराष्ट्रातील सराफांवर नियमित दरोडे पडत असल्यामुळे मध्यंतरी सराफांनी एक दिवसाचा बंद सुध्दा पाळला होता. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी दरोडे पडलेले आहेत. सराफांच्या दुकानावर वारंवार दरोड टाकणा-या अनेक टोळया असून या टोळयांना संरक्षण देणारे काही सूत्रधार आहेत तसेच काही अधिकारी सुध्दा आहेत. परंतु मला असे सांगावयाचे आहे की, नगरमध्ये दरोडे टाकणा-या टोळया असून, तेथील एक व्यक्ती दरोडयाच्या प्रकरणात हस्तक्षेप करीत असते, दबाव आणीत असते अशी आम्हाला माहिती मिळालेली आहे त्यामुळे दरोडेखोरांच्या टोळयामागील खरे सूत्रधार सापडले आहेत काय?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, या गुन्हयाच्या संदर्भात चांगल्या प्रकारे तपास सुरु आहे. मध्यंतरी अशाच प्रकारचे 11 सलग दरोडे पडले होते. सोलापूर पोलीस या गुन्हयांच्या संदर्भात चांगल्या प्रकारचा तपास करीत आहे. तसेच नगरमधील व्यक्ती या प्रकरणामध्ये दबाव आणते असे दिसून आलेले नाही. ------- ...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नागपूर शहर पोलीस मुख्यालयाच्या कोषागारात ३३ लाखांचा गैरव्यवहार झाल्याबाबत

(३) * २४६०६ श्री. शिवाजीराव पाटील , श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील , श्री. जितेंद्र आव्हाड , प्रा. फौजीया खान , श्रीमती मंदा म्हात्रे , श्री. सदाशिवराव पोळ , श्री. गुरुनाथ कुलकर्णी , श्री. राजेंद्र जैन , डॉ. वसंत पवार , विक्रम काळे : : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहर पोलीस मुख्यालयाच्या कोषागारात ३३ लाखांचा गैरव्यवहार झाल्याची घटना दिनांक २१ जानेवारी, २००७ रोजी वा त्या सुमारास उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे, श्री.आर.आर.पाटील यांच्या करिता : (१) होय.

(२) व (३) या चौकशीत सेवानिवृत्त रोखपाल याने पोलीस कर्मचारी यांची विविध देय रक्कम विद्युत देयके, पी.ओएल चार्जेस, निकामी मोटार वाहनाच्या जाहिर लिलावाची रक्कम रु.३७,५३,२७६/- रु.चा अपहार केल्याचे निष्पन्न झाले आहे. आरोपी व त्याचे अन्य साथीदार याची स्थावर मालमत्ता शासन जमा करण्याची कार्यवाही चालू आहे. आरोपी हे न्यायालयीन कोठडीत आहेत. अन्य ३ साथीदार जामीनावर आहेत. गुन्ह्याचा तपास चालू आहे.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, हा गंभीर प्रश्न आहे. ३७,५३,२७६ रुपयांचा नागपूर पोलीस मुख्यालयाच्या कोषागारात अपहार झाल्याची माहिती उत्तरामध्ये दिलेली आहे. तसेच उत्तरामध्ये असेही म्हटले आहे की, आरोपी व त्यांचे अन्य साथीदार यांची स्थावर मालमत्ता शासन जमा करण्याची कार्यवाही चालू आहे. त्यामुळे आतापर्यंत किती व्यक्तींकडून किती रुपयांची मालमत्ता तसेच रक्कम जमा करण्यात आलेली आहे?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, निवृत्त क्लर्क भिमराव याच्याकडून ५० हजार रुपये जप्त करण्यात आलेले असून ५.१० लक्ष रुपये किंमतीचा प्लॉटही जप्त करण्यात आलेला आहे. तसेच या प्रकरणात श्री. रियाज याच्याकडून दोन बोलेरो गाडया तसेच एक ट्रक जप्त करण्यात आलेला आहे.

यानंतर श्री. अजित.....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखनी नोंद

ता.प्र.क्र.24606....

श्री.सिध्दाराम म्हेत्रे .....

अशी एकूण 34 लाख रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे तिसरा आरोपी श्री.रहमान खान याला सुध्दा अटक करण्यात येऊन त्याच्याकडून दोन फ्लॅट ज्याची किंमत 44 लाख 60 हजार रुपये आहे आणि 753 ग्रॅम सोने ज्याची किंमत 6 लाख 64 रुपये आहे. इतकी मालमत्ता त्यांच्याकडून जप्त करण्यात आलेली आहे.

उपसभापती :प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.....

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझी आपणास विनंती आहे की, आज प्रश्नोत्तराच्या तास दुपारी 1.15 वाजता सुरु झाला. तेव्हा आपण प्रश्नोत्तराचा तास आणखी 15 मिनिट वाढवावा.

उपसभापती : ठीक आहे.

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, एकूण 37 लाख 53 लाख रुपयांचा अपहार झालेला आहे. हा अपहार एका महिन्यात झालेला नाही. या प्रकरणामध्ये फक्त रोखपालाला जबाबदार धरुन चालणार नाही तर त्याच्याशी संबंधित असलेल्या अधिकाऱ्यांना सुध्दा जबाबदार धरले पाहिजे. मग त्यामध्ये आय.जी.असतील, एस.पी.असतील, ऑडीटर असेल वा अन्य अधिकारी असतील तेव्हा या प्रकरणात रोखपाल व्यतिरिक्त अन्य अधिकाऱ्यांची चौकशी करण्यात आली आहे काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, या प्रकरणात संबंधित अधिकाऱ्यांची प्राथमिक चौकशी झालेली आहे. त्यानुसार त्यांची विभागीय चौकशी करण्याची शिफारस केलेली आहे. दरवर्षी ऑडीट तपासणे ही ऑडीटरची जबाबदारी आहे, परंतु गेल्या चार वर्षात ऑडीट झालेले नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, संबंधित अधिकाऱ्यांची प्राथमिक चौकशी करण्यात आली. या चौकशीत ते दोषी आढळून आले का ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, या प्रकरणाची प्राथमिक चौकशी डी.सी.पी.अमित कुमार यांनी केलेली आहे. आर.पी.आय.श्री.जावेद, दोन वरिष्ठ लिपिक आणि श्री. निमजे व श्री.रमेश वारके यांनी ऑडीट पाहिले नाही म्हणून त्यांना दोषी धरण्यात आले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.24606....

श्री.दिवाकर रावते : त्यांना सेवेतून निलंबित करण्यात आले काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, संबंधित अधिकारी प्राथमिक चौकशीत दोषी आढळून आले. त्यांची विभागीय चौकशी होणार आहे. विभागीय चौकशी पूर्ण झाल्यानंतर पुढील कारवाई करण्यात येईल.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

उपसभापती : संबंधित अधिकारी प्राथमिक चौकशीत अधिकारी दोषी आढळल्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल काय, असा सन्माननीय सदस्यांचा प्रश्न आहे.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, संबंधित अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी करणार आहोत. अपहार झालेल्या व्यक्तींकडून मालमत्ता जप्त करण्यात आलेली आहे. अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे हे सर्व झालेले आहे. ज्याने अपहार केला तो सेवा निवृत्त झालेला आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, हा गंभीर प्रश्न आहे. आताच काही वेळा पूर्वी सायबर आणि गुगल वेबसाईट बद्दल प्रश्न उपस्थित झाला होता. पोलीस फक्त हप्ता खाण्याचे काम करतात की काय असा संशय व्यक्त करावा अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे.

यानंतर श्री.रोझेकर.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>ता.प्र.क्र.24606 पुढे सुरु</u>.....

श्री.दिवाकर रावते.....

रोखपाल निवृत्ती नंतर त्या ठिकाणी कसा काम करीत होता ? भ्रष्टाचार झाल्यानंतर सदर कर्मचारी सेवानिवृत्त झाला का ? सेवानिवृत्त झालेला कर्मचारी जर कार्यालयात अधिकृतपणे काम करीत असेल तरा ही बाब अतिशय गंभीर आहे.

श्री.सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, संबंधित कॅशियर त्या ठिकाणी सन 2004 ते सन 2006 या कालावधीत काम करीत होता व त्या कालावधीत त्याने अपहार केलेला आहे. हा कर्मचारी सन 2006 मध्ये सेवानिवृत्त झाला परंतु त्याने दुस-या कर्मचा-याकडे पदाचा कार्यभार सोपविला नव्हता. कार्यालयाने पंधरा दिवस वाट बघून पंचांच्या समक्ष कार्यभार घेतला व पैसे ठेवण्याची पेटी फोडण्यात आली. जेवढी रक्कम पेटीमध्ये असावयास हवी होती तेवढी नसल्याने अपहार झाल्याचे लक्षात आले. सदर कर्मचारी सेवानिवृत्त झाला असला तरी सेवानिवृत्तीनंतरच्या देय रकमा त्याला देण्यात आलेल्या नाहीत.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नवी मुंबईतील हावरे बिल्डरला अटक केल्याबाबत

(४) * २७४८१ श्री. मधुकर सरपोतदार , श्री. अरविंद सावंत , डॉ. दिपक सावंत , डॉ. निलम गोन्हे , श्री.परशुराम उपरकर : : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील भूखंडाचे खोटे दस्तऐवज तयार करुन हैद्राबाद येथील कंपनीचा वरिल भूखंड ताब्यात घेतल्याप्रकरणी हावरे बिल्डरच्या चेअरमनला पोलिसांनी दिनांक १२ जानेवारी २००७ रोजी अटक केली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खोटया कागदपत्राचा थोडक्यात तपशील काय आहे,

(३) असल्यास, नवी मुंबईतील भूखंड बळकावण्याबाबतच्या पोलीसात केलेल्या तक्रारीचे स्वरुप काय आहे?

##श्री.सिद्धारात म्हेत्रे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता : (१) होय. सुलतान बाजार पोलीस ठाणे, हैद्राबाद आंध्रप्रदेश येथील गु.र.नं.२२३/०६ भा.दं.वि.स.क्र.४६५,१६८,४७१,४२०,१२० (ब) या गुन्ह्यातील आरोपी तुर्भे पोलीस ठाणे नवी मुंबईच्या हद्दीत रहात असल्याने त्यांना अटक करण्यासाठी तपासी अंमलदार यांनी तुर्भे पोलीसांची मदत घेऊन दिनांक ९ जानेवारी, २००७ रोजी अटक केली आहे.

(२) सदरचा गुन्हा हा सुलताना बाजार पोलीस ठाणे, हैद्राबाद आंध्रप्रदेश यांच्याशी संबंधित आहे.

(३) व्यवस्थापक, शहर सेवा सिडको यांनी सिडको महामंडळाचे बनावट ना हरकत प्रमाणपत्रे, बनावट सह्या करुन सिडकोची फसवणूक केली याबाबतची तक्रार सीबीडी पोलीस ठाणे येथे दिल्याने गु.र.नं.३७/०३ भा.दं.वि.सं.कलम ४२०,४६७,४७१,३४ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. आरोपीला अटक करुन त्यांच्याविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आलेले असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, या प्रश्नाला शासनाकडून जे उत्तर देण्यात आलेले आहे ते दिशाभूल करणारे आहे.

श्री.सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, लेखी उत्तरात सुधारणा आहे. प्रश्न क्रमांक 3 च्या उत्तराची सुरुवात पुढील प्रमाणे आहे. "वरील प्रकरणी नवी मुंबई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल नाही. मात्र हयापूर्वीच्या सन 2003 च्या अन्य प्रकरणात....."

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, "बनावट ना-हरकत प्रमाणपत्रे, बनावट सहया करुन सिडकोची फसवणूक केली व याबाबतची तक्रार सीबीडी पोलीस ठाणे येथे देण्यात आली", असे उत्तरात नमूद केले आहे. असे असतांना, "न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आलेले असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे," असेही पुढे म्हटले आहे. गुन्हा घडल्यानंतर तपास करुन

..3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>ता.प्र.क्र.27481 पुढे सुरु</u>.....

श्री.मधुकर सरपोतदार.....

संबंधित आरोपी जेलमध्ये असावयास हवे होते. They should have been behind the bar. पण तसे घडले नाही. चौकशीवर पुन्हा चौकशी यामध्ये वेळ जातो, गुन्हेगार वशिला लावतात, पोलिसांचे आर्शीवाद घेतात, अशा प्रकारे पोलीस स्टेशनवर दबाव येतो आणि त्याचा परिणाम गुन्हयाचा तपास न लागण्यावर होतो. तेव्हा, यासंदर्भात विभागाने नेमकी कोणती कारवाई केलेली आहे ? आणि या केसची सद्य:स्थिती काय आहे ?

श्री.सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, दोन घटना घडलेल्या आहेत. पहिल्या प्रकरणात हैद्राबाद येथे तक्रार देण्यात आलेली आहे व त्यामध्ये कोर्टाने आदेश दिलेले आहेत. या प्रकरणी नवी मुंबई येथील भूखंडाचा घोटाळा केला आहे व भूखंड आपल्या नावे करुन घेण्याचा प्रयत्न आरोपीने केलेला आहे. यामध्ये उज्वला हावरे व इतर असे आरोपी आहेत. हैद्राबाद येथील पोलिसांनी नवी मुंबई पोलिसांच्या मदतीने यासंदर्भातील तपास केलेला आहे, हा एक भाग आहे. दुसरा गुन्हा सीबीडी पोलीस स्टेशनअंतर्गत घडला आहे. या गुन्हयातील ज्या आरोपींना अटक केली होती त्यामधील एका आरोपीचे निधन झाले असून ही केस न्यायप्रविष्ठ आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, अशाप्रकारे आरोपी पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न करतात व पोलीस गुन्हेगारांना मदत करतात. अशा लोकांविरुध्द आपण कोणती प्रतिबंधात्मक कारवाई करणार आहात ? असे गुन्हे परत घडणार नाहीत याबाबत कोणती उपाययोजना करणार आहात ? बनावट ना-हरकत प्रमाणपत्रे मिळवून देणे व बनावट सहया मिळवून देणे यामुळेच हा गुन्हा घडला आहे. या पाठिमागच्या व्यक्ति कोण आहेत ?

श्री.सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सदर कागदपत्रे पोलिसांनी मिळवून दिलेली नाहीत. उज्वला हावरे व सतीश हावरे यांनी बनावट कागदपत्रे देऊ केली आहेत.

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, पावसाळयामध्ये जशी अळंबीची झाडे उगवतात तसे बिल्डरांचे जाळे नवी मुंबई परिसरात निर्माण झाले आहे.

यानंतर कुमारी जयश्री.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी.....

आणि मग लोकांची फसवणूक केली जाते, लोकांना बोलवून, निरनिराळी प्रलोभने दाखवून, निरनिराळया मार्गांनी तेथील जमीन ताब्यात घेणे, अशा प्रकारचा एक प्रकारचा उद्योग आणि धंदाच नवी मुंबईमध्ये बिल्डर्स लोकांनी चालू केलेला आहे. . गु.र.नं.37 / 3, भा.दं.वि.सं. कलम 420,467,471,34 या कलमांतर्गत या फसवणूकीच्या गुन्हयांची नोंदही करण्यात आली होती. या सर्व प्रकारांचा " कॉमन इंटेंट " एकमेव फसवेगिरी हाच असतो. नवी मुंबईतील केबलचालकांद्वारे दाखविण्यात आलेल्या जाहिराती जर आपण तेथील टी.व्ही. चॅनल्सवर बघितल्या तर आपल्याला असे आढळून येईल की, हावरे या बिल्डर्सची सुरेख आणि छान घरे तेथे बांधली जात आहेत. या सर्व गोष्टींना तेथे वेळीच आळा बसला पाहिजे व जनतेची होत असलेली फसवणूक थांबून त्यांना सावध करण्याकरिता काही कारवाई आपण केलेली आहे का ? नसल्यास, कधी करणार आहात ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : व्यवस्थापक,शहर सेवा सिडको यांनी सिडको महामंडळाचे बनावट ना हरकत प्रमाणपत्रे, बनावट सहया करुन सिडकोची फसवणूक केली, याबाबतची तक्रार सीबीडी पोलीस ठाणे येंथे नोंदविलेली आहे. सदर गुन्हयातील आरोपींना अटक करुन त्यांच्यावर दोषारोप पत्र दाखल करण्यात आलेले आहे, सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

O -2....

सावकाराला अटक न झाल्यामुळे बुलढाणा येथील ६६ शेतकऱ्यांनी दिलेल्या निवेदनाबाबत

(५) * 24724 श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. नितीन गडकरी , श्री. जगदीश गुप्ता , श्री.सागर मेघे : :

सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव, जि. बुलढाणा येथील गोकुलचंद सानंदा या सावकाराबवरुध्द अनेक तक्रारी दाखल झालेल्या असतांनाही त्यांना अटक न होणे, उच्च न्यायालयात त्यांचाजामीन रद्द करण्यासाठी शासनाकडून प्रयत्न न होणे, तक्रारकर्त्या शेतकऱ्यांच्या जमीनी त्यांना परत न मिळणे इत्यादीच्या निषेधार्थ व याबाबत त्वरीत कारवाईच्या मागणीसाठी मान्य न झाल्यामुळे ६६ शेतकऱ्यांनी दिनांक २५ सप्टेंबर, २००६ पासून सामूहिक उपोषण करण्याचा निर्णय घेतला व तशा आशयाचे पत्र दिनांक १६ सप्टेंबर, २००६ रोजी जिल्हाधिकारी, बुलढाणा यांना दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली आहे,

(३) कारवाई करण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत व ही कारवाई केव्हा पूर्ण होणार आहे ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे, श्री. आर.आर.पाटील यांच्याकरिता : (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सदर सावकारांविरुध्द प्राप्त तक्रारीवरुन १) पोलीस स्टेशन खामगांव शहर येथे अप.क्र. ११६/०६, १७०/०६, २) पोलीस स्टेशन खामगांव ग्रामिण येथे अप.क्र. १२९/०६, ३) पोलीस स्टेशन जानेफळ अप.क्र. ४२/०६, ४) पोलीस स्टेशन तामगाव अप.क्र. ७१/०६, ५) पोलीस स्टेशन शिवाजी नगर अप.क्र. ७६/०६, असे सहा गुन्हे सावकारी कायद्याखाली दाखल झालेले आहेत. चार गुन्ह्यात कोर्टामध्ये त्यांचेविरुध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहेत व दोन गुन्हे पोलीस तपासावर आहेत. तसेच गोकुळचंद सानंदा यांना अटकपूर्व जामीन मिळू नये म्हणून अप्पर सत्र न्यायालय, कोर्ट खामगाव येथे प्रयत्न करण्यात आलेले आहेत.

श्री.पांडुरंग फुंडकर : महोदय, हा जो प्रश्न मी या ठिकाणी विचारलेला आहे, तोच प्रश्न मी मागच्या वेळेलाही विचारला होता, परंतु त्याबाबत काही माहिती यावयाची होती, म्हणून सदर प्रश्न त्यावेळी लावण्यात आला नव्हता. बुलढाणा जिल्हयातील ६६ शेतक-यांनी दिनांक २५ सप्टेंबर,२००७ रोजी एक सामुहिक उपोषण केले, कारण तेथे अवैध सावकारी चालते. अवैध सावकारीविरुध्द तेथील पोलीस स्टेशनमध्ये अनेक वेळा तक्रार करुनही गुन्हयाची नोंद होत नाही. माननीय मंत्री महोदयांनी पहिल्या उत्तरात असे सांगितले की, त्या ठिकाणी अवैध सावकारीविरुध्द फक्त सहा गुन्हे दाखल केले गेले होते, परंतु " स्टेशन डायरी " च्या पानांची कॉपी माझ्याकडे उपलब्ध आहेत, त्यामध्ये अवैध सावकारीविरुध्द एकुण ५१ तक्रारी असल्याची नोंद आहे. माननीय मंत्री महोदयांच्या उत्तराप्रमाणे फक्त सहाच गुन्हयांची नोंद त्या ठिकाणी झालेली आहे, उर्वरित तक्रारींचे काय झाले ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : बुलढाणा जिल्हयामध्ये जवळ जवळ ७३ गुन्हे दाखल झालेले आहेत,

O -3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सिध्दाराम म्हेत्रे..... ता. प्र. क्र. २४७२४.....

सदर सहा गुन्हे हे श्री.गोकुलचंद सानंदा यांच्या विरुध्द आहेत.

श्री.पांडुरंग फुंडकर : श्री.सानंदा यांच्याविरुध्द एकूण २५ तक्रारी खामगांव आणि इतर पोलीस स्टेशनमध्ये दाखल केलेल्या आहेत. श्री.सानंदा हे काँग्रेस पक्षाच्या आमदारांचे वडील आहेत, ते अवैध सावकारही आहेत. एकदा माननीय मुख्यमंत्र्यांचे पी.एस.श्री.पडवळ यांनी पोलीस स्टेशनमध्ये फोन करुन श्री.सानंदा यांच्यावर दाखल झालेल्या गुन्हयांची चौकशी केली होती, मग माननीय मुख्यमंत्र्यांनी श्री.सानंदा यांच्या विरुध्द काही कारवाई न करण्याचे व त्यांच्याविरुध्द कोणतीही तक्रार नोंदवून न घेण्याचे आदेश दिले होते. एका बाजूला माननीय उप मुख्यमंत्री सांगतात की "सावकारांना आता कोपरापासून ढोपरापर्यंत सोलून काढा." दुस-या बाजूला अवैध सावकारीविरुध्द कोणताही गुन्हा नोंदवू नका, कारण तसे माननीय मुख्यमंत्री साहेबांचे आदेश आहेत, अशा प्रकारचे कलेक्टर साहेबांचे पत्र येते म्हणून अवैध सावकारीविरुध्द तक्रार करुनही गुन्हा रजिस्टर होत नाही.

यानंतर श्री.बोरले.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.24724.....

श्री.पांडुरंग फुंडकर .....

गुन्हा रजिस्टर झाला तरी कारवाई होत नाही. पोलीस स्टेशनच्या माध्यमातून गुन्हेगाराला कोर्टात जाऊन जामीन मिळविण्याची संधी दिली जाते. गुन्हेगाराला अशा प्रकारे पाठीशी घातले जात आहे. पोलीस स्टेशनच्या पी.आय.ने सुरु केलेल्या कारवाईला मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयातून स्टे देता येतो काय, श्री.गोकुळचंद सानंदा यांच्याविरुध्द गुन्हा रजिस्टर झालेला आहे काय, आणि गुन्हा रजिस्टर झालेला नसेल तर का झालेला नाही ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, श्री.गोकुळचंद सानंदा यांच्याविरुध्द 12 तक्रारी आलेल्या आहेत. त्यापैकी त्यांच्याविरुध्द 6 गुन्हे दाखल झालेले आहेत. बाकीचे गुन्हे अदखल पात्र म्हणून दाखल केलेले आहेत. तसेच काही प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझ्याकडे श्री.गोकुळचंद सानंदा यांच्याविरुध्दच्या 51 तक्रारी आहेत. त्यांच्यावर फक्त 6 गुन्हे दाखल केलेले आहेत. बाकी सर्व गुन्हे अदखल पात्र म्हणून दाखल केलेले आहेत. श्री.गोकुळचंद सानंदा यांनी शेतक-यांच्या जमिनी हडप केलेल्या आहेत. जमिनी अजून शेतक-यांच्या ताब्यात आहेत. परंतु तहसीलदार, एस.डी.ओ. 7/12 शेतक-यांच्या नावे करीत नाहीत. कारण श्री.गोकुळचंद सानंदा तहसीलदार, एस.डी.ओ. यांच्यावर सरकारी दबाव आणतात. त्या जमिनीवर शेतकरी पीक घेत आहेत. परंतु जमिनीचा 7/12 शेतक-यांच्या नावावर केला जात नाही, हे खरे आहे काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, 12 शेतकऱ्यांनी तक्रारी केलेल्या आहेत. श्री.गोकुळचंद सानंदा यांच्याविरुध्द एकूण 73 तक्रारी आलेल्या आहेत.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, श्री.गोकुळचंद सानंदा यांच्याविरुध्द एकूण 73 तक्रारी आलेल्या आहेत. मुंबई शहरामध्ये एक एन.सी. दाखल केलेली असली तरी ताबडतोब संबंधित व्यक्तीला बोलावून त्यांच्याकडून सिक्युरिटी बॉंड लिहून घेतला जातो. श्री.गोकुळचंद सानंदा यांच्याविरुध्द 73 तक्रारी आलेल्या असतांना सुध्दा त्यांना तडीपार का केले जात नाही ? श्री.गोकुळचंद सानंदा यांना पाठीशी घातले जात आहे, असा याचा स्पष्ट अर्थ होतो. माननीय गृह राज्यमंत्री त्यांवर कारवाई करुन त्यांना केव्हा गजाआड पाठविणार आहेत ?

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.24724.....

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, श्री.गोकुळचंद सानंदा यांच्यावर गुन्हे दाखल केलेले आहेत. कोर्टाने त्यांना अटकपूर्व जामीन दिलेला आहे. त्यांच्या विरुध्दचे 4 गुन्हे न्यायप्रविष्ट आहेत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय गृह राज्यमंत्री असे म्हणाले की, श्री.गोकुळचंद सानंदा यांच्याविरुध्द पोलिस स्टेशनमध्ये तक्रारी आलेल्या आहेत. जर अशा तक्रारी आलेल्या असतील तर सरकारला जनाची नाही तर मनाची तरी आहे की नाही ? केलेल्या तक्रारींची दखल घेतली जात नाही. एका शेतक-याने हायकोर्टामध्ये पत्र पाठविले आणि त्या पत्राच्या आधारे हायकोर्टाने केस दाखल करुन घेतलेली आहे. सावकाराविरुध्द तक्रारी आल्या तर तहसिलदार, एस.डी.ओ आणि पोलीस स्टेशनचे प्रमुख या तिघांनी एकत्रितपणे त्या तक्रारीची छाननी करुन तातडीने आदेश देऊन संध्याकाळपर्यंत 7/12 त्या शेतक-यांच्या नावावर करुन देण्याची कायद्यामध्ये तरतूद आहे. मोर्शी, दर्यापूर, अंजनगाव येथे मी तसे करुन घेतलेले आहे. सावकाराविरुध्द आलेल्या तक्रारीची या तिन्ही अधिका-यांनी छाननी करुन 7/12 शेतक-यांच्या नावावर करुन देण्याची कायद्यामध्ये तरतूद असतांनाही जमिनी त्या शेतक-यांच्या नावावर केल्या नसतील आणि आमदाराच्या दबावाला बळी पडले असतील तर या तिन्ही अधिका-यांवर माननीय गृह राज्यमंत्री कारवाई करतील काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, यातील 4 प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत.

यानंतर श्री.गागरे .....

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ता.प्र.क्र.24724.....

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, श्री.गोकुळचंद सानंदा यांच्याविरुध्द किती तक्रारी आलेल्या आहेत ? त्यापैकी किती गुन्हे दाखल झालेले आहेत ? त्यापैकी किती गुन्हयांना जामीन मिळाला आहे ? त्यांच्यावर बरेच गुन्हे दाखल झालेले आहेत व त्यांना जामीन मिळालेला नाही म्हणून सरकारने त्यांना फरारी घोषीत केले आहे काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, श्री.गोकुळचंद सानंदा यांच्याविरुध्द 73 तक्रारी आलेल्या आहेत व त्यापैकी सहा गुन्हे दाखल झालेले आहेत.

उपसभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री.रामराजे नाईक निंबाळकर (जलसंपदा मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने माननीय राज्यपालांनी पाटबंधारे विकास क्षेत्रासंदर्भात दिलेल्या निदेशांच्या अनुषंगाने सन 2007-2008 चे वार्षिक नियोजन व सन 2006-2007 मधील वितरीत करण्यात आलेला निधी व दिनांक 28 फेब्रूवारी, 2007 अखेर झालेला खर्च इत्यादी तपशिलवार अनुपालन अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

उपसभापती : अनुपालन अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.बबनराव पाचपुते (वित्त मंत्री यांचेकरिता) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने वार्षिक योजना 2007-2008 मध्ये पाटबंधारे विकास क्षेत्र व पाटबंधारे वगळून इतर विकास क्षेत्रातील अनुशेष दूर करण्यासाकरिता नियतव्ययाच्या प्रदेशनिहाय वाटपाबाबत माननीय राज्यपालांनी दिलेले निदेश सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : माननीय राज्यपालांनी दिलेले निदेश सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहेत.

श्री.बाबा सिद्दीकी (कामगार मंत्री) : सभापती महोदय, पिंपरी चिंचवड माथाडी व असंरक्षित कामगार मंडळाचा सन 1992-93, 1993-94, 1994-95, 1995-96, 1996-97 व 1997-98 चा अनुक्रमे पहिला, दुसरा, तिसरा, चौथा, पाचवा व सहावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

उपसभापती : वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहेत.

श्री.बाबा सिद्दीकी : सभापती महोदय, नाशिक जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळाचा (लासलगाव) सन 2000-2001, 2001-2002, 2002-2003 चा अनुक्रमे बारावा, तेरावा व चौदावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

उपसभापती : वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाबा सिद्दीकी (कामगार मंत्री) : सभापती महोदय, दि खोका मेकींग अँड टिंबर मार्केट लेबर बोर्ड, मुंबईचा सन 1999-2000, 2000-2001, 2001-2002 चा अनुक्रमे सत्तावीसावा, अट्ठावीसावा व एकोणतीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

उपसभापती : वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहेत.

श्री.बाबा सिद्दीकी : सभापती महोदय, दि रेल्वे गुडस् क्लिअरींग अँड फॉरवर्डिंग एस्टॅब्लिशमेंटस् लेबर बोर्ड फॉर ग्रेटर बॉम्बेचा सन 2000-2001, 2001-2002 चा अनुक्रमे चोविसावा व पंचविसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

उपसभापती : वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहेत.

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

औचित्याचे मुद्दे

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी एक औचित्याचा मुद्दा मांडण्यास परवानगी मागितली आहे. त्यांनी मी त्यांचा औचित्याचा मुद्दा मांडण्यास परवानगी दिली आहे, तरी त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.कपिल पाटील : " क्रिकेट वर्ल्डकप सामन्यांमधील भारताच्या सुरूवातीच्याच पराभवामुळे देशात आणि आपल्या राज्यात अतिशय तीव्र प्रतिक्रिया उमटल्या आहेत. ज्या खेळावर आणि खेळाडूंवर भारतीय क्रिकेटप्रेमी प्रेम करतात, त्यांचा राग समजू शकतो. परंतु ज्या टोकाच्या पद्धतीने या संबंधात प्रतिक्रिया व्यक्त झाल्या आहेत त्या चिंतनीय आहेत, क्लेशदायक आणि वेदनादायक आहेत. हे खरे क्रिकेट प्रेम नाही. खेळाकडे खेळ म्हणूनच पाहिले पाहिजे. हार जीत होणारच. आपल्या खेळाडूंच्या निष्ठांबद्दल आणि मेहनतीबद्दल शंका घेता कामा नये. मात्र ज्या पद्धतीने खेळाडूंचा निषेध करण्यात आला ती पद्धत अतिशय निंदनीय, विकृत आणि म्हणून घृणास्पद आहे. खेळाडूंच्या प्रतिमांचे दहन करण्यात आले. काळे फासून विद्रुपीकरण हा टोकाचा हिंसाचार आहे. खरे तर त्यास दखलपात्र गुन्हा मानून कारवाई झालीच पाहिजे. किमान महाराष्ट्रात तरी ही विकृती खपवून घेता कामा नये. या औचित्याच्या मुद्याद्वारे मी सभागृहाला आवाहन करतो की, साऱ्या सभागृहाने भारतीय खेळाडूंच्या, आपल्या राहूल, सचिनच्या आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या पाठीशी उभे रहावे. भारतीय खेळाडूंचा सन्मान राखण्याची जबाबदारी आपणा सर्वांची आहे."

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, मी देखील आपल्याकडे 'औचित्याचा मुद्दा' मांडण्यासाठी परवानगी मागितलेली आहे. ...

उपसभापती : मी सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांना सांगू इच्छितो की, त्यांचा आणि सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांचा 'औचित्याचा मुद्दा' एकाच विषयासंबंधात आहे आणि सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी तो मांडला असल्याने आपण पुन्हा अलगरित्या मांडण्याची आवश्यकता नाही.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, मी आपल्याकडे दोन विषयांबाबत औचित्याचा मुद्दा मांडण्यासाठी परवानगी मागितलेली आहे. त्यापैकी आपण म्हटल्याप्रमाणे एक विषय सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी मांडलेला आहे. पण दुसऱ्याही एका महत्त्वाच्या विषयी मी औचित्याचा मुद्दा मांडू इच्छितो, तरी आपण मला परवानगी द्यावी.

..... आर 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : मी आता सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांना त्यांचा औचित्त्याचा मुद्दा मांडण्यास परवानगी देत आहे. त्यांनी तो मांडावा.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मी आपल्या परवानगीने माझा औचित्त्याचा मुद्दा येथे मांडत आहे. नाशिक जिल्ह्यामध्ये दोन दिवसापूर्वीच दरोड्यामध्ये चार लोकांचा मृत्यू झालेला आहे. काही वर्षापूर्वी नाशिक जिल्ह्यातील विहितगाव येथे दरोडा आणि अत्याचार झाला होता त्या संबंधात कालच्याच आठवड्यामध्ये न्यायाधीशांनी आरोपींना फाशीची शिक्षा सुनावली आहे. या संबंधात आता त्या कुटुंबाला धमक्या येत आहेत. नाशिक जिल्ह्यातील मनमाड येथील हे सातोटे कुटुंब आहे. सभापती महोदय, नागपूर आणि कन्हा या दोन गावांमध्ये असाच भीषण दरोडा पडला आणि त्यामध्ये श्रीमती रंजना दराडे ही महिला जखमी झालेली आहे. मी स्वत: त्यांची भेट घेतली आहे आणि तेथील स्थानिक आमदार श्री.संजय पवार यांनीही त्यांची भेट घेऊन विचारपूस केलेली आहे. या संदर्भात या औचित्त्याच्या मुद्याद्वारा मी दोन प्रश्नांकडे ताबडतोबीने आपल्यामार्फत सभागृहाचे लक्ष वेधू इच्छिते. एक म्हणजे नाशिक जिल्ह्यामध्ये गेल्या काही दिवसात वारंवार दरोड्याच्या घटना घडत आहेत. नांदगाव येथेही दरोड्याच्या घटना घडल्या आहेत. नांदगाव येथे जवळच रेल्वे स्टेशन आहे. त्यामुळे हे दरोडे घालणारे गुन्हेगार रेल्वेतून उतरून दरोडा घालून पळून जातात. नांदगाव येथे दरोडा होतो ना होतो तोच यावल येथेही दरोडा पडल्याची बातमी आहे. तसेच सांगली जिल्ह्यातील जत येथेही दरोडा पडल्याची बातमी आलेली आहे. तेव्हा ज्यांच्या घरांवर दरोडा पडला आहे त्यातील कुटुंबियांची भेट घेतली असता, तेथील गावकऱ्यांची भेट घेतली असता त्यांनी ती प्रमुख मागण्या वारंवार केल्या आहेत. एक म्हणजे या प्रकरणांतील आरोपींना ताबडतोब अटक झाली पाहिजे. कारण ते परत परत दरोडे घालीत आहेत. दुसरे म्हणजे रात्रीच्या वेळी लोडशेडींग होऊ नये कारण लोडशेडींचा फायदा घेऊन हे दरोडे घातले जात आहेत. तसेच तिसरी मागणी म्हणजे या दरोड्यांमध्ये काही लोक, त्यामध्ये महिला आणि लहान मुले देखील आहेत, जखमी झालेले आहेत. इतकेच नाही तर चार जणांचा मृत्यू झालेला आहे. त्यात एक 11 महिन्यांची बालिका आहे ही अत्यंत दु:खाची गोष्ट आहे. सभापती महोदय, दरोड्याच्या घटना होऊ नयेत म्हणून पोलिसांनी गस्ती पथके नेमलेली आहेत असे सांगण्यात आले. परंतु नाशिक, बीड, नगर आणि औरंगाबाद या चार जिल्ह्यांमध्ये तरीही दरोडे पडून लोकांचे मृत्यू होत आहेत. ....

(यानंतर श्री. सरफरे ..... एस 1 ..

अशुद्धीत प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे....

महिला मृत्यूमुखी पडत आहेत, आरोपी सापडत नाहीत, यामध्ये किती टोळया गुंतलेल्या आहेत याची माहिती मिळत नाही. त्याचबरोबर एखाद्या प्रकरणामध्ये कोर्टाचा निकाल लागल्यावर पुन्हा त्याचा बदला घेण्यासाठी दरोडा टाकण्याचे प्रकार होत आहे. अशाप्रकारचे अनेक प्रश्न निर्माण होत आहेत. तेव्हा या दरोडयामध्ये जखमी झालेल्या लोकांना तात्काळ मदत मिळाली पाहिजे व आरोपींना अटक झाली पाहिजे यादृष्टीने शासनाने पाऊले उचलावीत. आणि हे दरोडयाचे सत्र थांबविण्यासाठी त्वरित कठोर कारवाई करावी अशी या औचित्याच्या मुद्दयाव्दारे मी शासनाला विनंती करीत आहे.

उपसभापती : या दरोडयामध्ये जखमी झालेल्या लोकांना 48 तासाच्या आत आवश्यक ती मदत शासनाने करावी आणि केलेल्या मदतीसंबंधीचे निवेदन सभागृहामध्ये करण्यात यावे.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, होय.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, क्रीडा क्षेत्रामध्ये दोन महत्वाच्या घडलेल्या घटनासंबंधी मी शासनाचे लक्ष या औचित्याच्या मुद्याव्दारे वेधू इच्छितो. पहिली घटना माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी औचित्याच्या मुद्याव्दारे उपस्थित केली असून तिला माझे अनुमोदन आहे. आणि दुसरी घटना क्रीडा क्षेत्रामध्ये गौरवास्पद असून ती स्पर्धक असलेल्या तरुणांना प्रोत्साहन देणारी आहे. काल मुंबई-पुणे धावणाऱ्या डेक्कन क्वीनबरोबर स्पर्धा करुन सायकल पटू श्री. विनोद पुनमिया यांनी पुणे ते डोंबिवली हे 140 कि.मी. चे अंतर 2 तास 14 मिनिटामध्ये पार करुन डेक्कन क्वीनपेक्षा 20 मिनिटे अगोदर डोंबिवली येथे पाहोचून विश्वविक्रम केला ही कौतुकास्पद घटना आहे. शासनाने याची त्वरित दखल घेऊन या क्रीडापटूचा यथोचित गौरव करावा. जेणेकरुन त्यामधून तरुणांना प्रेरणा मिळेल. म्हणून औचित्याच्या मुद्याव्दारे सरकारचे लक्ष वेधतो. याबाबत शासनाने निवेदन करावे अशी विनंती करतो.

उपसभापती : शासनाने निवेदन करण्याची आवश्यकता नाही. माननीय सदस्यांनी केलेली सूचना शासनाने अंमलात आणावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, साधारणपणे सभागृहामधील आमदारांबाबत, सदस्यांबाबत गैरसमज पसरविणारी बातमी एका वर्तमानपत्रामध्ये छापून आली असून त्यामध्ये तथ्य आहे, व योग्य आहे. "उपेक्षितांचे जिणे" या मथळयाखाली "वृद्ध कलावंतांचे प्रश्न मांडण्यात एकाही आमदाराला स्वारस्य नाही" अशाप्रकारची बातमी लोकसत्ता दैनिकामध्ये छापून आली असून ती अतिशय गंभीर आहे. आज जे मराठी साहित्य क्षेत्रातील लेखक असतील, कादंबरीकार असतील, साहित्यिक असतील, नाटय क्षेत्रातील कलावंत असतील, चित्रपट क्षेत्रातील कलावंत असतील त्यांना 500 रुपये मानधन दिले जाते. तेसुध्दा तीन ते चार महिने दिले जात नाही. या संदर्भात अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष श्री. अजय सरपोतदार यांनी एका पत्राव्दारे सर्वपक्षीय आमदारांना आवाहन केले होते. त्या पत्राच्या अनुषंगाने आम्ही सभागृहामध्ये वेगवेगळे मुद्दे मांडीत असतो. परंतु सभागृहाच्या कामकाजाच्या पध्दतीमुळे ते सभागृहाच्या पटलावर येत नाहीत. त्यामुळे समाजामध्ये अशी धारणा निर्माण होते की, दैनंदिन लोक कलावंत असतील, साहित्यिक असतील, मजूर असतील जे कुणीही असतील त्यांच्या जीवनाशी असलेल्या संबंधित गोष्टींची सभागृहामध्ये चर्चा होत नाही. त्यामुळे त्यासंबंधी जर प्रतिक्रिया उमटली तर ती अयोग्य आहे असे मला वाटत नाही. याठिकाणी कलावंतामध्ये सर्वश्री. कमलाकर वैशंपायन, राजा मयेकर, शर्मा आहेत. यामध्ये एका कलावंतांनी असे लिहिले आहे व ते सभागृहातील सर्व माननीय सदस्यांच्या दृष्टीने गांभीर्याचे आहे. "दोन तीन महिने मानधनाचा पत्ता नसतो, चौकशीसाठी पदरचे वीस-वीस रुपये खर्च करुन मंत्रालय गाठावे लागते" ही वस्तुस्थिती आहे. आमचे लोकप्रतिनिधी त्यांच्या मानधनामध्ये 10 हजार रुपयांची वाढ एकमताने मंजूर करुन घेतात पण ज्येष्ठ कलाकारांचे मानधन वाढवून घेण्यासाठी त्यांना वेळ नाही. या लोकप्रतिनिधींचे, मंत्रालयातील नोकरशाहीचे पगार असे तीन-तीन महिन्यांनी काढले तर चालतील का? हीच अपेक्षा कायम राहिली तर शेतकऱ्यांप्रमाणे ज्येष्ठ कलावंतांवरही आत्महत्त्या करण्याची पाळी येईल यात शंका नाही". सभापती महोदय, याठिकाणी छापून आलेली बातमी अतिशय वेदनादायी आणि योग्य आहे असे मला वाटते. या कलावंतांना 500 रुपयांचे मानधन दिले जाते. परंतु आमचे पगार वाढवून घेण्यासाठी या ठिकाणी फार घाई केली जाते अशातला भाग नाही. शासनाने याची योग्य दखल घेण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते. याचे कारण असे की, काही कलावंत खूप कमावीत असतील, परंतु असे मोजके कलावंत आहेत.माझे जर चुकत नसेल तर के.ई.एम. हॉस्पिटलमध्ये उपचार घेत असलेले कलावंत श्री. सखाराम भावे यांच्याकरिता वर्गणी गोळा करावी लागते. त्याकरिता वर्तमानपत्रामध्ये बातमी द्यावी लागली.

(यांनतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (पुढे सुरु...

म्हणून शासनाला 500 रुपये चेक देण्यासाठी तीन-तीन, चार-चार महिने लागत असतील तर ते योग्य नाही. यासाठी मंत्रालयातील डेस्क ऑफिसरसमोर त्यांना उभे रहावे लागत असेल तर ते बरोबर नाही. महाराष्ट्र हे कलाकारांचे कौतुक करणारा, त्यांना प्रेरणा आणि प्रोत्साहन देणारा अशाप्रकारचा प्रांत आहे. शासनाने कलावंतांच्या मानधनामध्ये वाढ करणे आवश्यक आहे. सगळेच कलावंत श्रीमंत नाहीत. काही कलावंत हलाखीचे जीवन जगत आहेत. त्यामुळे वर्तमानपत्रामध्ये आलेली बातमी योग्य आहे. काही वेळेला अशाप्रकारचे आम्ही प्रश्न मांडतो परंतु सभागृहातील कामकाजाच्या पध्दतीमुळे ते सभागृहात येत नाहीत. आपल्या वतीने शासनाला विनंती आहे की, कलावंतांवर आत्महत्या करण्याची वेळ येऊ नये, म्हणून शासनाने योग्य ती दखल घ्यावी,अशी विनंती करतो.

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, याच अनुषंगाने मला सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी उपस्थित केलेल्या मुद्याला पाठिंबा द्यावयाचा आहे. त्यांचा मुद्दा महत्वाचा आहे. काही कलावंत उपेक्षित रहातात. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनामध्ये स्व.शाहीर अमरशेख, स्व.अण्णाभाऊ साठे आणि जंगम स्वामी यांनी भाग घेतलेला आहे. जंगम स्वामी हे पुणे जिल्हयातील भोर तालुक्यातील होते. त्यांचे वृध्दापकाळाने परवा निधन झाल्याची वर्तमानपत्रामध्ये लहानशी बातमी आलेली होती. संयुक्त आंदोलनामध्ये ते गाजलेले शाहीर होते, प्रवचनकार, किर्तनकार होते. त्यांचे शिक्षण फर्ग्युसन कॉलेजमध्ये झालेले होते. ते पदवी फस्टक्लास फर्स्ट मिळविलेले कलावंत होते. शासनाचे मानधन 500 रुपये होते, शासनाने त्यामध्ये वाढ करुन 700-750 रुपये करण्याचा निर्णय घेतला. त्याची अंमलबजावणी केली की नाही, माहीत नाही. परंतु कलावंतांना तीन-तीन, चार-चार महिने मानधन मिळत नाही,हे बरोबर नाही. ते दर महिन्याला, वेळच्या वेळी मिळाले पाहिजे, या सन्माननीय सदस्यांच्या मुद्याला मी पुष्टी देतो.

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण, सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांनी औचित्याच्या मुद्याद्वारे सूचना मांडली. या संदर्भाने शासनाला स्पष्टपणे निर्देश देतो की, 10 किंवा 12 तारखेच्या आत मानधनाचा चेक त्या कलावंतांकडे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MAP/

उपसभापती .....

पोहोचविण्याची व्यवस्था शासनाने करावी. यापुढे अशाप्रकारचा मुद्दा परते कधी उपस्थित झाला आणि संबंधित कार्यालयाने याची अंमलबजावणी केली नसेल तर त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल अशाप्रकारचे स्पष्ट निर्देश मी देत आहे.

श्री.बबनराव पाचपुते : ठीक आहे. याची नोंद घेण्यात येईल.

3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MAP/

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, ठाणे येथील रिक्षा चालक संघटनेने 3 एप्रिलरोजी संप पुकारलेला आहे आणि तशी त्यांनी घोषणा केलेली आहे. ठाणे जिल्ह्याची लोकसंख्या 16 लाख इतकी आहे. या संदर्भात लोकप्रतिनिधी, रिक्षा संघटना, प्रवासी संघटना यांची बैठक झाली. त्या बैठकीला सभापती महोदय आपणही उपस्थित होता. त्या काळामध्ये विद्यार्थ्यांची परीक्षा चालू असणार आहे, महिलांना, वृध्दांनाही या संपाचा त्रास होणार आहे. यापूर्वी अशाप्रकारचा रिक्षा चालकांचा संप झाला, त्यावेळेला मुंबईतून रिक्षातून गुंड आणून रिक्षांच्या काचा फोडल्या गेल्या होत्या. दहशतवाद निर्माण करण्यात आला होता. यामध्ये जनतेला वेठीस धरले जाते. असा प्रकार या पुढच्या काळामध्ये होऊ नये, म्हणून औचित्याच्या मुद्याद्वारे विनंती करू इच्छितो की, सभापती महोदय आपण शासनाला स्पष्ट निर्देश द्यावेत की, दहशत माजविण्याचा प्रयत्न केला तर पोलीस खात्याने सतर्क रहावे.

उपसभापती : सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे रिक्षा चालकांच्या संप प्रकरणी सर्व पक्षीय बैठक झाली. त्यामध्ये ठाण्याचे महापौरही उपस्थित होते, सर्व पक्षाचे लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

यानंतर श्री.बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती .....

रिक्षा चालक संघटनांचे जवळपास 350 ते 400 विविध पदाधिकारी उपस्थित होते. प्रत्येकाचे एकच म्हणणे पडले. लोकप्रतिनिधी म्हणून आम्ही या ठिकाणी या प्रश्नाला वाचा फोडण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न केला. आजच्या बैठकीमध्ये प्रवासी संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. या ठिकाणी एक गोष्ट शासनाला मुद्दाम सांगाविशी वाटते की, 3 एप्रिल ही तारीख जवळ आली आहे. इयत्ता दहावीची परीक्षा अजूनही संपलेली नाही तसेच प्राथमिक शाळांच्या आणि माध्यमिक शाळांच्या परीक्षा सुरु आहेत. अशा वेळी हा संप पुकारण्यात आलेला आहे. आजच्या बैठकीमध्ये रिक्षा चालक संघटनेच्या जवळपास सर्व पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, आम्ही रिक्षा बंद करणार नाही, आम्ही रिक्षा चालवू परंतु आम्हाला योग्य ते संरक्षण मिळाले पाहिजे. मागच्या वेळी बाहेरुन गुंडांना पाचारण करण्यात आले होते ही वस्तुस्थिती आहे. त्या ठिकाणी रिक्षांची मोडतोड करण्यात आली ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे मी राज्य सरकारला या ठिकाणी अशी सूचना देतो की, अशा प्रकारे जर कोणी बाहेरुन गुंड आणून त्या ठिकाणी दहशत निर्माण करणार असतील तर हे गुंड आणि त्यांचे नेते यांचयावर कठोर कारवाई ताबडतोबीने करावी आणि तशा सक्त सूचना पोलीस आयुक्तालयाला देण्यात याव्यात. तसेच आपले जे प्रादेशिक परिवहन अधिकारी आहेत त्याबाबत सांगू इच्छितो. या बैठकीमध्ये त्या लोकांनी काही मागण्या मांडल्या तसेच त्यांच्या काही तक्रारी होत्या. त्याबाबतीत शासन स्तरावर काही निर्णय घ्यावयाचे आहेत. ते निर्णय शासन स्तरावर घेण्यासाठी पंधरा दिवसांच्या आत सर्व संबंधितांची एक बैठक परिवहन खात्याच्या मंत्रिमहोदयांनी त्यांच्या कार्यालयात बोलवावी. त्यावेळी ठाणे शहरातील लोकप्रतिनिधींना देखील पाचारण करावे जेणेकरुन अशा प्रकारची समस्या वारंवार उद्‌भवणार नाही. मला या ठिकाणी सभागृहाला एक गोष्ट निश्चितपणे सांगावीशी वाटते. मला देखील आज त्या ठिकाणी उत्तर देत असताना एक शब्द वापरावा लागला. त्यांनी गुंडगिरी केली तर तुम्ही काय करणार आहात ? असा प्रश्न जेव्हा पत्रकारांनी विचारला तेव्हा मी सांगितले की, ते जर गुंड असतील तर आम्ही षंढ नाही, आम्हाला प्रतिकार करावा लागेल. दरवेळी आम्ही पोलिसांच्या खांद्यावर बंदूक ठेऊन लढणार नाही. पोलिसांचे दोन्ही बाजूने मरण नको. आम्ही सर्वांनी एक गोष्ट मान्य केली की, जर रिक्षा चालकांवर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती .....

कोणी संप लादला तर आम्ही त्या ठिकाणी स्वत: रिक्षातून प्रवास करणार आहोत. आम्ही रिक्षातून फुकट प्रवास करणार नाही तर त्यांना सबंध दिवसभराचे भाडे देणार आहोत. त्यांचे पैसे बुडणार नाहीत. असेच जर चालू असेल तर ठाण्याचे लोकप्रतिनिधी म्हणून आम्ही त्या ठिकाणी लोकांच्या संरक्षणासाठी रस्त्यावर उतरणार आहोत. अर्थात हे आम्ही लोकांच्या सुविधेसाठी करणार आहोत. शासनाने याबाबत खंबीर पावले उचलावीत. कारण जनतेवर याचे अत्यंत वाईट परिणाम होतील. असे प्रतिकुल परिणाम त्यांच्यावर होऊ नये म्हणून शासनाला स्पष्टपणे विनंती आणि सूचना आहे की, अशा प्रकारचे गैरकृत्य करणाऱ्यांवर ही गोष्ट घडण्याच्या आत ताबडतोब कारवाई करावी. पोलीस कारवाईबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी सांगावे.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, आपल्या सूचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, पंधरा दिवसाच्या आत परिवहन विभागाची बैठक बोलविण्यात येईल.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियम 289 अन्वये देण्यात आलेल्या प्रस्तावासंबंधी

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी या सभागृहामध्ये विधान परिषद नियम क्रमांक 289 अन्वये आपल्याकडे नोटीस दिलेली आहे. काल लातूर जिल्ह्यामध्ये श्री. नागनाथ श्रीरंग आरदवाड या 32 वर्षे वयाच्या शेतकऱ्याने चिंचेच्या झाडाला गळफास लावून आत्महत्या केलेली आहे.

उपसभापती : यासंदर्भात आपण नोटीस दिलेली आहे. यासंदर्भात आपण तसेच सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर सरपोतदार, दिवाकर रावते या सगळ्यांनी मिळून विनंती केली की, प्रश्नोत्तराच्या तासानंतर मी निर्णय द्यावा आणि त्यानंतर चर्चा करु. शासनाच्यावतीने माननीय मंत्रिमहोदयांनी यावर चर्चा करण्यास सहमती दर्शविलेली आहे. म्हणजे चर्चा करावी किंवा नाही हा प्रश्न उरलेला नाही. यासंदर्भात या ठिकाणी चर्चा होईल. मी विचारले की, याबाबत निवेदन केले तर चालेल काय ? सन्माननीय सदस्यांना चर्चा पाहिजे असेल तर चर्चा होईल.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(उपसभापती..

माझी सभागृहाला विनंती आहे की, आज अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा आहे. ही चर्चा आपण सुरु करु. दरम्यानच्या काळात या घटनेसंदर्भातील माहिती शासन घेईल. अर्थसंकल्पावरील चर्चा संपल्यानंतर ही चर्चा आपण लगेच सुरु करु..

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.) शासनाची या घटनेच्या संदर्भात चर्चा करण्याची तयारी आहे. परंतु या घटनेच्या संदर्भातील सविस्तर माहिती घेण्यासाठी शासनाला वेळ द्यायला पाहिजे..

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन या विषयावर चर्चा घेण्याची आम्ही नोटीस दिली होती. खरे तर प्रश्नोत्तराचा तास आम्ही होऊ देणार नव्हतो...

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण आमचे म्हणणे गांभीर्याने घ्यावे. नियम 289 अन्वये सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सभागृहापुढील कामकाज बाजूला ठेवून या गंभीर प्रश्नावर चर्चा व्हावी म्हणून नोटीस दिली होती. मी आता टी.व्ही.वर प्रत्यक्ष पाहून आलो आहे. ऊस न नेल्यामुळे लातूरच्या ज्या शेतक-याने आत्महत्या केली त्याचे पत्र माझ्याकडे आहे. त्यामध्ये त्याने आत्महत्या का केली हे सांगितलेले आहे. श्री. अमित देशमुख, मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांचे चिरंजीव, हे माझ्या मृत्यूस कारणीभूत आहेत, असा एसएमएस आलेला आहे. विदर्भामध्ये 8 शेतक-यांनी आत्महत्या केलेली आहे. शेतक-यांच्या आत्महत्येच्या संदर्भात शासनाने सुप्रीम कोर्टामध्ये चुकीचे ॲफिडेव्हिट केलेले आहे. पंतप्रधानांचे पॅकेज शेतक-यांपर्यन्त पोहोचत नाही. या गंभीर आणि अतिशय तातडीच्या विषयावर आमच्या तीव्र भावना या सभागृहामध्ये व्यक्त करण्यासाठी आणि या प्रश्नाच्या संदर्भात सरकारने तातडीने उपाययोजना करण्यासाठी प्रश्नोत्तराचा तास स्थगित करावा अशा प्रकारची भावना आम्ही व्यक्त केली होती. सभापती महोदय, आपण प्रश्नोत्तराचा तास नेहमीच घेत असतो. काल शेतक-याने केलेल्या आत्महत्तेच्या संदर्भात राज्याच्या मुख्यमंत्र्यांच्या मुलावर, तो माझ्या मृत्यूस कारणीभूत आहे, असा आरोप करण्यात आलेला आहे. आत्महत्या करणा-या शेतक-याचे पत्र माझ्याजवळ आहे.सभापती महोदय, या घटनेचे गांभीर्य आपण लक्षात घ्यावे. या विषयावर चर्चा करुन तातडीने उपाययोजना केली पाहिजे, शेतक-यांच्या आत्महत्या थांबल्या पाहिजेत. आम्हाला संकोच वाटतो की, सत्ताधारी पक्षाच्या संवेदना बोथट झालेल्या आहेत.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. नितीन गडकरी...)

म्हणून सर्व कामकाज स्थगित करुन या घटनेच्या संदर्भात चर्चा केली पाहिजे. अशा गंभीर घटना घडल्यानंतर सभागृहापुढील सर्व कामकाज बाजूला ठेवून त्यावर तातडीने चर्चा करण्याचा प्रघात आहे. तेव्हा माझी विनंती आहे की, या गंभीर विषयावर चर्चा घेऊन याबाबतीत सरकार काय उपाययोजना करणार आहे, ते शासनाने जाहीर करावे.

श्री. उल्हास पवार : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी तातडीने चर्चा घेण्यासंबंधीचे निवेदन केले. चर्चा घ्यावी की न घ्यावी हा सभापती महोदय, आपला अधिकार आहे. प्रश्न गंभीर आहे. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी माननीय मुख्यमंत्र्यांच्या चिरंजीवांचा उल्लेख या ठिकाणी केला. मुख्यमंत्र्यांचे चिरंजीव हे या सभागृहाचे सदस्य नाहीत. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी वर्तमानपत्रातील बातमीवरुन या ठिकाणी निवेदन केले. तसेच सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी हे जे पत्र दाखवित आहेत ते पत्र खरे आहे काय, हा देखील प्रश्न आहे. तेव्हा कोणत्यातरी बातमीच्या किंवा पत्राच्या आधारे मुख्यमंत्र्यांच्या चिरंजीवाच्या नावाचा उल्लेख करणे इष्ट नाही. तेव्हा तो उल्लेख कामकाजातून काढून टाकावा अशी माझी आपणास विनंती आहे.

उपसभापती : अमित देशमुख ते या सभागृहाचे सदस्य नाहीत....

श्री. नितीन गडकरी : असे होत नाही... "आजतक" तसेच अन्य दूरचित्र वाहिन्यांवरुन त्यांचे नाव दाखविलेले आहे.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

उपसभापती : सन्माननीय सदस्यांनी वर्तमानपत्रातील बातम्यांचा उल्लेख केला. वर्तमानपत्रातील बातम्या ख-या असतात काय...(अडथळा)...शहानिशा होऊ द्या..

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.नितीन गडकरी : ज्या शेतकऱ्याने आत्महत्या केली त्याच्या सहीचे पत्र आहे. त्यांनी केलेले आरोप सर्व ठिकाणी प्रसिध्द झाले आहेत.

उपसभापती : श्री.अमित देशमुख यांचे नाव रेकॉर्डवरुन वगळण्यात येईल.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी जे पत्र सादर केले त्या पत्रामध्ये कुठेही श्री.अमित देशमुख यांच्या नावाचा उल्लेख नाही. वडाची साल पिंपळाला लावण्यात काही अर्थ नाही. माननीय मुख्यमंत्र्यांना या संदर्भात नोटीस दिली असेल तर माझे काही म्हणणे नाही. परंतु नोटीस दिली नसेल तर ही बाब रेकॉर्डवरुन वगळली पाहिजे.

(दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करतात)

श्री.नितीन गडकरी : नियम कोणता आहे? तुम्ही थांबवू शकत नाही. तुम्ही लोकांचे तोंड बंद करणार आहात का?

(दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करतात)

उपसभापती : सन्माननीय सदस्यांनी जागेवर बसावे.....(अडथळा)... सन्माननीय सदस्य सर्वश्री अरविंद सावंत व कपिल पाटील यांनी कृपया जागेवर बसावे. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी जी कागदपत्रे दिली त्यामध्ये श्री.अमित देशमुख यांच्या नावाचा कुठेही उल्लेख नाही.

श्री.नितीन गडकरी : इंडियन शुगरच्या अध्यक्षाला तुम्ही जबाबदार आहात असे सही केलेले पत्र दिले. मी तीन नॅशनल टी.व्ही.चॅनेलवर या संदर्भातील बातमी आणि त्याचा एस.एम.एस. प्रसिध्द झालेला स्वत:च्या डोळ्यांनी वाचला आहे. ते वृत्त प्रसारित झाले आहे. त्यांनी आत्महत्येकरिता साखर कारखान्याचे अध्यक्ष माननीय मुख्यमंत्र्यांचे चिरंजीव श्री.अमित देशमुख यांना जबाबदार धरले आहे हे मी पुराव्यानिशी मांडले आहे. या संदर्भातील वृत्त संपूर्ण देशात प्रसारित झाले आहे. आयबीएन-7 व आजतक या दोन्ही चॅनेलवर हे वृत्त प्रसारित झाले आहे. हे वृत्त भारतातच नव्हे तर जगात प्रसारित झाले आहे. त्या आधारे आम्हाला बोलायचा अधिकार नाही? सभागृहाला माहिती उपलब्ध करुन देण्याचा अधिकार नाही? श्री.अमित देशमुख यांचे नाव घ्यायचे नाही?

श्री.दिवाकर रावते : आम्हाला चर्चा करायला देणार आहात की नाही?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : चर्चा करण्यास मी नकार दिलेला नाही. चर्चा नाकारलेली नाही. सरकारने देखील चर्चा करण्याचे मान्य केले आहे. असे असताना पुन्हा तोच मुद्दा उपस्थित करु नये. चर्चा घ्यायचे ठरले आहे. आता अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा सुरु करु. दरम्यानच्या काळात शासनाला या संदर्भात जी माहिती उपलब्ध करुन घ्यावयाची आहे ती माहिती गोळा करुन संबंधित मंत्रीमहोदय सभागृहात उपस्थित होतील.

श्री.नितीन गडकरी : शासनाने चर्चा घेण्यास तयारी दर्शविली आहे का?

उपसभापती : होय. मी चर्चा घेण्यास नकार दिलेला नाही. सभागृहात जो प्रश्न उपस्थित झाला त्याची माहिती शासनाला देण्यात आली असून चर्चेला शासनाची तयारी आहे असे मला कळविण्यात आले आहे.

(नंतर श्री.जुन्नरे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती ...

आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होत असून सभागृहाची बैठक दुपारी 3.30 वाजता पुन: भरेल.

(दुपारी 2.55 ते 3.30 पर्यंत मध्यंतर)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मध्यंतरानंतर)

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

उपसभापती : आपण आता लक्षवेधी सूचनांवर चर्चा सुरु करावी का ?

श्री. पांडुरंग फंडकर : सभापती महोदय, ऊस पिकविणा-या शेतक-यांच्या आत्महत्येच्या प्रस्तावावरील चर्चेला सुरुवात करावी अशी आमची विनंती आहे.

यानंतर श्री. अजित ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

आपण आमचा प्रस्ताव नाकारलेला आहे काय ?

उपसभापती : मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना सांगू इच्छितो की, त्यांनी नियम 289 अन्वये दिलेला प्रस्ताव नाकारला आहे असे म्हटलेले नाही. माझी आपणा सर्वांना विनंती आहे की, आज अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेचा पहिला दिवस आहे. त्यावर प्रथम चर्चा करुन त्यानंतर प्रस्तावावर चर्चा घेऊ.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या प्रस्तावावर चर्चा करण्यास सरकार तयार नाही काय ?

उपसभापती : या संदर्भातील माहिती घेण्यासाठी सरकारलासुध्दा थोडा वेळ दिला पाहिजे. प्रोसिजरप्रमाणे काही गोष्टी पार पाडल्या पाहिजेत.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, नऊ शेतकऱ्यांनी एका दिवसात आत्महत्या केलेल्या आहेत. शेतकऱ्यांसाठी पॅकेज जाहीर करण्यात आले, परंतु त्याचा लाभ त्यांच्यापर्यंत पोहोचलेला नाही. सुप्रीम कोर्टात चुकीचे ॲफीडेव्हीट केले असे सरकार सांगते. पी.एम.ओ.कडून चौकशी सुरु झालेली आहे. या सर्व प्रश्नांची उत्तरे आम्हास मिळावयास पाहिजे.

उपसभापती : मी आपणा सर्वांना सांगू इच्छितो की, या संदर्भातील चर्चा सरकारने नाकारलेली नाही. माझे आपणास एवढेच सांगणे आहे की, आज अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेचा पहिला दिवस आहे. त्यावर चर्चा करु त्यानंतर प्रस्तावावर चर्चा करु.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, नियमाप्रमाणे अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेसाठी सात दिवसांची तरतूद आहे. ती रद्द करुन फक्त दोन दिवस चर्चा केली जाते. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी अतिशय महत्वाचा मुद्दा या ठिकाणी उपस्थित केलेला आहे. अर्थसंकल्पावरील चर्चा संपल्यानंतर म्हणजे रात्रौ 12.00 नंतर या प्रस्तावावर चर्चा करायची काय ? शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा विषय महत्वाचा वाटत नसेल तर तसे आम्हास सांगावे. या महत्वाच्या विषयावरील चर्चा टाळावयाची असेल तर आम्हाला बाहेर जावे लागेल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी या संदर्भातील सूचना दिल्यानंतर प्रश्नोत्तराच्या तासानंतर ही चर्चा उपस्थित करावी असे आपण सांगितले. प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर औचित्याचे मुद्दे मांडण्यात आले. त्यानंतर आपण मध्यांतरासाठी सभागृहाचे कामकाज स्थगित केले. आता सभागृह पुन्हा सुरु झाल्यानंतर या विषयावर चर्चा होणे अपेक्षित आहे.

उपसभापती : चुकीचे रेकॉर्डवर राहू नये म्हणून सांगू इच्छितो की, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी साभागृह सुरु झाल्यानंतर हा प्रश्न उपस्थित केला. त्यावेळी सरकारच्या वतीने मंत्रिमहोदयांनी "या चर्चेस आमची हरकत नाही" असे सांगितले. त्यावेळी मी असे सांगितले की, "या संदर्भातील निर्णय नंतर देतो." मी आपणा सर्वांना सांगू इच्छितो की, सभागृहापुढे इतरही महत्वाचे कामकाज आहे. या प्रस्तावावर चर्चा करण्याचे सरकारने मान्य केलेले आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण या सभागृहाचे ज्येष्ठ सदस्य आहात. आपणास सभागृहाच्या कामकाजाची संपूर्ण माहिती आहे. जेव्हा नियम 289 अन्वये प्रस्ताव मान्य करतो त्यावेळी कामकाजपत्रिकेवरील सर्व कामकाज बाजूला ठेवून प्रथम त्यावर चर्चा करतो, अशी प्रथा, परंपरा आहे. दुसरी गोष्ट म्हणजे या विषयावर चर्चा करण्यास सत्ताधारी पक्ष तयार आहे आणि आम्ही देखील तयार आहोत. असे असताना आपण प्रथम कामकाजपत्रिकेतील कामकाज घेण्याचा आग्रह कशाला धरता ?

श्री.पाशा पटेल : सभापती महोदय,शेतकऱ्यांच्या प्रश्नांच्या संदर्भात सरकार आणि सभागृह गंभीर आहे असा समज बाहेर गेला तर निदान शेतकऱ्यांच्या आत्महत्या तरी कमी होतील. आपण कामकाजपत्रिकेतील कामकाज उरकून नंतर प्रस्तावावर चर्चा घेणार असाल तर शेतकऱ्यांना वाटेल की,त्यांना दुय्यम स्थान देण्यात येते, सभागृहात देखील आपले कोणी नाही.

यानंतर श्री.रोझेकर.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल.....

म्हणून माझी विनंती आहे की, अगोदर ऊसाच्या प्रश्नासंबंधी चर्चा झाली पाहिजे नंतरच इतर कामकाज घ्यावे. हे सभागृह या प्रश्नाकडे गांभीर्याने पहात नाही असे जर शेतक-यांना कळले तर संध्याकाळपर्यन्त आणखी शेतकरी आत्महत्या करतील. म्हणून या प्रश्नाला प्राधान्य द्यावे व चर्चा घ्यावी, अशी माझी विनंती आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मला आठवते की, नियम 289 अन्वये प्रश्नोत्तराचा तास थांबवून शेतक-यांच्या आत्महत्येसंबंधी दिलेल्या प्रस्तावावर चर्चा घ्यावी, अशी मागणी जेव्हा आम्ही केली होती त्यावेळी आपण आम्हाला अशी विनंती केली की, चर्चा घेण्यास हरकत नाही, पण याविषयीची माहिती प्राप्त करुन घेण्यास सरकारला वेळ मिळणे आवश्यक आहे. त्यावेळी आम्ही हे मान्य केले की, ठीक आहे, माहिती मिळविण्याकरिता सरकारला वेळ पाहिजे असेल तर लक्षवेधी वगैरे कामकाज घ्यावे. परंतु, त्यावेळी सभागृहात उपस्थित असलेल्या सन्माननीय मंत्र्यांनी ताबडतोब चर्चा घेण्यास सरकार तयार आहे, असे उत्तर दिले होते. त्यावेळी अर्थसंकल्पावरील चर्चा वगैरे असा विषय नव्हता. सभापती महोदय, आपण अशाप्रकारे आमच्या अधिकारावर अतिक्रमण होईल, असे आदेश देऊ नयेत, अशी आपल्याला विनंती आहे. सरकारने चर्चा घेण्यासंबंधी निवेदन केल्यानंतर माहिती मिळविण्यासाठी अर्धा-एक तास लागणार असेल तर तेवढया वेळेमध्ये जेवढे कामकाज होईल तेवढे घ्यावे, त्यायोगे ज्यांचे कामकाज असेल त्या सन्माननीय सदस्यांना न्याय मिळेल, यासाठी आम्ही होकार दिला होता. परंतु, आम्हाला ही चर्चा तातडीने हवी आहे. माहिती उपलब्ध झाल्याशिवाय चर्चेला सामोरे जायचे नसेल तर तोपर्यन्त इतर कामकाज घेऊन त्या कामकाजाला न्याय द्यावा, एवढयापुरता तोडगा आपण काढला होता.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, विरोधी पक्षाने नियम 289 अन्वये सर्व कामकाज स्थगित करुन चर्चा घ्यावी, अशी मागणी विरोधी पक्षाने केल्यानंतर प्रश्नोत्तरे, लक्षवेधी सूचना, इतर कामकाज झाल्यानंतर चर्चेला सरकारची तयारी आहे, असे सन्माननीय मंत्र्यांनी म्हटले असते तर गोष्ट वेगळी. पण सन्माननीय मंत्र्यांनी ब्लाईंडली सांगितले की, चर्चा घेण्यास सरकारची तयारी आहे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, त्यांना तसेच अभिप्रेत होते.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांना त्या मंत्र्यांच्या मनातील कसे कळले ? तुमचे मंत्री चूक करीत असतील तर अशा प्रकारे सावरता का ? आपलेच मंत्री सांगतात की, आम्ही चर्चेला एका पायावर तयार आहोत.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सभागृहात ज्यावेळी नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाबाबत चर्चा झाली त्यावेळी मी आणि सन्माननीय मंत्री, श्री.अनील देशमुख सभागृहात उपस्थित होतो. ज्यावेळी अशी विचारणा झाली की, चर्चेला सरकार तयार आहे का ? त्यावेळी सरकारची हरकत नाही, सरकार या प्रकरणी गंभीर आहे, चर्चेला सरकारची तयारी आहे, असे उत्तर सन्माननीय मंत्री, श्री.अनील देशमुख यांनी दिले. याचा अर्थ, लगेच तयार आहोत, असा नाही. कार्यक्रम पत्रिकेतील कामकाज होईल व त्यानंतर चर्चा होईल. असे सांगितले गेले नाही की, लगेच चर्चेला तयार आहोत. त्यामुळे जी चर्चा झाली नाही त्याचा संदर्भ देणे, बरोबर नाही.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री, श्री.बबनराव पाचपुते यांनी आता जे सांगितले आहे, तसेच जर रेकॉर्डवर असेल तर ते मान्य करण्याची आमची तयारी आहे. नियम 289 चा अर्थ असा आहे की, कार्यक्रम पत्रिकेवरील सर्व कामकाज स्थगित करावे. सभागृहासमोरील सर्व कामकाज स्थगित करुन चर्चा घ्यावी, असा नियमाचा अर्थ आहे आणि आम्ही तोच नियम कोट केलेला आहे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, आजच्या कार्यक्रम पत्रिकेवर दाखविण्यात आलेले अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा हे कामकाज महत्वाचे आहे आणि विरोधी पक्षाने आत्महत्येसंबंधी उपस्थित केलेला प्रश्न देखील महत्वाचा आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे मी नियमाप्रमाणे सांगतो, माझे चुकले तर आपण मला सांगा. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी नियम क्रमांक 289 प्रमाणे सभागृहाचे कामकाज स्थगित करुन तातडीने शेतक-यांच्या आत्महत्येसंबंधी चर्चा घ्यावी, अशा प्रकारची मागणी केली आहे. त्यांनी नियम क्रमांक 289 चा वापर केला, याचा अर्थ, सगळे कामकाज स्थगित करुन चर्चा घ्यावी, असा आहे. त्यावेळी सभागृहात उपस्थित असलेले मंत्री महोदय म्हणाले की, चर्चा करण्यास आमची तयारी आहे. नियम 289 हे सांगतो की, कामकाज स्थगित करुन चर्चा घेतली पाहिजे. सन्माननीय मंत्र्यांनी चर्चा घेण्यास तयार आहोत, असे सांगितले, त्याऐवजी त्यांनी कंडिशनल तयारी आहे, असे सांगितले असते तर हरकत नव्हती.

..3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, चर्चा करण्यास सरकारची हरकत नाही. विरोधी पक्षाकडून ज्या सन्माननीय सदस्यांना चर्चेला सुरुवात करावयाची असेल त्यांना करु द्यावी.

यानंतर कुमारी जयश्री.....

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.:राज्यात आत्महत्या करणा-या शेतक-यांच्या संख्येत होत असलेली लक्षणीय वाढ

मु.शी.: राज्यात आत्महत्या करणा-या शेतक-यांच्या संख्येत होत असलेली लक्षणीय वाढ या विषयावर श्री.पांडुरंग फुंडकर,वि.प.स.यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

उपसभापती : या अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. सूचना देणारे सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्ष नेता) : महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 97 अन्वये पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो.

" ज्याअर्थी,राज्यातील आघाडी शासनाने डिसेंबर,2006 च्या अधिवेशनात शेतक-यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी पॅकेजची घोषणा केल्यानंतरही आत्महत्या करणा-या शेतक-यांच्या संख्येत वाढ झालेली आहे, आणि,

ज्याअर्थी,गेल्या 24 तासात विदर्भातील अंकुश लटाळ,अकोला,नामदेव टाक, अकोला, बबन निभटे, वाशिम, रमेश निमाने, वाशिम, सुरेश कदम, वर्धा, किष्टन्ना देशट्टीवार, यवतमाळ, टिकाराम, थुटुरकार,नागपूर, प्रभाकर काळे, वर्धा, भगवंतराव फुंडकर ,अमरावती या 09 शेतक-यांनी केलेल्या आत्महत्या, आणि,

ज्याअर्थी,मार्च,2007 मध्ये विदर्भातील आत्महत्या करणा-या शेतक-यांची संख्या 84 च्या वर पोहोचलेली असणे, आणि,

ज्याअर्थी,लातूर जिल्हयातील अहमदपूर तालुक्यातील वंजारवाडी गावातील तरुण शेतकरी श्री.नागनाथ श्रीरंग आरदवाड (32 वर्षे) या तरुण शेतक-यांनी मुख्यमंत्री महोदयांचा साखर कारखान्याचे व्यवस्थापन कारखान्यामध्ये ऊस नेत नाहीत, म्हणून दिनांक 25 मार्च,2007 रोजी वंजारवाडी शिवारातील एका चिंचेच्या झाडास गळफास लावून आत्महत्या केली असणे, आणि,

ज्याअर्थी , गेल्या 20 मार्च,2007 रोजी गंगापूर,जि.लातूर येथील एक तरुण शेतकरी श्री.फुलारी यांनी आपल्या शेतातील ऊस मुख्यमंत्री महोदयांचा साखर कारखाना घेऊन जात नाही, या कारणास्तव गळफास लावून आत्महत्या करण्याची घटना उघडकीस येणे, आणि,

ज्याअर्थी, मोफत वीजेच्या घोषणेप्रमाणे आत्महत्या रोखण्यासाठी घोषित केलेले पॅकेजही पोकळ असल्याची शेतक-यांची खात्री होणे,आणि,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

ज्याअर्थी, आत्महत्या केलेल्या शेतक-यांपैकी निम्म्या शेतक-यांच्या कुटुंबियांनाही शासनाने जाहीर केलेली मदत मिळालेली नसणे, आणि,

ज्याअर्थी,बोगस बियाणे,बोगस किटकनाशके,नापिकी,गारपीट यासारख्या विविध संकटामुळे शेतकरी हवालदिल झालेला असून, शासनाकडून काही दिलासा मिळेल अशी त्याला काडीमात्र आशा उरलेली नाही व त्यामुळे आत्महत्यांच्या प्रमाणात झालेली वाढ,आणि,

त्याअर्थी,या अतिशय गंभीर व तातडीच्या विषयाबाबत चर्चा करण्यासाठी सभागृहाचे सर्व कामकाज बाजूला करुन शेतक-यांच्या अतिशय जिव्हाळयाच्या व ज्वलंत विषयावर चर्चा करण्यात यावी.

सभापती महोदय, या सभागृहात हा जो प्रश्न या चर्चेच्या माध्यमातून उपस्थित झालेला आहे, तो अतिशय गंभीर आणि तातडीचा आहे. या राज्यामध्ये वर्ष दोन वर्षामध्ये कापूस उत्पादक शेतक-यांच्या आत्महत्येचे प्रमाण वाढलेले आहे. आघाडीचे सरकार सत्तेवर आल्यामुळे महाराष्ट्रामध्ये सात वर्षामध्ये जवळपास साडे तीन हजार शेतक-यांनी आत्महत्या केल्या आहेत. माननीय मुख्यमंत्री साहेबांनी शेतक-यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी 1,050 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले होते. माननीय मुख्यमंत्र्यांनी सदर पॅकेज जाहीर केल्यानंतर दोन महिन्यातच या देशाच्या माननीय पंतप्रधानांनी विदर्भाला भेट दिली व आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या कुटुंबियांची विचारपूस केली. माननीय पंतप्रधान साहेबांनी सुध्दा शेतक-यांच्या आत्महत्या थांबविण्याकरिता 3,750 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले होते. दोन्ही पॅकेज जाहीर झाल्यानंतर असे वाटले होते की, शेतक-यांच्या आत्महत्या थांबतील, परंतु माननीय मुख्यमंत्री महोदयांनी जे पॅकेज जाहीर केले त्यातील खरी मेखच शेतक-याला समजली नाही. माननीय मुख्यमंत्र्यांच्या पॅकेजमधील पहिला मुद्दा असा होता की, शेतकऱ्यांच्या कापूस एकाधिकार खरेदी योजनेंतर्गत चढ -उतार निधीचा 750 कोटी रुपये इतका जो पैसा आहे, तो या पॅकेजअंतर्गत शेतक-याला दिला जाईल. कापूस एकाधिकार खरेदी योजना ही या राज्यात सन 1972 सालापासून सुरु झाली, सन 1972 पासून कापूस चढ - उतार निधीच्या नावाखाली कापूस उत्पादक शेतक-याची तीन टक्के रक्कम कापूस विकण्याच्या वेळेस कापून घेण्यात येत होती. गेल्या दोन वर्षामध्ये या राज्यातील कापूस एकाधिकारी खरेदी योजना बंद झालेली आहे, आता कापूस एकाधिकार खरेदी योजनेचा कायदा अस्तित्वातच नाही. यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर .....

कापूस एकाधिकार योजना ज्या दिवशी बंद होईल त्या दिवशी शेतक-यांच्या चढउतार निधीचे 750 कोटी रुपये शेतक-यांच्या मालकीचे होणार होते. शेतक-यांच्या चढउतार निधीचे 750 कोटी रुपये आपल्याला द्यावयाचे आहेत आणि आता दिले नाही तर कायद्याने केव्हा तरी ते द्यावेच लागतील म्हणून माननीय मुख्यमंत्र्यांनी पॅकेज जाहीर केले. माननीय मुख्यमंत्र्यांनी 750 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले आणि अशी घोषणा केली गेली की, या पॅकेजमध्ये शेतकऱ्यांचे 3 टक्क्याचे चढउतार निधीचे पैसे शेतक-यांना दोन टप्प्यांमध्ये दिले जातील. माननीय पंतप्रधान विदर्भाच्या दौ-यावर आले आणि त्यांनी विदर्भातील 6 जिल्हयांसाठी पॅकेज जाहीर केले. माननीय पंतप्रधानांच्या पॅकेजसंदर्भात आणि माननीय मुख्यमंत्र्यांच्या पॅकेजसंदर्भात आम्ही वारंवार मागणी केली की, या दोन्ही पॅकेजचा लाभ विदर्भातील 6 जिल्हयातीलशेतक-यांना किती झाला आणि कशा पद्धतीने झाला ? याची श्वेतपत्रिका शासनाने काढावी. परंतु श्वेतपत्रिका काढयात आली नाही. पॅकेजचा दिंडोरा पिटला गेला. तहसीलदार, जिल्हाधिकारी यांनी गावोगावी जाऊन सभा घेतल्या आणि पॅकेजची माहिती शेतक-यांना देण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर सुध्दा शेतक-यांच्या आत्महत्या थांबल्या नाहीत. जानेवारी, 2007 ते मार्च, 2007 या तीन महिन्यांमध्ये 275 शेतक-यांनी आत्महत्या केल्या. कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सत्र अजूनही सुरुच आहे. अर्थसंकल्प मांडण्यापूर्वी माननीय मुख्यमंत्र्यांनी असे सांगितले की, शेतक-यांच्या आत्महत्यांचा आकडा आता हळूहळू कमी होत आहे. माननीय मुख्यमंत्र्यांना मी सांगू इच्छितो की, रेकॉर्डवर आत्महत्यांचा आकडा कमी होत असला तरी शासनाचे अधिकारी पंचनामा व्यवस्थित करीत नाहीत. शासनाचे अधिकारी आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या कुटुंबाला धमकी देऊन स्टेटमेंट तयार करतात आणि शेतक-याची आत्महत्या झालेली नाही, असे दाखविण्याचा प्रयत्न करतात. मी आपल्याला अशी 10 उदाहरणे देऊ शकतो. आम्हाला दु:ख याचे आहे की, अजूनही कापूस उत्पादक शेतक-यांच्या आत्महत्यांचे सत्र सुरुच आहे. आम्हाला असे वाटत होते की, कापूस उत्पादक शेतक-यांवर संकट आलेले आहे. शेतक-यांच्या कापसाला भाव मिळत नाही. सरकारने जाहीरनाम्याने कापसाला 2700 रुपये प्रती क्विंटल भाव देण्याची घोषणा केली, कर्ज माफीची घोषणा केली, मोफत वीज देण्याची घोषणा केली. ज्यावेळी हिवाळी अधिवेशन सुरु झाले त्यानंतर 15 दिवसांनी कापसाचा हंगाम सुरु

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर .....

होणार होता. त्यावेळी मी माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांना विचारले की, तुमच्या सरकारने जो जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे त्यामध्ये कापसाला 2700 रुपये क्विंटल भाव देण्याची घोषणा केलेली आहे. आता 15 दिवसांनी कापसाचा हंगाम सुरु होत आहे. सरकार यावर्षी शेतकऱ्यांच्या कापसाला काय भाव देणार आहे ? त्यावेळी टिंगल टवाळी केली गेली. जाहीरनाम्यामध्ये 2700 रुपये भाव जाहीर केलेला असला तरी तो याच वर्षी दिला पाहिजे असे आम्ही लिहिलेले नाही, असे ते गमतीने म्हणाले. सभापती महोदय, ते रेकॉर्ड झालेले आहे. पहिल्या वर्षी शेतकऱ्यांच्या कापसाला 2700 रुपये भाव मिळाला नाही. केंद्र शासनाने हमी भाव जाहीर केला त्याप्रमाणे कापसाची खरेदी गेली गेली. राजा उदार झाला आणि कापूस उत्पादक शेतक-याच्या हाती भोपळा दिला. दोन हेक्टर पर्यंत हेक्टरी एक हजार रुपये अनुदान दिले गेले. म्हणजे एका हेक्टरला फक्त एक हजार रुपये अनुदान दिले. यावर्षी अनुदान वाढविण्यात आले आहे. यावर्षी 1500 रुपये अनुदान देण्याचे जाहीर केलेले आहे. दोन हेक्टरपर्यंत 1500 रुपये अनुदान, म्हणजे 5 एकरासाठी फक्त 3000 रुपये अनुदान देण्यात येणार आहे. कापूस उत्पादक शेतकरी एकरी सरासरी 5 क्विंटल कापसाचे उत्पन्न काढतो. एका करामध्ये 5 क्विंटल कापसाचे उत्पन्न होत असेल तर एका क्विंटलसाठी फक्त 100 रुपये वाढ देण्यात येणार आहे. आज व्यापारी 2500 ते 2600 रुपये दराने कापूस खरेदी करीत आहेत. सरकार फक्त 100 रुपये वाढ देणार आहे.

यानंतर श्री.गागरे .....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखाची नाही

श्री.पांडुरंग फुंडकर .....

दुसऱ्या बाजूला महागाई प्रचंड वाढत चालली आहे, शेतकऱ्यांचा अशा प्रकारे तोटा होत चाललेला आहे, अशा वेळी शेतकरी मरणार नाही तर काय करणार ?. कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळले जात आहे, आत्महत्येचे राजकारण केले जात आहे. ज्यावेळी विदर्भातील शेतकरी जात्यात होता, त्यावेळी मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी सुपात होते. सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल त्यावेळी हसत होते. विदर्भातील शेतकरी आत्महत्या करीत होते, त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांना म्हणायचो, आम्ही जात्यात आहोत तर तुम्ही सुपात आहात. या वर्षीपासून मराठवाडयामध्ये आत्महत्तेचा श्रीगणेशा सुरु झाला आहे. शेतकरी आत्महत्या का करीत आहेत ? मागच्या अधिवेशनामध्ये इशारा दिला होता की, कापूस उत्पादक शेतकऱ्यांना योग्य भाव मिळत नसल्याने ते आत्महत्या करीत आहेत. आता वीज टंचाईमुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या सुरु झाल्या आहेत.

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.उल्हास पवार)

माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा उल्लेख आलेला आहे. अमरावती जिल्हयातील एका शेतकऱ्याचा फॅक्स आला आहे. श्री.रामराव मते या अमरावतील जिल्हयातील शेतकऱ्याने आत्महत्या केली आहे. एमएसईबीचे अधिकारी श्री.वईके व श्री.राजपूत यास जबाबदार आहेत, असे त्या शेतकऱ्याने पत्र लिहून ठेवले आहे. या शेतकऱ्याने गहू लावला होता, गव्हाला पाणी दिले जात होते पण या दोन अधिकाऱ्यांनी त्याची पाईपलाईन काढून टाकली. विजेचे कनेक्शन कापले म्हणून त्या शेतकऱ्यास आत्महत्या करावी लागली. विजेच्या व कापसाच्या प्रश्नावर आत्महत्या झालेल्या आहेत. आता उसाच्या प्रश्नावर महाराष्ट्रामध्ये शेतकरी आत्महत्या करीत आहेत. उसाच्या प्रश्नावरुन माननीय मुख्यमंत्र्यांच्या विभागात नुकतीच एका शेतकऱ्याने आत्महत्या केलेली आहे. गंगापूर तालुक्यात फुलारी नावाच्या एका तरुण शेतकऱ्याने आत्महत्या केली आहे. त्याचा ऊस कारखाना घेऊन जात नव्हता म्हणून त्याने गळफास लावून आत्महत्या केली. उस उत्पादक शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी तातडीने बैठक घेतली आहे. परवा मराठवाडयातील सर्व आमदारांची बैठक घेतली. विरोधी पक्षाचे असावेत म्हणून

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर .....

आम्हाला बोलावले नाही. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे मराठवाडा विभागात काम करतात, त्यांनाही बोलावले नाही. सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल बैठकीस पाठविले. आता माननीय मुख्यमंत्री सांगत आहेत की, सन्माननीय सदस्य श्री.गोपीनाथ मुंडे हे या बैठकीस हजर होते व त्यांच्या आग्रहाखातर बैठक बोलावली होती.

सभापती महोदय, मराठवाडयामध्ये आज 9 लाख टन अतिरिक्त ऊस उभा आहे. संपूर्ण राज्यात 35 लाख टन ऊस उभा आहे. आता कारखाने बंद व्हायची वेळ आलेली आहे. मी उस उत्पादक शेतकऱ्यांच्या भावना वाचू व समजून घेऊ शकत असल्याने मला माहिती आहे. उसाचा कारखाना जास्त दिवस चालला तर त्याचा उतारा कमी होऊन 9 टक्केपर्यंत येतो. त्यामुळे उशिरा गाळप करणे त्यांना परवडत नाही. 9 लाख टन ऊस उभा असेल तर व तोडून न्यायची तयारी कोणी दाखवित नसेल तर शेतकऱ्यांनी काय करायचे ? या शेतकऱ्याने तर गळफास लावून आत्महत्या केली, पुढे जाऊन असे होऊ नये की, एखादा शेतकरी तोच ऊस पेटून देईल व त्यामध्ये शेतकऱ्याचे कुटुंब जळून जाईल. अशा प्रकारची परिस्थिती निर्माण होऊ नये याची काळजी सरकारने घेतली पाहिजे.

दिनांक 20.3.2007 रोजी एक घटना घडली. मौजे वंजारवाडी येथील शेतकऱ्यांनी त्यांचा ऊस कारखान्यास घेऊन जाण्यासाठी कारखान्याच्या सरव्यवस्थापकाला पत्र दिले. यानंतर 25.3.2007 रोजी त्याच कारखान्याच्या परीसरात वंजारवाडी येथे नागनाथ श्रीरंग आरदवाड वय 32 या तरुण शेतकऱ्याने आत्महत्या केली. कारण कारखान्याला विनंती करुनही त्याचा ऊस कारखान्याने नेलेला नव्हता. या शेतकऱ्याने शेतातील चिंचेच्या झाडाला गळफास लावून आत्महत्या केली. आत्महत्या करण्याआधी या परिसरातील शेतकऱ्यांनी कारखान्याच्या सरव्यवस्थापला एक पत्र लिहिले होते हे पत्र मी वाचून दाखवितो, त्या पत्रावर आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याची सही आहे.

या नंतर श्री.सुंबरे

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, हे पत्र त्यांनी माननीय सरव्यवस्थापक, इंडो शुगर्स लि. उजना, ता. अहमदपूर, जिल्हा लातूर यांना 'मौजे वंजारवाडी येथील ऊस कारखापन्यास घेऊन जाणे बाबत' या विषयी लिहिलेले आहे. पत्रात असे म्हटलेले आहे की,

" आदरणीय महोदय, वरील विषयी विनंतीपूर्वक अर्ज करण्यात येतो की, मौजे वंजारवाडी हे गाव इंडो शुगर्स लि., उजना या साखर कारखान्याच्या हद्दीत आहे. आमच्या गावात 200 हेक्टर ऊसाचे क्षेत्र असून संपूर्ण ऊस हा 671 जातीचा आहे. आमच्या येथै सध्या 20,000 टन ऊस हा शिल्लक असून आम्हा शेतकऱ्यांच्या जीवन मरणाचा प्रश्न निर्माण झालेला आहे.

आमच्या गावात सध्या कारखान्याची एकही गाडी ऊसतोडीसाठी चालू नाही. इंडो शुगर्स लि. उजना चे शेती विभाग प्रमुख श्री.देशमुख साहेब हे जाणून बुजून, हेतुपुरस्सरपणे वंजारवाडी येथे एकही गाडी देत नाहीत. वंजारवाडी येथील शेतकऱ्यांच्या उपजीविकेचे साधन एकमेव ऊसावर अवलंबून आहे. त्यांचा ऊस कारखान्याने नाही नेल्यास त्यांना आत्म्हत्येशिवाय कोणताही पर्याय शिल्लक राहात नाही. त्यांचे जीवन उद्ध्वस्त होण्यास केवळ शेती विभाग प्रमुख श्री.देशमुख साहेब हेच कारणीभूत ठरणार आहेत.

इंडो शुगर लि. उजना यांनी वंजारवाडी येथील शेतकऱ्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून 10 ट्रक किंवा ट्रॅक्टर लावून ऊस कारखान्यास घेऊन जावा अन्यथा आम्ही खालील शेतकरी दिनांक 26.3.2007 पासून इंडो शुगर लि. उजना या कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसणार आहोत, याची कृपया नोंद घ्यावी. "

सभापती महोदय, या पत्राखाली एकंदर 29 शेतकऱ्यांच्या नावानिशी सह्या आहेत आणि त्यामध्ये आत्महत्या केलेल्या कै.नागनाथ श्रीरंग आरदवाड यांचीही सही आहे. सभापती महोदय, यावरून ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या आपल्या शेतातील ऊसासंबंधीच्या भावना किती तीव्र आहेत हे दिसून येते. त्यामुळेच आपण शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या विषयाला प्रॉयॉरिटी दिली पाहिजे. सभापती महोदय, या ठिकाणी माननीय अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्प मांडल्यानंतर त्यावर प्रतिक्रिया देताना 'महाराष्ट्र राज्य हे पहिल्या क्रमांकाचे राज्य होईल' असे माननीय मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे. पण ज्या राज्यामध्ये शेतकरी अशा प्रकारे मरत आहेत, आत्महत्या करीत आहेत आणि तरी देखील तेथील राज्यकर्ते सांगत आहेत की, आमचे राज्य देशातील नंबर एकचे राज्य आहे. तर

..... इइ 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. फुंडकर ....

असे सांगणाऱ्यांची कींव करावी तेवढी थोडीच आहे. ज्या राज्यातील शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची पाळी येत असेल आणि तरीही राज्यकर्ते स्वत:ची पाठ थोपटून घेत असतील तर परमेश्वरच त्या राज्याला आणि राज्यातील सर्वसामान्य जनतेचे, शेतकऱ्यांचे रक्षण करो असे म्हणण्याची पाळी आमच्यावर आली आहे. सभापती महोदय, देशाला स्वातंत्र्य मिळून 60 वर्षे झाली तरीही अजून देखील अन्नदात्या शेतकऱ्यासाठी कोणीही राज्यकर्ता उभा राहत नाही. कापूस उत्पादक शेतकरी कापसाला भाव मिळत नाही म्हणून आत्महत्या करीत असतानाच दुसरीकडे विजेसाठी देखील शेतकरी आत्महत्या करू लागला आणि असे होत राहणार असेल तर कोठला शेतकरी जगणार आहे ? शेतकरी जगला नाही तर येथे बसणारे कोणीही जगू शकणार नाही याची दखल आपण घेतली पाहिजे. सभापती महोदय, मला वाटले होते की, शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या संदर्भात शासनाकडून काही स्पष्ट असे धोरण अर्थसंकल्पामधून जाहीर करण्यात येईल. परंतु संपूर्ण अर्थसंकल्पाच्या भाषणातून कोठेही राज्यात शेतकऱ्यांच्या होत असलेल्या आत्महत्यांविषयासंबंधात उल्लेखही करण्यात आलेला नाही वा त्या दृष्टीने काही खास तरतूद केली आहे. त्यामुळे या राज्यामध्ये एकूणच शेतकऱ्यांमध्ये प्रचंड उदासीनतेचे वातावरण निर्माण झालेले आहे. सभापती महोदय, शेतकऱ्यांमध्ये असलेले हे उदासीनतेचे वातावरण किती असावे ? नागपूर मधील शेतकऱ्यांची तर आई जेवू घालीना आणि बाप भीक मागू देईना अशी अवस्था झालेली आहे. त्यामुळे आता तेथील शेतकरी न्यायालयाकडे जाऊ लागला आहे. आत्महत्या करण्यापेक्षा इच्छामरण तो मागू लागला आहे. त्यासाठी त्यांनी न्यायालयामध्ये एक याचिका केली आहे की, आम्हाला इच्छामरणाला परवानगी द्यावी. सभापती महोदय, या राज्यामध्येच नव्हे तर संपूर्ण देशामध्ये पहिल्यांदाच अशा प्रकारची याचिका कोणा शेतकऱ्याकडून दाखल केली गेली असेल. मी आपल्याला दोन मिनिटांमध्ये सदरच्या रिट याचिकासंबंधात वाचून दाखवितो. "पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी विदर्भातील शेतकऱ्यांसाठी कोट्यवधी रूपयांचे पॅकेज जाहीर करूनही त्यांच्या मागील शुक्लकाष्ठ संपलेले नाही. बँकेचे कर्ज फेडूनही वसुलीसाठी तगादा लावल्याने तसेच घर व जमीन ताब्यात घेण्याची धमकी दिल्याने सहा शेतकऱ्यांनी अखेर मृत्यूला कवटाळण्याचे ठरविले आहे. त्यांनी न्यायालयात धाव घेऊन इच्छामरणाची परवानगी मागणारी याचिका दाखल केली आहे. सर्वश्री कवडू तिडके, कैलास इंगोले, उत्तम मोहोड, संतोष सवाईमून, नीळकंठ तिडके या

..... इइ 3 ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. फुंडकर ....

शेतकऱ्यांनी ही याचिका दाखल केली आहे. हे सर्व शेतकरी नागपूर जिल्ह्यातील मालेगाव व भिवापूर येथील रहिवासी आहेत. शेतकऱ्यांच्या अशिक्षितपणाचा फायदा उचलून त्यांची शेती व घरेसुद्धा गहाण करून घेतल्याचा उल्लेख याचिकेत करण्यात आला आहे. याचिकाकर्त्यांनी बँकेने त्यांना दिलेले सर्व कर्ज परतफेड केल्याचा दावा केला आहे. "

(यानंतर श्री.सरफरे ..... एफएफ 1 ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

घाम गाळणे आणि कष्ट करणे हेच त्याच्या हातामध्ये होते. अशाप्रकारे कष्ट करुन, कर्ज काढून, नवीन बियाणे आणून व त्याची शेतामध्ये पेरणी करुन पांढरे शुभ्र सोन्यासारखे कापसाचे पीक आणि मोत्यासारखी ज्वारी पिकविणाऱ्या शेतकऱ्याच्या मालाला योग्य भाव मिळाला नाही तर तो बँकेच्या कर्जामध्ये बुडतो. पुन्हा रब्बीचे पिक घेण्यासाठी, शेतामधील विहिरीमध्ये, नदीमध्ये असलेले पाणी उचलण्यासाठी वीजेच्या लोड शेडींगमुळे त्याच्या पंप चालत नसतो आणि उभे पीक वाळत चालले असते. त्यामुळे त्याच्यावर कर्जबाजारी होण्याची वेळ आलेली असेल तर या शेतकऱ्याला आत्महत्त्येशिवाय दुसरा कोणताही पर्याय नाही. या राज्यातील चार लाख शेतकरी अशाप्रकारे आत्महत्त्येच्या वाटेवर चालले आहेत. हे राज्य सरकार इतके निर्ढावलेले आणि सुस्तावलेले आहे, त्याची दखल घ्यायला तयार नाही अशी स्थिती निर्माण झाली आहे. अनेक माननीय सदस्यांना चर्चेमध्ये भाग घ्यावयाचा असल्यामुळे मी सभागृहाचा अधिक वेळ घेणार नाही. शेतकऱ्यांच्या आत्महत्तेच्या प्रश्नामध्ये या सरकारने निराशा दाखविली आहे. हे सरकार उदासीन आणि संवेदनशून्य झाले आहे. डोळे असून या राज्य सरकारला अन्नदात्या शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या दिसत नाहीत, कान असून ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या किंकाळया ऐकावयास येत नाहीत. आणि पाय असून चालता येत नाही. अशाप्रकारे आंधळे आणि लुळे-पांगळे असलेले सरकार काम करीत असून दुसऱ्या बाजूला अन्नदाता शेतकरी आत्महत्त्या करीत आहे अशाप्रकारचे दारुण चित्र राज्यात निर्माण झाले आहे . म्हणून या प्रश्नावर अतिशय गांभीर्याने विचार करुन या आत्महत्त्या रोखण्यासाठी ठोस अशाप्रकारची कोणती उपाय योजना केली जाणार आहे हे माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहामध्ये सांगून शेतकऱ्यांपर्यंत तो मेसेज जाण्याची आवश्यकता आहे एवढे सांगून मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी (नागपूर विभाग पदवीधर) : सभापती महोदय, ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची परिस्थिती अतिशय चिंताजनक आहे. गेल्या चार महिन्यामध्ये 655 शेतकऱ्यांनी आत्महत्त्या केल्या आहेत. त्यामध्ये गेल्या दोन-तीन दिवसामध्ये आत्महत्त्या केलेल्या शेतकऱ्यांची संख्या समाविष्ट केली तर ही संख्या 675 ते 680 पर्यंत पोहोचते. शेतकरी आत्महत्त्या कां करीत आहेत? ते आपल्या गळयाला फास का लटकवीत आहेत? त्यांच्या मानेला खाज सुटली आहे काय? ते मुद्दाम आपल्या गळयामध्ये फास लटकवीत नाहीत. कर्जाच्या बोज्यामुळे आणि नापिकीमुळे शेतकऱ्याला जीवन जगणे कठीण झाले आहे. शेतकऱ्यांवर अस्मानी आणि सुलतानी संकट आले आहे. त्यामुळे शेतकरी सतत आत्महत्त्या करीत आहेत. काल विदर्भामध्ये एका दिवसामध्ये 9 शेतकऱ्यांनी आत्महत्त्या केल्या. पिठल्यामध्ये इंडो-सल्फा नावाचे औषध मिसळून ते खाऊन घेतले. त्याची पोलिसांमध्ये नोंद नाही, विष प्राशन करुन त्यांनी आत्महत्त्या केली. या आत्महत्त्यांचे जरी हे कारण असले तरी त्यावर सरकारने उपाय योजना करण्याची आवश्यकता आहे. याठिकाणी माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील यांचे अभिनंदन करतो. तुमचा पक्ष आणि तुमचे नेते हे अतिशय राजकारणी आणि मुत्सद्दी आहेत. ऊर्जा खाते तुमच्याकडे आहे, अर्थखाते तुमच्याकडे आहे, जलसंधारण खाते तुमच्याकडे आहे. अशाप्रकारची सर्व खाती तुमच्याकडे असतांना हे सर्व कॉग्रेसच्या गळयामध्ये लटकविता हे तुमचे कसब आहे, तुम्ही लाजबाब आहात. माननीय पंतप्रधानांनी पॅकेज जाहीर केले. खरे म्हणजे माननीय मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख, आपल्या लक्षात आणून दिले होते की, कार्यकर्त्यांच्या पाठीमागे कसे उभे रहावे याचे उदाहरण राष्ट्रवादी कॉग्रेसने घालून दिले आहे. 712 कोटींचे पॅकेज आणून दिले ते ज्या सहा जिल्हा सहकारी बँका दिवाळखोरीमध्ये गेल्या. त्यामध्ये अकोला जिहा बँकेचे चेअरमन श्री. सुभाष कोरपे आहेत, वर्धा जिल्हा बॅकेचे चेअरमन श्री. सुधाकर देशमुख आहेत, बुलढाणा जिल्हा बॅकेचे चेअरमन डॉ. राजेंद्र शिंगणे आहेत, यवतमाळ जिल्हा बॅकेचे चेअरमन श्री. मनोहर नाईक आहेत, वाशिम जिल्हा बॅकेचे चेअरमन श्री. सुभाष ठाकरे आहेत आणि अमरावती जिल्हा बॅकेचे चेअरमन श्री. हर्षवर्धन देशमुख आहेत या सर्व सहा जिल्हा सहकारी बँका राष्ट्रवादी कॉग्रेसच्या ताब्यात आहेत. माननीय पंतप्रधानांच्या पॅकेजमधील 712 कोटी रुपये या सहा बँकांना वाटले आहेत.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी (पुढे सुरु...

त्यांचा एन.पी.अे. झाला होता. जिल्हा सहकारी बँक तुमच्या कार्यकर्त्यांच्याकडे आहे. तुमचे कार्यकर्ते त्या बँकेचे अध्यक्ष आहेत. प्रधानमंत्री येथे आले, त्यावेळेस माननीय मुख्यमंत्री श्री.देशमुख साहेब आपण त्यांच्याबरोबर होता. माननीय शरद पवार साहेबांनी दिल्लीमध्ये काय जादुची कांडी फिरविली माहीत नाही. ते डायनामिक नेते आहेत. ज्या बँका बरखास्त करण्यास सहकारी मंत्री डॉ.पतंगराव कदम निघाले होते त्यामध्ये बुलढाणा जिल्हा बॅकेचा समावेश होता. त्याचवेळेला 712 कोटी रुपये या बँकांना मिळाले. त्यामुळे डबघाईला आलेल्या बँकांची आर्थिक स्थिती सुधारली. नाव शेतकऱ्यांचे आणि भले झाले बँकांचे. सुप्रीम कोर्टामध्ये रिट अर्जाच्या संदर्भाने पॅकेजच्या संदर्भात राज्य सरकारने अफिडेव्हीट केले. त्याच वेळेस श्री.पवार साहेबांनी राज्य सभेमध्ये सांगितले की, सहा महिन्यापूर्वीच पॅकेजमधील 1530 कोटी रुपये महाराष्ट्र सरकारला दिलेले आहेत. पंतप्रधान विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत असल्याचे कळल्यानंतर येथे आले असतांना त्यावेळेला त्यांनी या संदर्भाने का सांगितले नाही ? पॅकेज एक वर्षापूर्वी दिले म्हणून का सांगितले नाही ? हे कृषी मंत्री, आता क्रिकेट क्षेत्राचीही वाट लावत आहेत. सहा महिन्यापूर्वी पैसे दिले असे सांगतात. म्हणजे 3750 कोटी रुपयाचे पॅकेज येणार आहे, त्यापूर्वी 1530 कोटी रुपये अॅडव्हान्स म्हणून सहा महिन्यापूर्वी देऊन टाकलेले आहे, असे म्हणावयाचे आहे काय ? पॅकेज ज्यावेळेस घोषित झाले त्याचा अर्थ असा की, त्या घोषणेनंतर पैसे मिळणार आहेत. आपण मला बोलण्याची संधी दिली, त्याचा अर्थ मला सहा महिन्यापूर्वी आपण संधी दिली, असा अर्थ काढता येईल काय ? सभापती महोदय, आपण सुसंस्कृत माणसे आहात. आपण सांगा.

तालिका सभापती (श्री.उल्हास पवार) : मंत्री महोदयांकडून आपल्याला उत्तर मिळेल.

श्री.नितीन गडकरी : आपण पुणे जिल्ह्यामधील आहात. आपण सुसंस्कृत आहात. आपल्याला ही बनवाबनवी सहन होईल काय ? विदर्भातील, मराठवाड्यातील जनता भोळी-भाबडी आहे. पंतप्रधानांनी पॅकेजची घोषणा केली, तेव्हा मराठवाड्यातील माननीय मुख्यमंत्री त्यांच्या बाजूलाच होते. 1530 कोटी रुपये सहा महिन्यापूर्वी दिले असे कृषी मंत्री सांगतात, ही शेतकऱ्यांची फसवणूक आहे, राज्याची फसवणूक आहे. 3750 कोटी रुपयाचे पॅकेज पंतप्रधानांनी जाहीर केले ते महाराष्ट्राला द्यायला पाहिजे ते दिले नाही. सुप्रीम कोर्टामध्ये हे पैसे आलेले नाहीत म्हणून सरकारला अॅफिडेव्हीज करून सांगावे लागले. सहा जिल्ह्यामध्ये 50-50 लाख रुपयाप्रमाणे 3 कोटी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी (पुढे सुरु...

रुपये द्यायचे होते, तेही पैसे दिले जात नाहीत. हे खरे असेल तर आपण केंद्र सरकारला याबाबत का बोलत नाही ? शेतकऱ्यांचा मसिहा म्हणून श्री.शरद पवार साहेबांबाबत बोलले जाते. परंतु त्यांनी शेतकऱ्याची फसवणूक केली. आज आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांच्या प्रमाणात वाढ होत आहे. आम्ही आमचे नुकसान सहन करून सन्माननीय मंत्री श्री.अशोक चव्हाण साहेबांच्या नांदेड येथील कारखान्याचा ऊस घेत आहोत. त्याबाबतच्या करारावर सही केलेली आहे. आम्हाला घाटा आला तरी चालेल, परंतु शेतकऱ्यांचे नुकसान व्हायला नको, म्हणून शेतकऱ्यांचा ऊस घेत आहोत. हा सरप्लस ऊस आहे. ऊसाचा उतारा कमी आला तरी चालेत. यामध्ये पाच-पन्नास रुपयाचे नुकसान झाले तरी हरकत नाही, परंतु शेतकऱ्यांचे नुकसान होता कामा नये...

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

श्री. नितीन गडकरी ....

हे सरकार किती प्रभावी आहे ? माननीय मुख्यमंत्री महोदय, तुमच्या दिव्याखाली कसा अंधार आहे? तुमचे सहकारी कसे आहेत ते पहावे. "दैनिक एकमत" नावाचे तुमचे दैनिक आहे. त्यामध्ये इंडो शुगर कंपनीची जाहिरात दिली. त्यामध्ये असे म्हटले होते की, शेतकऱ्यांनो आत्महत्या करु नका. सप्टेंबर, 2006 मध्ये बालाघाट सहकारी साखर कारखाना आम्हाला भाडे तत्वावर मिळाला आहे. दोन महिने दुरुस्तीसाठी लागतील. ऊसाची उपलब्धता आहे. या क्षेत्रातील ऊस तसेच शेअर होल्डरचा ऊस या ठिकाणी आणणे शक्य आहे. बाहेरचा ऊस आणण्याचा प्रयत्न इतर कारखान्यांकडून करु. परंतु शेतकऱ्यांनी आत्महत्या करु नये. तुम्ही फार चांगले अपील केले. तुम्हाला हा साखर कारखाना सप्टेंबरमध्ये मिळाला. आपण मुख्यमंत्री असताना आपल्या जिल्ह्यामध्ये आत्महत्या होत आहेत. दोन महिने दुरुस्तीकरिता लागले असतील. म्हणजे ऑक्टोबर-नोव्हेंबरनंतर डिसेंबरमध्ये कारखाना सुरु केला असेल. म्हणजे तीन महिने वाया गेले. माननीय मंत्रिमहोदय डॉ. पंतगराव कदम आणि तुमच्या सरकारने दोन महिने आधी हा कारखाना का दिला नाही ? लातूर जिल्ह्यामध्ये प्रश्न निर्माण झाला. हा कारखाना दोन महिने आधी इंडो शुगर कंपनीला दिला असता तर आज अशी परिस्थिती राहिली नसती. म्हणजे हे सरकार किती प्रभावी आहे ? माननीय मंत्रिमहोदय डॉ. पतंगराव कदम कोठे गेले असे विचारल्यावर नेहमी ते दिल्लीला गेले आहेत असे सांगितले जाते. दिल्लीला चकरा मारुनही त्यांना काही मिळाले नाही. परवा मी त्यांच्यासंदर्भात "मुड़ मुड़ के ना देख मुड़ मुड़ के" असे म्हणालो होतो. त्यानंतर श्री. नारायण राणे आहेत. त्यांच्या बाबतीत सांगावयाचे म्हणजे "दिवसा मागुनी दिवस गेले, ऋतू मागूनी ऋतू, जीवलगा कधीरे येशील तू" अशी परिस्थिती आहे. त्या पक्षातले मूळ लोक इकडे आले आणि जे इम्पोर्टेड लोक आहेत ते दिल्लीमध्ये जाऊन भिडले. त्यांना शेतकऱ्यांच्या ऊसाची चिंता नाही. माझ्या जो प्रश्न आहे त्याबाबत शासनाने उत्तर द्यावे. आपल्या जिल्ह्यामध्ये आपली फजिती झाली. तुमच्या कारखान्याच्या क्षेत्रातील शेतकरी, तुमच्या जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्या करतात. त्या ठिकाणी दोन शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. आपण मघाशी म्हणाला त्याबाबत मी तपासले. मी आयबीएन सेव्हन ला फोन केला. मी घरी साडेबारा वाजता आयबीएन सेव्हनवर वृत्त पाहिले. श्री. नागनाथ आरदवाड यांच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

आत्महत्येबद्दल त्यांनी अशी ओळ दिली होती की, इंडो शुगर कंपनीचे श्री. अमित देशमुख जबाबदार आहेत.

उपसभापती : मला एक नियम उदधृत करावयाचा आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मला बोलू द्यावे त्यानंतर आपण निर्णय द्यावा.

उपसभापती : आपल्यासारख्या प्रगल्भ नेत्याकडून वारंवार असे होऊ नये.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण एक मिनिट माझे म्हणणे ऐकून घ्यावे आणि त्यानंतर आपण निर्णय द्यावा.

उपसभापती : मी एक नियम वाचून दाखवतो.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी दुरुस्त करण्यास तयार आहे. आपण माझे म्हणणे ऐकून घ्यावे. मी मघाशी जो उल्लेख केला तो इंडो शुगरचे अध्यक्ष श्री. अमित देशमुख जबाबदार आहेत असा एसएमएस मी टी.व्ही. चॅनेलवर पाहिला आहे. या ठिकाणी जे पत्र आहे ते देशमुख नावाच्या अधिकाऱ्याबद्दल आहे. ते पत्र त्यांनी आमच्याकडे दिलेले आहे. मी ते वाचल्यानंतर त्याप्रमाणे सभागृहात बोललो. जे आयबीएन सेव्हन चॅनेलने जाहीर केले त्याप्रमाणे मी बोललो. आयबीएन सेव्हन चॅनेलवर आलेले वृत्त या सभागृहात सांगण्याने कोणावर टीका करणे किंवा बदनामीकरणे असे होत नाही. त्यांचा काही खुलासा असेल तर तो ते करतील. आयबीएन सेव्हन चॅनेलने दिलेले वृत्त चुकीचे असेल, माझे म्हणणे चुकीचे असेल तर त्याबद्दल मी दिलगिरी व्यक्त करण्यास तयार आहे. मी खोडसाळपणे आरोप करीत नाही. त्या चॅनेलवर जे वृत्त आले ते मी सभागृहात सांगत आहे. ते वृत्त सांगणे किंवा माहिती सांगणे यामुळे कोणाची बदनामी करणे असे होत नाही. याउपर ते वृत्त चुकीचे असेल, त्यांनी त्यांच्या नावाचा उल्लेख केला नसेल किंवा चुकीच्या नावाचा उल्लेख केला असेल तर मी नक्की दिलगिरी व्यक्त करीन.

उपसभापती : मी एक घटना सांगतो. या चॅनेल्सच्या चुकीच्या बातमीचे एक साधे उदाहरण देतो. त्यांनी ताबडतोब दुरुस्त करावयास पाहिजे नाही तर त्यांच्यावर कारवाई करा. ज्यावेळी श्री. वसंत चव्हाण यांचे निधन झाले त्यावेळी मी, म्हणजे श्री. वसंत डावखरे मयत झाले असे वृत्त

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती .....

या चॅनेलवर आले होते. ही वस्तुस्थिती आहे. मी खरोखरच मयत झालो या भीतीने बरेच अधिकारी माझ्या चेंबरमध्ये बघावयास आले. त्यांनी पाहिले की मी जिवंत आहे. ही घडलेली वस्तुस्थिती आहे. त्या चॅनेलबाबत मी दुरुस्तीची किंवा माफीची याचना केली नाही. लोक म्हणाले की, या बातमीमुळे तुमचे आयुष्य वाढले. कोणावरही आरोप करत असतानाचा जो नियम आहे तो मी आपणास वाचून दाखवितो.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम 35 असा आहे की, " ज्या सदस्यास एखाद्या व्यक्तीवर मानहानिकारक किंवा अपराधारोपाच्या स्वरुपाचे कोणतेही अभिकथन ज्या दिवशी करावयाचे असेल त्या दिवशीच्या आदल्या कामकाजाच्या दिवशी त्या सदस्याने सांयकाळी 5 वाजेपर्यन्त सभापतीस व तसेच चौकशी करुन उत्तर देण्याच्या प्रयोजनासाठी संबंधित मंत्र्यांस आवश्यक त्या कागदपत्रांसह लेखी पूर्वसूचना दिल्याशिवाय त्या सदस्यास कोणत्याही व्यक्तीविरुध्द मानहानिकारक किंवा अपराधारोपात्मक स्वरुपाचे कोणतेही अभिकथन करता येणार नाही."

श्री. नितीन गडकरी : ते सदस्य नाहीत आणि मंत्रीही नाहीत...(अडथळा)..

उपसभापती : मी किती हळवा आहे हे सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांना माहीत आहे. त्यांना ठेच लागली तर मला जखम होते.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी आपणास सांगू इच्छितो की, आयबीएन-7 चॅनलवरील वृत्त चुकीचे असेल तर त्याबाबतीत आपण त्यांच्याकडून खुलासा मागवून घ्यावा. त्यांचे वृत्त चुकीचे असेल तर मी दिलगिरी व्यक्त करायला तयार आहे. मी क्षमा मागीन. आपण ज्या नियमाचा उल्लेख केला त्यामध्ये मंत्री किंवा सदस्यांवर आरोप करावयाचे असतील तर त्याबाबतीत नोटीस देणे आवश्यक आहे. या प्रकरणी अमित देशमुख हे मंत्री नाहीत आणि आमदारही नाहीत. दुसरी गोष्ट अशी की, मी त्यांच्यावर आरोप केलेले नाहीत. ..

श्री. उल्हास पवार : सभापती महोदय, मी मघाशी यासंदर्भात एक मुद्दा उपस्थित केला होता. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी हे अनुभवी सदस्य आहेत. ते फार चांगले बोलतात. माझे म्हणणे एवढेच आहे की, बंगारु लक्ष्मण यांना पैसे घेत असताना टी.व्ही.वरुन पाहिले. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी हे ज्या पक्षाचे सदस्य आहेत त्या पक्षाचे छत्तीसगडचे माजी मंत्री जूदेव हे पैसे घेताना म्हणाले की, पैसा खुदा तो नहीं लेकिन खुदा से भी बढकर है. ह्या गोष्टी प्रत्यक्ष पाहिलेल्या आहेत, म्हणून ते पुरावे आहेत. कोणते तरी पत्र आणि त्या पत्रावरील सही दाखवणे योग्य नाही. कारण ते पत्र आणि त्या पत्रावरील सही ही त्या मृत झालेल्या शेतक-याची आहे काय ? असा मुद्दा मी उपस्थित केला होता. बंगारु लक्ष्मण, जूदेव म्हणा किंवा महाजन आणि एम .के. अण्णा पाटील म्हणा यांच्यामुळे एरंडोल, जळगाव तसेच अन्य ठिकाणी दुर्दैवाने

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. उल्हास पवार...)

पोटनिवडणुका लागतील. ह्या ज्या घटना घडलेल्या आहेत ते खरे पुरावे आहेत. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी जे पुरावे सादर करु पाहात आहेत तशा थातूरमातूर पुराव्यांना काही अर्थ नाही.

उपसभापती : याठिकाणी अमित देशमुख तसेच जी अन्य नावे घेण्यात आलेली आहेत ती कार्यवृत्तातून काढून टाकली जातील.

श्री. नितीन गडकरी : काँग्रेसच्या नागपूरच्या अध्यक्षांनी अे व बी फॉर्म देण्यासाठी पाच-पाच लाख रुपये घेतले असे नितीन देशपांडेचे पत्र होते. त्याला बोलावून त्याचीच सही आहे की नाही याची देखील सहानिशी केली गेली...

उपसभापती : या गोष्टींचा आणि आत्महत्येचा काही संबंध आहे काय ?..

श्री. नितीन गडकरी : माझे मित्र सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार हे माझ्यावर रागावले आहेत, मी त्यांची क्षमा मागतो... या सभागृहामध्ये सन्माननीय सदस्य ॲडव्होकेट गुरुनाथ कुलकर्णी बसलेले आहेत. मी देखील कायद्याचा पदवीधर आहे. एव्हीडन्स ॲक्ट असा आहे की, जेव्हा एखाद्या व्यक्तीच्या विरुध्द एखाद्या व्यक्तीने दिलेले बयाण हे त्या व्यक्तीच्या विरोधातील पुरावा म्हणून ग्रहीत धरले जाते. आयबीएन-7 चॅनलला विचारुन बातमी खरी आहे की खोटी आहे हे आपण विचारु शकता. मी त्या खोलात जाऊ इच्छित नाही. माझा मुद्दा वैधानिकदृष्टया चुकीचा नाही.... सभापती महोदय, मला आणि नितीन देशपांडे यांना बोलावून सह्या ख-या आहेत की खोट्या आहेत असे आपण विचारले त्यावेळी त्याने माझ्या खोट्या सह्या करण्यात आलेल्या आहेत असे सांगितले. मी जे पुरावे सादर केले होते, ते चुकीचे होते की खरे होते ते सिध्द झाले. तेव्हा मी विनाकारण आरोप करीत नाही. अमित देशमुख यांची बदनामी करण्याचा किंवा त्यांच्यावर आरोप करण्याचा माझा उद्देश नाही. आयबीएन-7 चॅनलचे वृत्त चुकीचे असेल तर मी दिलगिरी व्यक्त करतो.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / शोधनेसाठी नाही

SGB/ MAP/ SBT/ 16:25

श्री.नितीन गडकरी.....

सभापती महोदय, माझा माननीय मुख्यमंत्र्यांना एका मार्काचा सिम्पल प्रश्न आहे. तुमच्या जिल्हयातील, तुमच्या तालुक्यातील शेतकरी आत्महत्या करीत असताना तुम्ही भाडेतत्वावर कारखाना काढला. तुमचे सरकार असताना घेतला. तुमचे सहकार मंत्री डॉ.पतंगराव कदम, जे Most Dynamic Leader of Maharashtra समजले जातात, दुसरे सहकारी मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील अशी सारी फौज असताना, सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांचा सपोर्ट असताना, सन्माननीय उद्योगमंत्री श्री.अशोक चव्हाण हे आमचे मित्र आहेत, ते अतिशय उत्तमरितीने कारखाना चालवित आहेत, ते असताना हा कारखाना 2-3 महिने अगोदर मिळाला असता आणि दररोज 2-3 हजार टन ऊस गाळप केला असता तर ही वेळ आली नसती. हे न होण्यामध्ये झारीतील शुक्राचार्य कोण आहेत? का नाही तुम्ही दोन महिने आधी कारखाना घेतला? परभणी जिल्हयात तर इतके वाईट चित्र आहे की, परभणी जिल्हयातील गोदावरी कारखाना सन्माननीय श्री.गोपीनाथ मुंडे चालवित होते. त्या भागातील ऊस घेत होते. केवळ श्री.गोपीनाथ मुंडे हे भारतीय जनता पक्षाचे आहेत या द्वेषापोटी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने राजकारण करुन त्यांच्या हातून कारखाना हिसकावून घेतला. आता ऊस जाळायची वेळ आली आहे. आता तुम्ही स्वत: पक्षातील शक्तीशाली मुख्यमंत्री असताना तुमच्या जिल्हयात, तुमच्या तालुक्यात तुम्ही घेतलेला कारखाना वेळेवर चालवायला दिला नाही. याला जबाबदार कोण आहेत याची नीट चौकशी करा. सहकार मंत्री जबाबदार असतील तर त्यांच्यावर कारवाई करा. त्यांना मंत्रिमंडळातून वगळा. केवळ 2-3 महिने उशिरा कारखाना सुरु केल्यामुळेच शेतकरी आत्महत्या करीत आहेत. 1 ऑक्टोबरला क्रशिंग सुरु झाले. दोन महिने आधी कारखाना मिळाला असता तर ही वेळ आली नसती. तुम्ही तुमच्या वृत्तपत्रातून शेतकऱ्यांना आवाहन केले असते, तुम्ही आत्महत्या करु नका, तुमच्यासाठी कारखाना घेत आहे. तुमचा सगळा ऊस गाळप होईल. दोन महिने म्हणजे 60 दिवस होतात. 60 दिवसात 2 लाख टन ऊसाचे गाळप झाले असते. ऊस पडून राहिल्यामुळे आज उतारा कमी झाला आहे. याला जबाबदार कोण? दोन महिने विलंब लावणारे झारीतील शुक्राचार्य कोण? तुम्ही मुख्यमंत्री असताना तुम्हाला कारखाना न देणारे, अशी फजिती करणारे कोण आहेत? महाराष्ट्राच्या सहकार विभागाचा हा गलथान कारभार आहे. महाराष्ट्रात असे किती कारखाने आहेत? तुम्हाला याची कल्पना आली होती. आपण बोलला होतात. आपण यशस्वी तज्ञ

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.....

आहात. यशस्वीपणे कारखाना चालवित आहात. यावर्षी महाराष्ट्रात ऊसाचे वाढीव गाळप करण्याची समस्या गंभीर आहे. आपल्याला याची कल्पना आली होती. कारखाना चालू करण्याकरिता दोन-दोन महिने दुरुस्तीसाठी लागतात. 1 ऑक्टोबरच्या आत कारखाना सुरु झाला असता, त्या कारखान्याचे गाळप सुरु झाले असते तर ही वेळ आली नसती. कशाला शेतकरी फासावर लटकले असते? का नाही कारखाना वेळेवर सुरु झाला? का निर्णय वेळेवर घेतला नाही? सहकारमंत्री काय करतात? तुमच्या जिल्हयामध्ये, तुमच्याच तालुक्यामध्ये ही वागणूक असेल तर महाराष्ट्रातील इतर जिल्हयात आणि इतर तालुक्यात काय वागणूक असेल? मराठवाड्यातील आणि लातूर भागातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांकरिता पूर्णपणे जबाबदारी कोणाची असेल तर ती महाराष्ट्र सरकारची आहे, मुख्यमंत्र्यांची आहे. वेळेवर कारखाना सुरु करण्यामध्ये अपयश आले, त्यामुळे त्या ठिकाणचा प्रश्न गंभीर झालेला आहे. आपण जाहिरात दिली. ऊस घ्यायची इच्छा होती. परंतु तुमचे सहकारी तुमचे पाय ओढतात. तुम्हाला काम करु देत नाहीत. तुम्ही संकटात सापडावे या वाईट हेतूने फजिती केली नाही ना? आज प्रश्न सुटणार नाही. ऊस जाळायची परिस्थिती येणार आहे. मे अखेरपर्यंत प्रयत्न केला तरी प्रश्न सुटणार नाही. या शेतकऱ्यांच्या आत्महत्येसाठी सरकार जबाबदार आहे. माननीय पणनमंत्री याठिकाणी बसले आहेत. सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील रागावले. एम.एस.को.ऑप.बँकेच्या पैशाबद्दल त्यांनी तीन दिवसात जिद्दीने निर्णय करुन आणला. त्यांनी दुसरा मार्ग शोधला. परंतु चांगले अधिकारी असतील तर काय होते हे मी सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांना सांगू इच्छितो. अमरावतीला को-ऑप.फेडरेशनचे आयुक्त श्री.आरमुगम यांनी नॅशनलाईज बँकेकडून पैसे आणले. एम.एस.को.ऑप.बँक म्हणजे पांढरा हत्ती आहे. त्यांच्यामार्फत केवळ शेतकऱ्यांचे शोषण करण्याचे काम सुरु आहे. Co-operative sector is becoming a political charity. तुम्हाला गरीब शेतकऱ्यांना वाचवायचे आहे का?

(नंतर श्री.जुन्नरे....

अशुद्धीत पत्र / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

तुम्हाला याचा निर्णय कधी तरी करावाच लागणार आहे. आपण 5 टक्के व्याजाने शेतक-यांना पैसे देणार होता परंतु प्रत्यक्षात 3 टक्के व्याजावर राज्य सहकारी बँकेने, 3 टक्के जिल्हा सहकारी बँकेने व 3 टक्के व्याजावर सहकारी सेवा सोसायटीने अशा प्रकारे 12-13 टक्क्याने कर्ज घ्यावे लागत आहे. आज शेतक-यांना मोठया प्रमाणात फसवले जात आहे. सहकारी बँका शेतक-यांची लूट करीत आहेत. सहकारी संस्था मोठया प्रमाणात घोटाळे करीत आहेत. 280 कोटी रुपयांचा नांदेड येथील सहकारी बँकने केला, नागपूरमधील सहकारी बँकेत 150 कोटी रुपयांचा, वर्धा जिल्हयात 50 कोटी रुपयांचा, 60 कोटी यवतमाळ जिल्हयात सहकारी बँकेत घोटाळा झालेला आहे. आपण जर हे पैसे शेतक-यांना उपलब्ध करुन दिले असते तर त्याचा त्यांना चांगल्या प्रकारे फायदा झाला. हे पैसे मिळाले असते तर शेतक-यांच्या आत्महत्येचे प्रमाण कमी झाले असते. आपण शेतक-यांना मदत सोडा परंतु शेतक-यांचे शोषण करण्याचे काम करीत आहात. आज शेतक-यांची परिस्थिती फार हलाखीची झालेली आहे. मी माझ्या स्वत:च्या शेतातील 1000 संत्र्याची झाडे तोडून टाकलेली आहेत. संत्र्याचा व्यवसाय सोडून मी दुधाच्या धंद्याकडे वळलो. माझ्या डेअरीमध्ये रोज 12.5 लाख लिटर दूध जमा केले जात होते परंतु लोडशेडींगमुळे रोज 1.5 लाख लिटर दूध खराब होऊन वाया जाऊ लागले. तेव्हा मी हरभरा आणि गव्हाची लागवड केली. आज गहू आणि हरभरा याची काय स्थिती आहे? 18-18 तास लोडशेडींग असल्यामुळे विहिरीत पाणी असतांना शेतकरी पिकाला पाणी देऊ शकत नाही. शेतक-याला आपल्या डोळया देखत पीक जळतांना पहावे लागत आहे. माझ्या शेतातील पिकाला वीज नसल्यामुळे मी डिझेल इंजीन आणून पाणी देत आहे परंतु सर्व सामान्य शेतकरी डिझेल इंजिन आणून पिकाला पाणी देऊ शकेल काय ? शेतक-याने डिझेल इंजिन आणले तर त्याला ते परवडेल का ? सभापती महोदय, मी काही झाले तरी घाटा सहन करु शकतो कारण माझा दुसरा व्यवसाय सुध्दा आहे. परंतु सर्वसामान्य गरीब शेतकरी हा घाटा सहन करुन शकेल का ? आज शेतक-याकडे बियाण्यांसाठी पैसे नाहीत, खत घेण्यासाठी पैसे नाहीत, अशी परिस्थिती असतांना सर्वसामान्य शेतकरी डिझेल इंजीन आणून शेतीला पाणी देऊ शकेल का ?

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी.....

सभापती महोदय, ज्यावेळेस शेतक-याकडे कापूस होता त्यावेळेस फेडरेशनने शेतक-याचा कापूस 1500-1600 रुपये भावाने खरेदी केला परंतु जेव्हा शेतक-याजवळचा कापूस संपला तेव्हा या कापसाला 2500-2600 रुपये भाव मिळू लागला. वाढीव दरामुळे फेडरेशनला 90-100 कोटी रुपयांचा फायदा होऊ शकेल. हा जो फायदा होणार आहे त्याचा फायदा महाराष्ट्रातील शेतक-यांना मिळणार आहे काय?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी साहेबांनी सांगितले आहे तशी वस्तुस्थिती नाही. शासनाने कापूस पिकविणा-या शेतक-याला प्रती क्विंटल 1500-1600 रु. भाव दिलेला आहे असे सांगितले परंतु मी आपल्याला सांगू इच्छितो की, शासनाने एकूण 34 लाख क्विंटल कापूस खरेदी केला असून त्यातील 95 टक्के कापूस हा प्रती क्विंटल 1980 रुपये या दराने खरेदी केलेला आहे. आता मार्केटमध्ये कापूस शिल्लक नसल्यामुळे खाजगी व्यापारी 2200-2300 रुपये प्रती क्विंटल या दराने कापसाची खरेदी करीत आहेत. हा कापूस सपोर्ट प्राईज देऊन खरेदी करण्यात आलेला आहे. सभापती महोदय, आता कापसाचे दर वाढल्यामुळे सरकारला फायदा होणार नाही तर तो फायदा शेतक-यांनाच होणार आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण हे मान्य केले आहे की, आपण शेतक-याचा कापूस 1980 या दराने खरेदी केलेला आहे, परंतु आता कापसाचे दर वाढल्यामुळे 90-100 कोटी रुपयांचा फायदा होणार आहे, यातून जो मुनाफा होणार आहे तो आपण शेतक-यांना देणार आहात असा आम्ही अर्थ काढायचा का?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, फेडरेशनने 34 लाख क्विंटल कापूस खरेदी केलेला आहे. मी या खात्याचा मंत्री असतांना मला अजून फेडरेशनला किती फायदा होणार आहे याची माहिती नाही तर तुम्हाला हे कसे काय समजले? यासंदर्भात मी आपल्याला सांगू इच्छितो की, सगळा खर्च झाल्यानंतर, वजावट करुन जो काही नफा शिल्लक राहतो तो आपण शेतक-यांना देत असतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मोनोपली म्हणजे एकाची खरेदी. परंतु आज आज कापूस एकाधिकार खरेदी योजना अस्तित्वातच नाही. तसेच या योजनेला मुदतवाढ सुध्दा मिळालेली नाही. असे असतांना फेडरेशनला जो काही फायदा होईल तो फायदा आपण कापूस पिकविणा-या शेतक-यांना देणार आहात असा आम्ही अर्थ काढायचा का?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, कापूस एकाधिकार खरेदी योजना अनेक वर्षापासून सुरु होती. युतीच्या काळात सुध्दा 1.5 वर्ष मुदत वाढ या योजनेला मिळाली होती.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, युती शासनाच्या काळात कापूस एकाधिकार योजना अंमलात होती. आपण सुध्दा युती शासनाच्या काळात मंत्री म्हणून काम केलेले आहे. मी जे काही बोलतो ते जबाबदारीने बोलत असतो.

श्री. हर्षवर्धन पाटील : मला एवढेच म्हणावयाचे आहे की, युतीच्या काळात मुदतवाढ मिळाली होती. योजनेच्या रुपात ती पुढे सुरु ठेवण्यात आली होती. ,

श्री. नितीन गडकरी : त्यावेळी आपण युती शासनामध्ये मंत्री होता. पुढच्या वेळेस आम्ही सत्तेवर आलो तर तुम्ही आमच्याकडे याल.

श्री. हर्षवर्धन पाटील : आपल्याला तशी संधी मिळणार नाही. युती शासनाच्या वेळेस संख्या कमी होती तेव्हा तुम्हाला गरज होती म्हणून आम्ही तुम्हाला पाठिंबा दिला होता. आमच्या पाठिंब्यामुळेच तुम्ही सत्तेवर आला होता.

श्री. नितीन गडकरी : पुढच्या वेळेस जेव्हा आम्हाला 2-4 जागा कमी पडतील तेव्हा परत तुम्ही आमच्या बाजूला या.

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, ज्यावेळेस युती शासन सत्तेवर आले होते त्यावेळी काँग्रेस सिंगल लार्जेस्ट पॉलीटीकल पार्टी होती. परंतु आम्हाला त्यावेळेस सरकार स्थापन करावयाचेच नव्हते.

यानंतर कु. धनश्री.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी -----

सभापती महोदय, मला येथे एक खुलासा करावयाचा आहे. येथे त्यावेळी 40 अपक्ष सदस्यांनी सपोर्ट दिला होता त्यामुळे युतीचे सरकार सत्तेवर आले होते. त्या सरकारमध्ये माननीय सदस्य श्री. हर्षवर्धन पाटीलही होते.

श्री नितीन गडकरी : सभापती महोदय, मंगल कार्यालयामध्ये एका मुलीचे लग्न असते आणि आग्रह मात्र कार्यालयाच्या मॅनेजरकडून केला जातो. त्या प्रमाणे येथे होत आहे. अहो गुरुनाथ कुलकर्णीजी, हे काँग्रेसवाले काही बोलत नाही, मग तुम्ही कशाला त्यांची वकिली करीत आहात ? आपण काँग्रेसवाल्यांची वकिली कधी पासून सुरु केलेली आहे? सभापती महोदय, येथे आत्महत्येची जबाबदारी कोणाची आहे हे सांगणे आवश्यक आहे. या वर्षी जो काही मुनाफा होईल, तो 60 कोटी रुपये असेल, 70 कोटी रुपये असेल किवा 110 कोटी रुपये असेल, तो मुनाफा शेतकऱ्यांना वाटण्यात येईल, असे माननीय मंत्री श्री. हर्षवर्धन पाटील महोदयांनी अत्यंत धाडसीपणे व अत्यंत निर्भीडपणे या सभागृहात सांगितले आहे. त्याबद्दल मी त्यांचे अभिनदन करतो. हे वक्तव्य त्यांनी मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत केलेले आहे.

श्री. विलासराव देशमुख : हा धोरणाचा भाग आहे.

श्री. नितीन गडकरी : हा धोरणाचा भाग आहे. सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी या प्रस्तावास समर्थन दिलेले आहे, या बद्दल मी त्यांचा आभारी आहे. माझी येथे फक्त एकच विनंती आहे की, कापसाचे अर्थकारण, ऊसाचे अर्थकारण आणि राज्यसरकारची जवाबदारी यामध्ये हा शेतकरी अडचणीत सापडलेला आहे. आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण वाढत चालले आहे. आम्ही रोज ऐकतो की, माननीय पंतप्रधानांचे पॅकेज आले. पंतप्रधानांचे पॅकेज येण्यापूर्वी महाराष्ट्र सरकारचे पॅकेज आले परंतु दोन्ही पॅकेजची मदत अजूनही शेतकऱ्यांना मिळालेली नाही. आम्ही रोज वर्तमानपत्रामध्ये शेंतकऱ्यांच्या आत्महत्येचे मथळे वाचत आहोत. माझी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती आहे की, त्यांनी शेतकऱ्यांच्या वारंवार होणाऱ्या आत्महत्येचा विषय गंभीरपणे घ्यावा. आपण जर येथील 7-8 साखर कारखाने युध्द पातळीवर निर्णय घेऊन सुरु केले असते, याबाबतीत ऑक्टोबर महिन्याच्या आत निर्णय घेतला असता, आणि माननीय मंत्री महोदय डॉ. पतंगराव कदम यांनी या बाबतीत लक्ष घातले असते, त्याला थोडासा सपोर्ट केला असता तर आज या जिल्हयांमध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी.....

जी अडचण आहे, महाराष्ट्रामध्ये जी अडचण आहे, त्या अडचणीतून मार्ग निघाला असता व ही परिस्थिती निर्माण झाली नसती. परंतु ते कारखाने सुरु करण्यामध्ये राजकारण झाले. श्री. मुंडे साहेबांचा परभणी जिल्हयातील कारखाना काढून घेतला गेला. सभापती महोदय, सरकारच्या नाकर्तेपणामुळे, माननीय मंत्री डॉ. पतंगराव कदम यांनी गंभीरपणे विचार न केल्यामुळे आणि अधिकाऱ्यांनी योग्य काम न केल्यामुळे कारखाने बंद झाले . तसेच चुकीची आंदोलने केल्यामुळे देखील साखर कारखाने बंद झालेले आहेत. या ठिकाणी एकाच बाजूला दोष देऊन चालणार नाही. तर चुकीची आंदोलने केल्यामुळे सुध्दा साखर कारखाने बंद पडले आहेत ही गोष्ट आम्ही स्वीकारत आहोत. सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी सांगितले होते की, आपण हा खेळ करु नका. प्रश्न असा आहे की, शेतकरी संघटनेच्या आंदोलनाचे ...

श्री. आर. आर .पाटील : माननीय गडकरी साहेब आपण सांगितल्यावर सुध्दा ते आपले काहीही ऐकत नाही. आपल्या पक्षात किती गट आहेत ? ते कोणत्या गटाचे आहेत ? त्यांनी आपला आदेश का मानला नाही ?

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, ते शेतकरी संघटनेचे नाहीत तसेच त्यांचा स्वतंत्र भारत पक्षाशी संबंध नाही. त्यांना आमदारांचा बिल्ला आहे. सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांचा त्या पक्षाशी काहीही संबंध नाही.

यानंतर श्री. अजित ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.....

सभापती महोदय, मला एकच गोष्ट सांगावयाची आहे की, कापूस आणि ऊस पिकाच्या बाबतीत युध्दपातळीवर निर्णय घेण्याची गरज आहे. दिल्लीने महाराष्ट्र राज्याला फसविले आहे. आम्हाला सांगण्यात आले की, सहा महिन्यापूर्वीच 1560 कोटी रुपये दिलेले आहेत. मी आपल्यामार्फत सरकारला विचारु इच्छितो की, आता तरी शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबणार आहेत काय ? त्यांच्यासाठी प्रभावीपणे उपाययोजना करणार आहात काय ? कर्जबाजारीपणा आणि नापिकी या दोन कारणांमुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. कर्जबाजारीपणामुळे शेतकरी स्वत:चे कर्ज फेडू शकत नाही. तेव्हा या शेतकऱ्यांचे कर्ज माफ केल्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय नाही. खरे म्हणजे मी कर्जमाफीच्या विरोधात आहे. तत्कालीन मुख्यमंत्री श्री.सुशीलकुमार शिंदे यांनी, "आम्ही शेतकऱ्यांचे कर्ज माफ करु, त्यांना मोफत वीज देऊ, कापसाला 2700 रुपये, धानाला 1 हजार रुपये भाव देऊ" असे सांगितले होते. निवडणुकी पूर्वी काढलेला जाहीरनामा माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उपमुख्यमंत्र्यांनी वाचला असेलच. माननीय उपमुख्यमंत्री तसे अभ्यासू आहेत. त्यांनी पाहिल्याशिवाय तो जाहीरनामा छापला कसा जाईल ? त्यांचे व्यक्तिमत्व चौफेर आहे. असे असताना जाहीरनाम्यामध्ये प्रिंटींग मिस्टेक कशी झाली ? खरे म्हणजे राष्ट्रवादी पक्षात ॲड.गुरुनाथ कुलकर्णी यांच्यासारखे सदस्य असताना अशी प्रिंटींग मिस्टेक होऊ शकत नाही. ती काँग्रेस पक्षाकडून झालेली आहे. सभापती महोदय, त्यांनी आम्हाला आश्वासन दिले आणि सगळी वाट लागली. आता अधिवेशन सुरु आहे. मी अतिशय प्रामाणिकपणे सांगतो की, मी कर्जमाफीच्या आणि मोफत वीज देण्याच्या विरोधात आहे. पण मी आपणास सांगू इच्छितो की, मी काही शेतकऱ्यांना भेटलो आहे. त्यांची 5 टक्के- 6 टक्के दराने कर्ज फेडण्याची परिस्थिती नाही. म्हणून त्यांची कर्जे तुम्ही रि-शेड्युल करावीत, ओ.टी.एस. करावीत. गरीब शेतकऱ्यांची कर्जे सिम्पल व्याजाने कॅलक्युलेट करुन त्यांना दिलासा द्यावा. राष्ट्रवादीच्या बँका जिवंत ठेवण्यासाठी गरीब शेतकऱ्यांचा क्लास केला असता, ओ.टी.एस. केले असते तर शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असता. परंतु त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले. विदर्भात शेतकऱ्यांच्या मोठ्या प्रमाणावर आत्महत्या होत असल्यामुळे माननीय पंतप्रधानांनी त्याठिकाणी भेट देऊन पॅकेज जाहीर केले. परंतु त्याचा भूरका देखील शेतकऱ्यांना मिळाला नाही. त्यांच्या सहा बँका तरल्या, आम्ही मात्र फिरत आहोत.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.....

सभापती महोदय, माझे सरकारला सांगणे आहे की, त्यांनी राज्यातील दोन-तीन योजना बंद कराव्यात, पण राज्यातील शेतकऱ्यांसाठी बजेटमध्ये दीड-दोन हजार कोटींची भरीव तरतूद करुन कोरडवाहू शेतकऱ्यांचे प्रश्न प्रथम सोडवावेत. त्यानंतर ओलिताखालील शेतकऱ्यांना न्याय द्यावा. दोन प्रकारचे शेतकरी आहेत एक बोनाफाईड आणि दुसरा मालाफाईड. जर बोनाफाईड असेल तर त्यास मदत करावी मालाफाईड असेल तर त्यास मदत करु नका. जे हॅबीच्युअल असतील त्यांचे कर्ज माफ करु नका. तेव्हा दोन गोष्टी कराव्यात. प्रथम दहा एकर कोरडवाहू शेतकऱ्यांच्या संदर्भात शासनाने कर्जमाफी करण्यासंबंधात ताबडतोब निर्णय घ्यावा. दुसरे म्हणजे, ज्या शेतकऱ्यांचा ऊस शेतात राहणार आहे त्यांनी तो जाळून न टाकता त्यांचा ऊस मे अखेरपर्यंत कारखान्यात घेतला जाईल असा संदेश आज महाराष्ट्रात गेला पाहिजे अशी घोषणा करावी. आम्ही आतापर्यंत साखर कारखान्यावर टीका करीत आलो. सन्माननीय सदस्य श्री. गोपीनाथ मुंडे यांनी देखील साखर कारखाना काढला आणि त्यावरील लोन देखील परत केले. आम्ही त्यांच्याकडे आदर्शाने पाहतो. मी देखील साखर कारखाना सुरु केला पण तो चालला नाही. परंतु पॉवर प्रोजेक्ट सुरु केल्यामुळे कसाबसा तरला आहे. या उद्योगामध्ये नफा नाही.

सभापती महोदय, केंद्रात केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार यांच्या विरोधात सर्व गोष्टी केल्या जातात. जर त्यांनी सूर्य सांगितला तर तो चंद्र आहे असे सांगितले जाते. केंद्रीय वित्तमंत्री श्री.पी.चिदंबरम त्यांचे काहीही ऐकत नाहीत. एकवेळ ते आमचे ऐकतील, पण त्यांचे ऐकणार नाहीत. असे का घडते त्याचे कारण मला माहीत नाही. ते तसे मोठ्या मनाचे आहेत.....

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, याठिकाणी चुकीची माहिती दिली जात आहे आणि ती रेकॉर्ड होत आहे. एन.डी.ए.सरकारच्या काळात शेतकऱ्यांसाठी 88 हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती.

यानंतर श्री.रोझेकर.....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी.....

सन्माननीय श्री.शरद पवार साहेब यांच्याकडे ज्यावेळी कृषि मंत्रालय आले त्यावेळी पंतप्रधान श्री.मनमोहन सिंग आणि पी.चिदंबरम यांच्या सहकार्याने दोन-अडीच वर्षाच्या काळात 88 हजार कोटी रुपयांवरुन 1 लाख 50 हजार कोटी रुपयांवर ही तरतूद वाढविण्यात आली आणि शेतक-यांना कर्ज उपलब्ध करुन देणे, त्यांना आर्थिक मदत करणे ही कामे केली गेली. त्यामुळे माननीय श्री.शरद पवार यांनी प्रस्ताव द्यायचा आणि अर्थमंत्री, श्री.पी.चिदंबरम यांनी तो नाकारायचा, अशी चुकीची माहिती जी येथे सांगितली गेली आहे ती रेकॉर्डवरुन काढून टाकावी, अशी माझी विनंती आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझ्यावर विश्वास नसेल तर या ठिकाणी माननीय मंत्री, श्री.बबनराव पाचपुते बसलेले आहेत, ते माननीय श्री.शरद पवार यांचे अतिशय जवळचे कार्यकर्ते आहेत, त्यांना विचारा. खाजगी कारखान्यांकरिता शुगर पॅकेज मिळविण्यासाठी तीन वेळा मी माननीय श्री.शरद पवार यांच्याकडे गेलो होतो. मी त्यांच्याकडून खूप गोष्टी शिकण्याचा प्रयत्न करतो. माननीय श्री.बबनराव पाचपुते यांच्याबरोबरच श्री.हरिभाऊ बागडे आणि माझ्यासारख्या विरोधी पक्षाच्या आमदारांच्या कारखान्यांच्या फाईलही त्यांनी स्वत: तयार केल्या. मी यापूर्वी कधी त्यांच्याकडे गेलो नव्हतो. पण मी जेव्हा त्यांच्याकडे गेलो त्यावेळी त्यांनी आस्थेने आमची चौकशी केली, आमच्या फाईल तयार केल्या, त्यावर नोटिंग केले, स्वत: रिमार्क्स मारले आणि अर्थमंत्री, श्री.पी.चिदंबरम यांच्याकडे पाठवून दिल्या. माझ्यावर विश्वास ठेवू नका, आपण माननीय श्री.बबनराव पाचपुते यांना विचारा. या फाईल्स श्री.पी.चिदंबरम यांच्याकडून चोवीस तासाच्या आत रिजेक्ट होऊन आल्या. त्यानंतर मी पुन्हा साहेबांकडे गेलो. त्यावेळी त्यांनी मला सांगितले की, नाबार्डचे अध्यक्ष, श्री.थोरात यांना भेटा. मी थोरातांना भेटलो, त्यांनी आमचे म्हणणे समजून घेतले व तुम्हाला नियमाप्रमाणे पॅकेज मिळालेच पाहिजे, मी स्वत: रेकमंड करुन पाठवितो, असे सांगून त्यांनी पुन्हा फाईल पाठवली, पुन्हा पवारसाहेबांनी मोठा शेरा मारला, पण चोवीस तासात पी.चिदंबरम यांच्याकडून फाईल रिजेक्ट होऊन आली. सभापती महोदय, मी पुराव्याशिवाय बोलत नाही. मी जो साखर कारखाना चालवितो त्या कारखान्याची कॅपेसिटी 1 लाख 20 हजार मे.टन एवढी आहे. अशाप्रकारचे 40 कारखाने देशात आहेत. जूनपासून इथेनॉल तयार करण्यास आम्ही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.....

सुरुवात केली. पेट्रोलमध्ये 10 टक्के इथेनॉल मिसळण्याबाबत निर्णय शासनाने घेतला. सन्माननीय, श्री.मुरली देवरा हे पेट्रोलियम मंत्री आहेत. देशात 2 लाख 80 हजार पेट्रोल पंप आहेत. परंतु, एक थेंबही इथेनॉल विकत घेण्यात आले नाही. हे जर विकत घेतले असते तर साखरेचे उत्पादन कमी झाले असते व साखरेची निर्यात करण्याची वेळ आली नसती. आमचा जवळ जवळ 35 कोटी रुपयांचा प्लँट आहे. यासाठी घेतलेल्या कर्जाचे व्याज आम्ही भरतो आहोत. शेवटी कारखाना चालू ठेवण्यासाठी राज्याचे राज्य उत्पादन शुल्क मंत्री, श्री.गणेश नाईक यांच्याकडून रेक्टिफाईड स्पिरिटचे लायसन्स घेतले व ते विकण्यास सुरुवात केली. इथेनॉल हे एम्पोर्ट सबस्टिटयूट आहे. याठिकाणी उपस्थित असलेले सन्माननीय मुख्यमंत्री, श्री.विलासराव देशमुख, श्री.बबनराव पाचपुते, श्री.अशोक चव्हाण, श्री.बाळासाहेब थोरात आणि मी आम्ही सर्व साखर कारखाने चालविणारे आहोत. मी काही चुकीचे सांगत असेल तर तुमची माफी मागेन. माझे लर्नेड फ्रेंड, सन्माननीय सदस्य, ॲड.गुरुनाथ कुलकर्णी, यांची मी माफी मागेन. परंतु, केवळ सन्माननीय श्री.शरद पवार यांनी इथेनॉलचे प्रपोजल दिले म्हणून रिजेक्ट होते. तुम्ही सन्माननीय श्री.शरद पवार यांना एकटयामध्ये भेटा ते सर्व परिस्थिती आपल्याला सांगतील. केंद्र सरकारकडे आणि राज्य सरकारकडे सेंसेटिव्हनेस नसणे, शेतकरी विरोधी धोरण हे शेतक-यांच्या आत्महत्येचे मूळ आहे. म्हणून सभापती महोदय, आपल्यामार्फत मी एवढीच विनंती करतो की, मे अखेरपर्यन्त कारखाने चालतील. त्यानंतर उरलेल्या ऊसाबाबत सरकार काय करणार, याबाबत पर मेट्रिक टनाच्या तपशिलासह आज सभागृहात घोषणा करावी. कापुस उत्पादक शेतक-यांचा बळी गेला, माझी माननीय मुख्यमंत्र्यांना हात जोडून विनंती आहे की, ऊस उत्पादक शेतक-यांना मरु देऊ नका.

यानंतर कुमारी जयश्री.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

JPK/ SBT/ MAP प्रथम श्री.बोरले.... 16:50

श्री.नितीन गडकरी.....

या बाबतीतील निर्णय माननीय मुख्यमंत्री महोदय, आपण स्वत: घ्यावेत आणि महाराष्ट्रातील शेतक-यांना दिलासा द्यावा, शेतक-यांच्या होणा-या आत्महत्या थांबवाव्यात, शेतक-यांना कर्जमुक्त करा, अशी मी आपल्याला विनंती करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

OO -2.....

श्री.दिवाकर रावते (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : माननीय सभापती महोदय,महाराष्ट्रात खरोखरच शेतक-यांच्या आत्महत्या मोठया प्रमाणावर होत आहेत की नाहीत असा प्रश्न पडावा अशी एक आत्महत्येविषयीची चर्चा या सभागृहात सुरु आहे. मी अत्यंत खेदाने या चर्चेमध्ये भाग घेण्याकरिता उभा आहे. माननीय श्री.शरद पावर काय करतात ? आणि माननीय मुख्यमंत्री काय करतात ? आणि अमुक अमुक काय ढोल वाजवितात ? याच्याशी मला काहीही देणेघेणे नाही. सामाजिक बांधिलकी ठेवून जर सरकार काम करत असेल, तर त्या कामाच्या पाठीमागे मी प्रामाणिकपणे उभा राहावयास तयार आहे आणि जर हे सरकार जनतेच्या हिताला व चांगल्या योजनांना तिलांजली देत असेल, तर मग माननीय उपमुख्यमंत्री साहेब म्हणतात तस सावकाराला कोपरापासून ढोपरापर्यंत सोलून काढावे तसे सरकारला सोलावयालाही मी तयार आहे. विरोधी पक्षाची भूमिका घेऊन मी आज या ठिकाणी उभा आहे. शेतक-यांच्या आत्महत्येच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्री साहेब अतिशय गंभीर आहेत असे म्हणावे का ? असा प्रश्न आता पडत आहे. कारण त्यांनी स्वत: परभणीच्या एका शेतक-यांच्या जाहीर सभेमध्ये म्हटले होते की, " शेती हा व्यवसाय आता शेतक-यांना परवडत नसल्याकारणाने शेतकरी आत्महत्या करीत आहेत, शेतक-यांमध्ये आता जगण्याची इच्छाशक्तीच शिल्लक राहिलेली नाही, ही बाब महाराष्ट्रातील शेतक-यांकरिता भूषणावह नाही. " शेतक-यांच्या आत्महत्या थांबविण्यामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांना व आघाडी सरकारला आलेल्या पराभवाची प्रांजळ कबूलीच जणू काही माननीय मुख्यमंत्र्यांनी परभणीच्या जाहीर सभेमध्ये दिली होती. याऐवजी जर माननीय मुख्यमंत्र्यांनी शेतक-यांच्या होत असलेल्या आत्महत्येसंबंधी सहानुभूती दाखवून त्या थांबविणे ही माझी नैतिक जबाबदारीच आहे, तो माझा अधिकारच आहे, हे मला केलेच पाहिजे, या भावनेतून उपाययोजना करण्याबद्दल म्हटले असते तर बरे झाले असते. ही पाळी या राज्याच्या मुख्यमंत्र्यांवर का यावी ? सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी मगाशी उल्लेख केला की, पॅकेजच्या संदर्भात जो घोळ निर्माण झाला त्यामुळे आत्महत्या पॅकेज जाहीर झाल्यानंतर आत्महत्या वाढल्या, हे सत्य आहे. विदर्भात देखील पंतप्रधानांचे पॅकेज जाहीर झाल्यानंतर आत्महत्यांचे प्रमाण वाढलेले आहे. कोर्टामध्ये ॲफिडेव्हिट केले त्यात असे म्हटले होते की, पंतप्रधानांचे पॅकेज अद्यापर्यंत प्राप्त झाले नसल्यामुळे ते लोकांपर्यंत पोहोचू शकले नाही आणि म्हणून शासन ते शेतक-यांना देऊ शकले नाही त्याबद्दल माननीय मंत्री महोदय जर सभागृहामध्ये खुलासा करतील तर मला आनंदच होईल. पंतप्रधान

OO -3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

कार्यालयामार्फत आपल्या राज्यात पॅकेजचे न्याय्य वाटप झाले की नाही, यावर नियंत्रण ठेवले जाते, अशा प्रकारची जी धोरणात्मक भूमिका घेतली जाते, ती निषेधार्ह आहे. या राज्यातील राज्यकर्त्यांना शेतक-यांच्या आत्महत्येबद्दल काहीही देणे घेणे नाही. पॅकेज जाहीर करुनही जर शेतक-यांच्या आत्महत्या होतच असतील तर जाहीर केलेल्या पॅकेजवर नियंत्रण आणण्यात येईल, अशा प्रकारची माननीय पंतप्रधानांनी घोषणा करणे हे महाराष्ट्र राज्याला अत्यंत खेदजनक व लांछनास्पद आहे. आजही दिल्लीचा या महाराष्ट्राबद्दल अत्यंत आकस आहे आणि तो त्यांनी शेतक-यांच्या आत्महत्येच्या प्रकरणात दाखविली आहे ही खेदजनक बाब आहे. माननीय मुख्यमंत्री महोदय, या बाबतची विविध कात्रणे येथे वाचावी, याकरिता मी येथे उभा नाही. शेतक-यांच्या आत्महत्येसंदर्भामध्ये जी परिस्थिती निर्माण झाली आहे ती अशी की, विदर्भात शेतक-यांच्या आत्महत्येची मोठी लाटच निर्माण होत आहे.

यानंतर श्री.बोरले....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते .....

आता ती लाट मराठवाडयामध्ये येत असेल तर ती थांबवली पाहिजे, अशी आमची प्रामाणिक इच्छा आहे आणि त्यासाठीच आजची चर्चा उपस्थित करण्यात आली आहे. मराठवाडयातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सत्र थांबले पाहिजे. आजच्या या चर्चेच्या माध्यमातून शासन शेतकऱ्यांसाठी काय जाहीर करणार आहे, याला महत्व आहे. चार दिवसांपूर्वी सभागृहामध्ये चर्चा झाली त्यावेळी आम्ही आग्रह धरला होता की, ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबण्यासाठी शासनाने सभागृहामध्ये ऊसासंदर्भात निवेदन करावे. सभापती महोदय, आपण त्यावेळी असे निदेश दिले होते की, आजच्या आज निवेदन झाले पाहिजे. त्या दिवशी मी सभागृह संपेपर्यंत सभागृहामध्ये उपस्थित होतो. आपण शासनाला ऊसासंदर्भात निवेदन करण्यास भाग पाडते. शासनाने सभागृहामध्ये ऊसासंदर्भात निवेदन केले. त्या निवेदनाची प्रत अद्याप मला मिळालेली नाही. शासनाने ऊसासंदर्भात जे निवेदन केले ते मला वाचावयाचे आहे. त्यातील बारकावे मला बघावयाचे आहेत. ऊसासंदर्भातील निवेदन ऐकल्यानंतर आम्हाला असे वाटले की, शासनाच्या या भूमिकेबद्दल काय बोलावे ? सभापती महोदय, ऊसासंदर्भातील निवेदन सन्माननीय सदस्यांना उपलब्ध करुन देण्यात यावे. विदर्भामध्ये झालेल्या आत्महत्यांच्या संदर्भातील फॅक्स आजच माझ्याकडे आलेला आहे. दिनांक 18 मार्च ते 24 मार्च, 2007 या तीन महिन्यांच्या कालावधीमध्ये विदर्भातील किती शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या त्यासंदर्भातील हा फॅक्स आहे. त्या फॅक्समध्ये आत्महत्या करणा-या शेतक-यांची नावे आहेत. आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या नावांमध्ये फुंडकर नावाच्या व्यक्तीचा समावेश आहे. आत्महत्या केलेल्या शेतक-यांची नावे वाचून मी सभागृहाचा वेळ घेणार नाही. शेतक-यांच्या आत्महत्यांचा विषय अतिशय गंभीर आहे. विदर्भातील शेतक-यांनी जानेवारीमध्ये 70, फेब्रुवारीमध्ये 88 आणि मार्चमध्ये 67 आत्महत्या केलेल्या आहेत. आज 26 तारीख आहे. विदर्भामध्ये शेतक-यांच्या मोठया प्रमाणावर आत्महत्या होत आहेत. विदर्भातील शेतक-यांच्या आत्महत्यांची लाट थांबत नाही. अमरावती जिल्हयातील मोर्शी आणि वरुड तालुक्यातील चार महिलांनी विष पिऊन आत्महत्या केल्या. अमरावती जिल्हयातील मोर्शी आणि वरुड तालुक्यामध्ये अवकाळी पाऊस पडला. अमरावतीच्या आयुक्तांनी 3 कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचा अहवाल दिलेला आहे. पाऊस पडून एवढया मोठया प्रमाणावर नुकसान होणार असेल तर आम्ही मागणी न करता शासनाने यासंदर्भात निवेदन करुन मदत जाहीर करावी, अशी माझी शासनाला विनंती आहे.

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते .....

अवकाळी पाऊस पडल्यामुळे दोन तालुक्यामध्ये 3 कोटी रुपयांचे नुकसान झालेले आहे त्यासंदर्भात शासनाने घोषणा करावी, अशी आम्हाला अपेक्षा आहे. अवकाळी पाऊस पडून नुकसान झाल्यामुळे मोर्शी आणि वरुड या तालुक्यातील चार महिलांनी विष पिऊन आत्महत्या केल्या. विदर्भातील शेकऱ्यांच्या आत्महत्यांचे सत्र सुरुच आहे. कापूस एकाधिकार योजनेचा विषय मी उपस्थित करणार नाही. कापूस एकाधिकार योजनेची शासनाने कशी वाट लावली त्यावर मी बोलणार नाही. कापूस उत्पादक शेतक-यांना कापसाचे चुकारे कसे मिळतात, यावर मी बोलणार नाही. कापूस खरेदीमध्ये होणा-या नफ्या तोटयाचा लपंडाव बंद करुन शासनाने खुल्या दिलाने सांगितले पाहिजे की, कापसाला 1900 रुपये भाव दिला. आम्ही 300 रुपये भाव वाढवून देऊ. कापूस उत्पादक शेतक-यांना हेक्टरी 1500 रुपये मदत जाहीर केली. कापूस उत्पादक शेतक-यांना क्विंटलमागे 100 रुपये देखील मदत मिळणार नाही. कापूस उत्पादक शेतक-यांना 400 ते 500 रुपये मदत मिळेल, अशी अपेक्षा होती. परंतु शेतक-यांना तेवढी मदत मिळत नाही आणि शेतक-यांचे कर्ज फिटत नाही. शासनाने शेतक-यांच्या कर्जाचे पुनरुज्जीवन केले असले तरी शेतकरी अजूनही कर्जबाजारी आहे. शेतकऱ्यांच्या कर्जासंदर्भात शासन काही करीत नाही. सर्व गोष्टी सांगण्याची माझी इच्छा नाही. मृत शेतकऱ्याच्या कुटुंबियांना एक लाख रुपये मदत दिल्यानंतर हा प्रश्न सुटतो काय ? 30,000 रुपये रोख आणि 70,000 हजार त्या कुटुंबाच्या पुढील भवितव्याकरिता 5-7 वर्षासाठी फिक्स डिपॉझिटमध्ये ठेवले जातात, येथ पर्यंत बरोबर आहे. परंतु शेतकऱ्यांवर जे कर्ज आहे त्याचे काय होणार ?

यानंतर श्री.गागरे .....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखाही नाही

श्री.दिवाकर रावते.....

त्यांचे कर्ज माफ होणार नाही. त्यांचे कर्ज तसेच राहणार आहे काय ? कर्ज तसेच राहणार असेल तर शासनाने एफ.डी. मध्ये जमा केलेली रक्कम जेव्हा शेतकऱ्याला मुदतीनंतर व्याजासहित उपलब्ध होईल तेव्हा ती रक्कम कर्ज फेडण्यातच जाणार आहे. शेतकऱ्यांना तुम्ही कोणता दिलासा देत आहात ? तुम्ही त्यांचे कर्ज माफ करणार आहात काय ? कर्जाचे काय होणार आहे ?

सभापती महोदय, नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीमधील घटना मला आठवते, माननीय महसूल मंत्र्यांचे उद्‌गार मनाला यातना देणारे आहे. सरकार कोणत्या पातळीवर सरकार चालले आहे. माननीय महसूल मंत्री सभेत म्हणाले की, दोन तरुण मुले 70 वर्षाच्या म्हाताऱ्याला आत्महत्या करायला भाग पाडतात व शासनाकडून मिळणारी एक लाख रुपयांची मदत घेतात. महसूल मंत्र्यांनी असे म्हणावे हे आमच्या मनाला यातना देणारे आहे. शासन शेतकऱ्यांना मदत करु शकत नसेल तर करु नका पण यातना देऊ नका. शेतकऱ्यांची एवढी निर्भत्सना सरकारकडून होत असेल तर ती अनाकलनीय व दुर्दैवी आहे. त्यामुळे आम्ही सरकारच्या कोणकोणत्या वक्तव्याचा निषेध किती वेळा करावयाचा ? सरकारवर किती वेळा हक्कभंग आणावयाचा ?

सभापती महोदय, मी सभागृहात तीन वर्षापूर्वी कापसाचा विषय मांडला होता, त्यावेळी श्री.विलासराव देशमुख हेच मुख्यमंत्री होते. त्यावेळी सांगितले गेले की, व्यापाऱ्यांनी कापूस खरेदी करुन सरकारकडे दिलेला आहे, यामध्ये शेतकऱ्याला काही मिळाले नाही म्हणून आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या वाढली आहे. माननीय पणनमंत्र्यांनी तेव्हा सभागृहात जाहीर केले होते की, 100 क्विंटलपेक्षा जास्त कापूस सरकारकडे दिला तर त्याबाबतची यादी आम्ही पटलावर ठेऊ, परंतु सरकारकडे कापूस देऊनही पटलावर यादी ठेवली नाही ही संशयास्पद बाब आहे. शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे आश्वासन देऊनही त्यावर कार्यवाही झाली नाही. व्यापारी व सावकारांवर योग्य वेळी दबाव निर्माण केला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना व्यापारी व सावकारांकडे अगतिकपणे कापूस विकावा लागत आहे. सरकारी योजनेचे कोटयावधी रुपये शेतकऱ्यापर्यंत पोहचत नसून दुसरेच घेऊन जातात. सरकारला हे कळत नाही का ? शासनाकडे इच्छाशक्तीचा अभाव दिसत आहे त्यामुळे त्यावेळी त्यांनी यादी पटलावर ठेवली नाही. त्यावेळी यादी पटलावर ठेवली असती तर हा प्रश्न सुटला असता. तसेच ग्रीन कार्डबाबतचा निर्णय योग्य वेळी घेतला नाही.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ SBT/ KGS/ KTG/ MAP/

श्री.दिवाकर रावते.....

सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत चालल्या आहेत, शेतकऱ्यांना आत्महत्येच्या प्रवृत्तीपासून दूर केले पाहिजे. माझ्या मोबाईलवर एक मेसेज आलेला आहे तो पुढील प्रमाणे "मी नागनाथ आरदवाड आत्महत्या करीत आहे. कारण इतरांचा ऊस कारखान्याकडे चालला आहे पण माझा ऊस न्यायला तयार नाही. ऊस नेण्यासाठी मी मागील आठ दिवस फिरलो. आता झाडाला फासी घेऊन आत्महत्या करीत आहे" हा मेसेज त्याने त्याच्याशी संबंधित असलेल्या काही लोकांना पाठविला आहे व लोकांनी तो पुढे पाठविला आहे. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी म्हणाले की, हा मेसेज त्या शेतकऱ्याच्या आत्महत्तेचा पुरावा होऊ शकत नाही, त्यांच्या मते कोर्टात सिध्द होऊ शकत नाही. परंतु माझ्या मते हा मेसेज पुरावा होऊ शकतो. माझ्या मोबाईलवर ज्या मोबाईलवरुन मेसेज आला त्यांच्या नंबरची माहिती घेऊन अशा प्रकारे त्याच्या प्रकरणाच्या मुळाशी जाता येईल व आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यानेच मेसेज पाठविला आहे हे पुराव्यानिशी सिध्द करता येईल.

सभापती महोदय, परभणी जिल्हयातील पिंपळगाव येथील श्री.रामराव बापूराव बोवड हया शेतकऱ्याने आत्महत्या केलेली आहे. कारण ज्या कारखान्यास त्याला ऊस द्यावयाचा होता तो कारखाना महाराष्ट्राचे सहकार राज्यमंत्री श्री.जयप्रकाश दांडेगावकर यांनी लीजवर घेतलेला आहे, असे तीन कारखाने श्री.दांडेगावकर चालवितात. हा शेतकरी राष्ट्रवादी काँग्रेसचा कार्यकर्ता होता, त्याच्या गावाचे सरपंचही राष्ट्रवादीचे आहेत. या शेतकऱ्याचे पाच एकर क्षेत्र असून त्यामध्ये साडेतीन एकर ऊस होता, त्याने 50 हजार रुपयाचे कर्ज घेतले होते.

यानंतर श्री.सुंबरे.....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ....

नंतर त्यांच्या लक्षात आले की, आपला ऊस कोठे जात नाही. मग त्याने रात्री 12 वाजता स्वत:ला जाळून घेतले आणि त्यावेळी त्याचे डाईंग स्टेटमेंट त्याने दिलेले आहे. त्यामध्ये त्याने हे सगळे मांडलेले आहे. मी माझ्या पदरचे असे काहीही सांगत नाही. घडली घटना ही निषेधार्ह आहे. पण त्या घटनेची माहिती आम्ही येथे सरकारला देतो तेव्हा सरकारने खडबडून जागे झाले पाहिजे. सरकारच्या सहकार खात्याने जागे झाले पाहिजे आणि जागे होऊन ऊसाचा हा गंभीर प्रश्न जो निर्माण झालेला आहे त्याची दखल घेऊन ऊस उत्पादक शेतकऱ्याला दिलासा दिला पाहिजे, त्या दृष्टीने हालचाल केली पाहिजे. परंतु त्याचा परिणाम असा झाला की, आमचे मित्र सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांना आवरताना आम्हाला मुश्कील झाले. आयुष्यभर शेतकऱ्यांची बांधिलकी घेऊन जगणारा हा एक कार्यकर्ता, बीजेपी मध्ये आहे, पण पक्ष कोठलाही असला तरी प्रथम बांधिलकी ही त्याची शेतकऱ्याशी आहे. काल त्या ठिकाणी शेतकऱ्याची आत्महत्या झाली आणि आज परत पाशा पटेल मुंबईत आले आणि सकाळपासून नव्हे तर काल रात्री पासूनच सगळ्यांना फोन करीत होते की, अशी अशी आत्महत्या तेथे झालेली आहे, फास घेऊन आत्महत्या झालेली आहे, त्या घटनेचे फोटो देखील त्यांनी सगळ्यांना दाखविले. आता झालेली ही आत्महत्या हे कोणाचे पाप आहे ? ही आत्महत्या का आणि कशी झाली ? याबाबतीत कोणाचे नाव घेतले म्हणून वाईट वाटून घेण्यापेक्षा याची माहिती आपण घेतली पाहिजे. मी तर म्हणतो की, ही आत्महत्या काँग्रेस पक्षाच्या राजकारणातून निर्माण झालेली आहे, मी येथे जाहीरपणे हा आरोप करतो आहे. तुम्ही एका प्रकरणामध्ये नुसता मुंडे साहेबांचा उल्लेख केला. गोदावरी दुधना कारखाना मुंडे साहेबांकडे बंद पडला होता. तो सुरू होण्यासाठी मी 10 वर्षापूर्वी प्रयत्न केलेले आहेत. पाथ्रीमध्ये भरपूर ऊस आहे आणि तो कारखाना तेथे बंद पडला. म्हणून मग मुंडे यांच्या कारखान्याने तो कारखाना चालविण्यासाठी घेतला. आज माननीय केंद्रीय रेल्वे मंत्री श्री.लालूप्रसाद यादव यांना आपण मॅनेजमेंट गुरू म्हणून म्हणता. कारण काय तर त्यांनी चांगल्याप्रकारे, यशस्वीपणे रेल्वेचा कारभार चालविला. पण आमच्या मुंडे साहेबांनीही तसे केलेले आहे. जणू काही मुडद्यात जान परत येते त्याप्रमाणे तो बंद कारखाना चालविण्यास घेऊन एक वर्षामध्ये त्यातून 6 कोटीचा नफा काढला आहे. पण आजही तो प्रायमरी स्टेजला आहे. त्यांनी दोघांचेही अभिनंदन केले. सभापती महोदय, मी येथे माननीय मुख्यमंत्र्यांच्या कारखान्याचे कौतुक करतो. कारण त्यांच्या कारखान्याने आपल्या

..... आरआर 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ....

सभासदाला क्रेडिट कार्ड देण्याची पद्धत सुरू केली. आजवर कोठल्याही नेतृत्त्वाने असे काम केलेले नाही. हे काम केल्याबद्दल मुख्यमंत्र्यांचे मी जरूर कौतुक करीन पण त्या कौतुकामुळे मुख्यमंत्री म्हणून त्यांचे जे दाईत्व आहे तेही त्यांना नाकारता येणार नाही. मुंडेंनी तो कारखाना चांगल्या प्रकारे चालविला. त्यांचा तेथे जम बसला. तेथे त्यांनी शेतकऱ्यांचा 50-60 हजाराचा मेळावा घेतला. मला देखील त्यासाठी बोलाविले होते, पण मी जाऊ शकलो नाही. पण आता त्या कारखान्याचे पाच वर्षाचे लीज रद्द केले आहे. कारण काय तर तो कारखानाच विकून टाकायचा आहे. सभापती महोदय, मी केवळ एकच कथा येथे सांगतो. बाकी जास्त काही सांगणार नाही. तुमच्या राज्यातील आत्महत्यांचे हे पाप कोणाचे आहे हे मला सांगावयाचे आहे. कारखान्याचे लीज रद्द केले आणि तो विकून टाकण्यासाठी निविदा काढल्या. तेव्हा पहिली बोली ही श्री.जामकर साहेबांची आली, जे या राज्याचे माजी राज्यमंत्री राहिलेले होते आणि ती 23 कोटी रूपयांची होती.

(यानंतर श्री. सरफरे ..... एसएस 1 ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

त्यांनी दहा लाख रुपयांची रक्कम ॲडव्हान्स म्हणून भरली. तरी देखील एम.एस.सी.बी. बँक त्यांना पुढील कर्ज देण्यास तयार नाही. ते दहा लाख रुपये जप्त करुन त्यांचे ॲग्रिमेंट रद्द केले. त्यामुळे जामकरांचा प्रश्न त्याठिक्राणी संपला व कारखाना तसाच राहिला. तुम्ही किती आणि कसे पैसे ओरबाडीत आहात, तुमची मौज मजा झाली आहे. जामकरांच्या रत्नप्रभा शुगर इंडस्ट्रीजची गॅरंटी रद्द झाली. त्याकरिता महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने ऑब्जेक्शन घेतले.त्यानंतर रेणुका नावाची एक महिला या व्यवसायामध्ये टिकून असून तिच्या रेणुका शुगर इंडस्ट्रीजला ऑफर देण्यात आली. त्याकरिता महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडे 67 लाख रुपये डिपॉझीट ठेवावे लागले. बाकीच्या सर्व गोष्टींचे डील झाल्यानंतर त्या कारखान्याला ना हरकत प्रमाणपत्र मिळाले. त्यांनतर ते डील फायनल करण्यासाठी स्थानिक आमदारांनी अनधिकृतपणे काही कोटी रुपये घेतले, ते अधिकृत नसल्यामुळे त्याची नोंद रेकॉर्डवर नाही. त्या कारखान्याकडे 27 एकर जमीन आहे, ती आपल्याला द्यावयाची आहे? राष्ट्रवादी कॉग्रेसची मंडळी मालदार असल्यामुळे आमचे काय होणार हा त्यांच्यापुढे प्रश्न निर्माण झाला आहे. त्यानंतर रेणुकाजींनी बाबा जानींचे ओरिजिनल ॲग्रिमेंट विकत घेतले व तो कारखाना पुन्हा डील केला. जामकरांचे रत्नप्रभा शुगर इंडस्ट्रिजचे ओरिजिनल ॲग्रिमेंट विकत घेतले. हा कारखाना रत्नप्रभा शुगर इंडस्ट्रिजने घेण्याचा प्रयत्न केला, त्यासाठी खूप पैसे मोजले. परंतु यामध्ये बाबा, आबा आणि दादा यांची एकत्र मिटींग झाली. बाबा म्हणजे परभणीचे बाबा जानी, आणि आबा व दादा तुम्हाला माहीत आहेत. श्री. सुरेश देशमुख यांना कारखान्याची व्यथा माहीत आहे, ते त्यांच्या पाठीमागे उभे राहिले. आपले आबा सज्जन आहेत, सचोटीचे आहेत. या व्यवहारामध्ये किती रक्कम घेतली व काय केले? व्यवहार कसा झाला याचे आकडे मी सांगणार नाही. तुम्ही जर पैसे घेतले तर मग कारखाना चालवा, परंतु तो चालवीत नाहीत. रेणुका शुगर इंडस्ट्रीजचे पैसे डुबले, जामकरांचे ॲग्रिमेंट रिव्होक करता येत नाही, त्यामुळे त्या बाईला कर्नाटकामध्ये पळवून लावले. जामकरांचे रद्द झालेले ॲग्रिमेंट पुन्हा केले. त्याठिकाणी आज मारामारी सुरु असून कारखाना बंद आहे. त्या कारखान्याच्या क्षेत्रामध्ये शेतकऱ्याचा ऊस उभा आहे. आपल्या शेतातील ऊस केव्हा घेणार, कोण घेणार ? या विवंचनेत शेतकरी आहे. सद्या तो कारखाना लिजवर आहे. आपल्या सहकार मंत्र्यांना काही कळत नाही. त्यांची काम करण्याची मोडस ऑपरेंडी समजत नाही. त्यांच्याबरोबर दहा वेळा बसलो तरी कळणार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

नाही. त्यांना आपण भोवरा म्हणतो. नामदार श्री. पतंगराव कदम हे सारखे दिल्लीमध्ये फिरत असतात त्याच्याशी आपल्याला देणे घेणे नाही. श्री. दांडेकर साहेबांकडे असलेला नरसिंह कारखाना लिजवर आहे. त्या कारखान्यावर 130 कोटी रुपयांचे कर्ज आहे. त्या कारखान्याची किंमत काय? त्याचे 130 कोटी रुपये कसे झाले? संबंधित असलेले आमदार मस्त बसले आहेत. त्यामध्ये त्यांनी लाखो-करोडो रुपयांचा घोटाळा करावयाचा आणि मग राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये किंवा कॉंग्रेसमध्ये जायचे व सुरक्षित रहावयाचे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (पुढे सुरू...

या कशासाठी आत्महत्या होतात ? आपल्या राजकीय भांडणामध्ये एकमेकांच्या उरावर बसून पक्ष सांभाळण्यामध्ये वेळ घालविला, परंतु कारखाना सुरू केला नाही. यामुळे एका शेतकऱ्याने जाळून घेतले. आपल्या राजकारणामुळेच हे घडलेले आहे. विदर्भातील शेतकऱ्यांप्रमाणेच मराठवाड्यातही आत्महत्येचे लोण पसरत चालले आहे. सरकारने पॅकेज मिळवून सहकारी बँका कशा मजबूत होतील, हे पाहिले. या संदर्भाने सन्माननीय श्री.गडकरी साहेबांनी आपल्या भाषणामध्ये उल्लेख केलेला आहे. उस्मानाबादमधील नरसिंह सहकारी साखर कारखाना हा एकमेव शिवसेनेच्या ताब्यात होता, तो आपण बरखास्त केला. त्यानंतर त्या कारखान्यावर आपल्या पक्षाची माणसे नेमली, राष्ट्रवादी पक्षाची माणसे नेमली. शिवसेनेच्या ताब्यात असलेला साखर कारखाना आपण बरखास्त केला. काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसच्या भांडणामध्ये तो कारखाना बंद पडला. खरे तर दुष्काळी परिस्थिती असताना कोणतेही मंडळ किंवा कारखाना बरखास्त करू नये, अशाप्रकारचा राज्य शासनाचा जी.आर. आहे. परंतु केवळ तो शिवसेनेचा कारखाना आहे, म्हणून बरखास्त केला. आता आयुक्तांचा रिपोर्ट माननीय सहकार मंत्री डॉ.पतंगराव कदम यांच्या टेबलवर आहे. त्या अहवालामध्ये पूर्वीचे मंडळ रिस्टोअर करण्याबाबत त्यांनी सांगितलेले आहे. या संदर्भाने कारखाना चालू करण्याबाबत विनंती केली असता, त्यांनी सांगितले की, राष्ट्रवादी पक्षाने आमची माणसे घ्यावीत. तुमची माणसे घ्या, आमची माणसे घ्या या दळणामध्येच वेळ जात आहे. यामध्ये आमचा शेतकरी आत्महत्या करत आहे. शेवटच्या दिवसापर्यन्त ऊसाचे गाळप करू ऊसाचे गाळप राहिले तर शेतकऱ्यांना अनुदान देऊ, ऊसाचा उतारा कमी झाला तर अनुदान देऊ, मे पर्यन्त ऊसाचे गाळप झाले नाही तर जूनपर्यन्त कारखाने चालू ठेवू असे सांगितले जाते. अशाप्रकारे पाथरीचाही कारखाना दोन्ही पक्षांच्या भांडणामुळे बंद पडलेला आहे. तेथेही एका शेतकऱ्याने आत्महत्या केलेली आहे. तो राष्ट्रवादीच्या ताब्यात कारखाना होता. शेतकऱ्यांचे विदर्भातील आत्महत्येचे लोण मराठवाड्यात पसरत आहे. मुख्यमंत्री महोदयांच्या मतदारसंघाच्या क्षेत्रातील सारखर कारखाना कोणाच्या ताब्यात आहे, याची मला माहिती नाही. परंतु त्यांनी जाहिरात दिली होती, ती सन्माननीय श्री.गडकरी साहेबांनी वाचून दाखविली. त्या जाहिरातीमध्ये आता कारखाना आम्ही घेतलेला आहे, आत्महत्या करू नका, असे आवाहन त्यांनी केलेले होते. त्या ठिकाणचा कारखाना ताब्यात देण्यासाठी सहकार खात्याने का वेळ लावला, याला जबाबदार कोण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ KTG/

श्री.दिवाकर रावते (पुढे सुरु...

आहे ? याचा शोध घेतला पाहिजे. हे आत्महत्याचे लोण थांबवायचे असेल, ऊस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा दिला पाहिजे. मी शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्याच्या संदर्भाने बोलणार नाही. तो विषय सर्वांना माहीत आहे. हे सरकार बनवाबनवी करणारे आहे. हे त्यांनी कबूलही केलेले आहे. "शरम" नावाच्या शब्दाला सुध्दा मी हा शब्द का निर्माण झालो, म्हणून लाज वाटायला लागलेली आहे. 100 क्विंटल कापूस खरेदीची यादी पटलावर आलेली नाही. सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भाने खूप काही बोलावे अशातला भाग नाही. दोष कोणाला देणार ? आत्महत्याच्या संदर्भाने आमची काही मदत पाहिजे असेल तर आम्ही मदत करायला तयार आहोत. या विषयावर आम्ही आपल्याबरोबर येऊ. उद्या आम्ही तिकडे गेलो तरी कोणालाच ही बाब भूषणावह नाही. सन्मानीय गडकरी साहेब म्हणाले त्याप्रमाणे उद्या आमची सत्ता येईल. परंतु आम्ही सत्तेसाठी शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा विषय कधी वापरणार नाही.

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

श्री. दिवाकर रावते ....

परंतु शेतकऱ्यांविषयीची बांधिलकी, सामाजिक बांधिलकी म्हणून तसेच जो जगाचा पोशिंदा आहे त्यांच्याकरिता मी परवा अर्थसंकल्प सादर करण्याच्या दिवशी सभागृहात टोपी घालून आलो होतो. ती राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची टोपी होती. मराठवाड्यातील आणि विदर्भातील शेतकऱ्यांना न्याय देण्याच्या बाबतीत अर्थसंकल्पात काही सांगावे असे ही टोपी आपल्याला सारखे खुणावत आहे हे सांगण्याकरिता मी ती टोपी घातली होती. परंतु राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा अवमान झाला. या ठिकाणी एक गोष्ट नमूद करावीशी वाटते. आदरणीय श्री. शरद पवार यांच्याबद्दल मी वेडेवाकडे कधी बोललो नाही आणि बोलणार नाही. प्रत्येकाने आपापल्या बाजूने तो विषय घ्यावा आणि त्या व्यक्तिमत्वाबद्दल बोलावे. परंतु या सभागृहामध्ये आपण जर त्यांचे कौतुक सांगणार असाल की, श्री. शरद पवार हे केंद्रात मंत्री म्हणून गेल्यामुळे शेतकऱ्यांचे 70 हजार कोटी रुपयांचे बजेट, 80 हजार कोटी रुपयांचे बजेट दीड लाख कोटी रुपयांवर गेले तर मी सन्माननीय सदस्यांना सांगेन की, एकदा या सदनामध्ये आम्ही आपल्याला दोन तास देतो. ते दीड लाख कोटी रुपये शेतकऱ्यांच्या कोणत्या हिताचे आहेत याचा पाढा सादर करावा. त्या बजेटमधून महाराष्ट्राला किती रुपये मिळणार आहेत हे सांगावे. पंजाबमधील शेतकऱ्यांचे वाटोळे करण्यासाठी ऑस्ट्रेलियामधून गहू आयात करण्याचा निर्णय घेतला. आमच्या कापसाच्या खरेदीकरिता त्यामध्ये किती तरतूद आहे ते सांगावे. आम्ही अज्ञानी आहोत. दीड लाख कोटी रुपयांच्या बजेटबद्दल गुणगौरव करत त्याचे मेडल गळ्यामध्ये घेऊन फिरताना ते मेडल सोन्याचे आहे, चांदीचे आहे, पितळेचे आहे की, कथलाचा वाळा आहे हे समजले पाहिजे. श्री. शरद पवार साहेबांच्या दीड लाख कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पाच्या तरतुदींचा गौरव करीत असताना मी त्या ठिकाणी कोठे उभा आहे हे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना समजले पाहिजे. त्यातून आम्हाला नक्की काय मिळणार आहे ? भविष्यात माझ्या कुटुंबियांचे यामध्ये काय साधणार आहे? हे येथील शेतकऱ्यांना समजले पाहिजे. सभापती महोदय आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपल्याला मनापासून धन्यवाद देऊन मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG

श्री. पाशा पटेल (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, काल लातूर जिल्ह्यामध्ये अहमदपूर तालुक्यातील वंजारवाडी येथे 32 वर्षे वयाच्या शेतकऱ्याने आत्महत्या केलेली आहे. ती आत्महत्या कशासाठी केली ? त्यांचा 10 एकरामध्ये ऊस उभा आहे. त्या ठिकाणी कारखान्याची गाडी जात नाही. ऊस उचलला जाईल अशी शक्यता नाही. त्यांच्यावर दीड लाख रुपयांचे खाजगी कर्ज आहे. मराठवाडा ग्रामीण बँकेचे कर्ज आहे. विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेचे कर्ज आहे आणि आता जर ऊस उचलला गेला नाही तर आपल्या जगण्याला काही अर्थ नाही या भीतीपोटी त्याने आत्महत्या केली. आत्महत्या करण्यापूर्वी माणूस कसा वागतो, त्याच्या काय वेदना असतात हे मी पाशा पटेल म्हणून सांगतो. 25 एकर कोरडवाहू शेतकऱ्याचा मी एकुलता एक मुलगा 1972 मध्ये रोजगार हमी योजनेच्या कामावर जातो त्यावेळी मनाला काय वेदना होत असतील हे समजू शकेल. खणण्यासाठी गावाच्या जवळचा खड्डा दिला तर लाज वाटेल म्हणून गावाच्या बाहेरचा खड्डा द्यावा म्हणून मी रोजगार हमीच्या कारकुनाला विनंती केली. मजुरी करावयाची सुध्दा लाज वाटावी अशी परिस्थिती 25 एकर कोरडवाहू शेती असलेल्या शेतकऱ्याची होती. आता ऊस पिकविणाऱ्या शेतकऱ्यांच्या काय वेदना असतील, त्यांना काय त्रास होत असेल हे मला माहीत आहे. मी त्यावेळी नशिबाने वाचलो म्हणून पुढे या ठिकाणी सदस्य म्हणून आलो. मी जे भोगले ते बोलावयास मिळाले म्हणून मी इथपर्यंत आलो. आज ऊस पिकविणाऱ्या चार शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. रोज चार शेतकऱ्यांनी आत्महत्या करण्याची शक्यता निर्माण झाली आहे. यावर्षीचे दु:ख असे आहे की, या वर्षी भरपूर पाऊस पडला म्हणून लोकांनी ऊस लावला. ज्वारीच्या पिकातून काही पैसे सुटत नाहीत. तुरीच्या पिकातून काही पैसे सुटत नाहीत. मराठवाड्यामध्ये ऊसाच्या पिकातून तसेच कापसाच्या पिकातून काही तरी पैसे सुटतात. कापसाचे पीक होईलच असे नाही. कापूस पिकविणाऱ्या शेतकऱ्यांचे हाल असे आहेत की, कापूस पिकविणारा शेतकरी कापसावर फवारण्यासाठी आणलेले औषध कापसावर न फवारता स्वत: पिऊ लागले. कापूस पिकविणाऱ्या शेतकऱ्यांची अवस्था बघून इतर शेतकरी ऊसाच्या पिकाकडे वळले परंतु आज जो ऊस झालेला आहे त्या ऊसामुळे हे शेतकरी कापूस पिकविणाऱ्या शेतकऱ्यांच्याहीपुढे जाण्याची शक्यता आहे. दर तीन तासाला कापूस पिकविणारे शेतकरी मरत आहेत. उद्या दर तीन तासाला ऊस पिकविणारे शेतकरी मरतील अशी परिस्थती निर्माण झालेली आहे. माननीय मुख्यमंत्री साहेब, माननीय उपमुख्यमंत्री साहेब, सगळ्यांनी शेतकरी संघटनेचा उल्लेख केला.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पाशा पटेल...)

मी शेतकरी संघटनेचा आहे, 20 वर्षे मी शेतकरी संघटनेचे काम केले. बाकीच्या गोष्टींचाही उल्लेख येथे करण्यात आला. मी सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांच्या गटाचा आहे की, सन्माननीय सदस्य श्री. गोपीनाथ मुंडे यांच्या गटाचा आहे, अशीही चर्चा करण्यात आली. खरे म्हणजे अशा त-हेची चर्चा या ठिकाणी व्हायला नको होती. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी हे भा.ज.प.चे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष आहेत तर सन्माननीय सदस्य श्री. गोपीनाथ मुंडे हे राष्ट्रीय स्तरावरील भा.ज.प. नेते आहेत.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : माझा हरकतीचा मुद्दा आहे. ही चर्चा कोणाकडून उपस्थित करण्यात आली ?

श्री. पाशा पटेल : मी सभागृहाची माफी मागतो. हा महाराष्ट्रातील अतिशय गंभीर विषय आहे. तेव्हा कृपा करुन विषयांतर करु नका. मी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, आपण सर्वांनी पक्षाभिनिवेश विसरुन शेतक-याच्या पाठिशी खंबीरपणे उभे राहिले पाहिजे. मी एवढेच सांगू इच्छितो की, अशा प्रकारचा मृत्यूचा प्रसंग आपल्यासारख्याच्या घरात आला असता तर आपल्या मनाला किती वेदना झाल्या असत्या, हे आपण विसरता कामा नये. आपण सर्व शेतक-यांची मुले आहोत. जर आपण निवडून राजकारणात आलो नसतो तर येथील काही लोकांनी आतापर्यन्त आत्महत्या देखील केली असती. राजकारणामध्ये संधी मिळाली म्हणून आपण जगत आहोत. सभापती महोदय, यावर्षी पाऊस बरा झाला म्हणून भरपूर ऊस लावण्यात आला. उसाला भाव मिळावा म्हणून ऊस उत्पादक शेतक-यांनी रस्त्यावर येऊन आंदोलन केले. ते आंदोलन चुकीच्या दिशेने गेले म्हणून मी निषेध व्यक्त केला आणि माननीय मुख्यमंत्री आणि सन्माननीय सदस्य श्री. गोपीनाथ मुंडे यांना विनंती करुन शरद जोशी यांनी उपोषण मागे घेण्यासंबंधीचे प्रयत्न केले. परंतु उसाला भाव मिळत नसल्यामुळे शेतकरी रस्त्यावर आले. त्यावेळी मी माननीय मुख्यमंत्र्यांना सांगितले की, आता शेतक-यांना परवडतील ते भाव द्या, परंतु ते जाहीर करु नका. यामुळे त्याला जे काही मिळेल ते तो पदरात पाडून घेईल. सरकार काही करीत नाही असे शेतक-याला वाटता कामा नये. त्याला जे काही मिळणार आहे ते त्याला मिळू द्या. आता शिल्लक ऊस भरपूर राहाणार आहे. मराठवाड्यातील साखर आयुक्तांनी सांगितले की, मराठवाडयमध्ये 9 लाख टन ऊस शिल्लक

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पाशा पटेल....)

आहे.ज्या मुलाने आत्महत्या केली त्याने सांगितले की माझ्या गावामध्ये 200 हेक्टरवर ऊस आहे. जवळपास 20 लाख टन ऊस एका गावामध्ये उभा आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी नगर जिल्ह्यामध्ये बैठक घेतली होती त्यावेळी शेतक-यांनी सांगितले की, आमच्या भागामध्ये 3 लाख टन ऊस शिल्लक राहाणार आहे. तेव्हा सद्य:परिस्थितीमध्ये नेमका किती ऊस शिल्लक राहाणार आहे याबाबतीत चौकशी करावी अशी माझी शासनाला विनंती आहे. आज एक गोष्ट सर्वांनी करण्याची आवश्यकता आहे आणि ती म्हणजे, महाराष्ट्रातील ऊस उत्पादक शेतक-याला आत्महत्येपासून परावृत्त करावयाचे असेल तर त्याच्या पाठिशी खंबीरपणे उभे राहिले पाहिजे. कर्ज माफीवर माझा विश्वास नाही. परंतु कर्जमाफी करीत असताना तुम्ही शेतक-याला काही तरी देत आहात असा विश्वास शेतक-याला वाटला पाहिजे. महाराष्ट्रातील सर्व पक्षाच्या लोकांनी, नेत्यांनी आपापले पक्ष विसरुन आपण सर्वजण शेतक-याच्या पाठिशी ठामपणे उभे आहोत, अशा प्रकारचा विश्वास शेतक-याला दिला तरच शेतक-यांच्या आत्महत्या थांबतील अन्यथा त्या थांबणार नाहीत. उसाचे भाव जून-जुलैमध्ये पडल्यानंतर साखरेच्या निर्यातीवर बंदी घातली. देशात 40 लाख टन साखर शिल्लक होती. तसेच 2.40 लाख टन साखरेचे उत्पादन होणार असताना निर्यातीवर बंदी घातली. नंतर आंतरराष्ट्रीय बाजारात जेव्हा साखरेचे भाव पडले त्यावेळी निर्यातीवरील बंदी अंशत: उठवली. कशासाठी हे नाटक केले जात आहे ? ऊस उत्पादक शेतक-यावर जाणीवपूर्वक अन्याय केला जात आहे. 1931मध्ये ब्राझीलमध्ये इथेनॉलच्या उत्पादनास सुरु झाली. भारतामध्ये इथेनॉलचे उत्पादन सुरु होण्यास 70 वर्षे लागली. त्यासाठी 2001मध्ये अटलबिहारी वाजपेयींचे सरकार यावे लागले.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल.....

महाराष्ट्रातील उद्योजकांनी 1000 कोटी रुपये इथेनॉल प्रकल्पामध्ये गुंतविले आहेत. एवढी सगळी मशिनरी गंजू लागली आहे. ज्यांनी कोणी हिंमत केली ते आज मरायला टेकले आहेत. कोण करणार? कशासाठी करणार? दुस-या बाजूने या इथेनॉलसाठी प्रोत्साहन दिले गेले असते तर अनेक कारखाने उर्जितावस्थेत आले असते आणि यावर्षी जो अतिरिक्त ऊसाचा प्रश्न निर्माण झाला तो देखील मिटला असता. परंतु केंद्र आणि राज्य शासनाच्या ढकला-ढकलीमध्ये आमचा जीव चालला आहे. आता तरी शासन गंभीरपणे विचार करणार आहे की नाही? भूगर्भातील तेलाच्या किंमतीशी इथेनॉलचा संबंध जोडून जेव्हा तेलाचे भाव पडले तेव्हा वाढीव भावाने इथेनॉलची खरेदी केली तरी ती परवडणारी आहे. परंतु याचा निर्णय करणार आहात का? दोन वर्षापूर्वी काळ्या गुळावर शासनाने बंदी लागू केली. का बंदी घातली? असे म्हटले जाते की, काळा गूळ हा शेतकरी फक्त दारु तयार करण्यासाठी वापरतात. परंतु मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील परिस्थितीत खूप फरक आहे. आमच्या मराठवाड्यामध्ये कोणताही गूळ उत्पादित केला, कितीही पावडर वापरली, जास्त पावडर वापरली तरी दोन महिने देखील गुळाचा गोरेपणा राहात नाही आणि नंतर तो गूळ काळा पडतो. हा जमिनीतील पाण्याचा गुणधर्म आहे. काळ्या गुळावर बंदी आणली त्या काळामध्ये ऊसाचे उत्पादन कमी होते. तेव्हा गुऱ्हाळावर बंदी घातली आणि ऊस जास्त उत्पादित झाला तेव्हा शेतकऱ्यांना मोकळे सोडता आहात. कोणते तरी एक धोरण स्वीकारावे. आता देशात 1.40 लाख शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या आणि यापुढे हे प्रमाण वाढणार आहे. देशात काहीही होवो. परंतु या सभागृहात सगळी प्रतिष्ठित मंडळी बसली आहेत. मला सांगायला आनंद वाटतो. सन्माननीय मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री बसले आहेत. गॅलरीमध्ये सन्माननीय श्री.गोपीनाथ मुंडे, विधानसभेतील विरोधी पक्षनेते श्री.रामदास कदम बसलेले आहेत. महाराष्ट्राची सर्व कर्ती मंडळी याठिकाणी बसलेली आहेत. तुम्हा सगळयांना माझी हात जोडून नम्र विनंती आहे. या विषयावर राजकारण करु नका. या विषयावर राजकारण केले तर तळतळाट लागल्याशिवाय राहणार नाही. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे जीवन उद्ध्वस्त करण्याचे पाप तुमच्या हातून घडू नये यादृष्टीने राजकारण बाजूला ठेवून सगळयांनी मिळून एक पत्रकार परिषद घ्यावी व शिल्लक ऊसाचा प्रश्न राहू देणार नाही, जो ऊस शिल्लक राहील त्या उभ्या ऊसाला पैसे देऊ असे जाहीर करा. असे केले तर कोणीही आत्महत्या करणार नाही. नाही तर आत्महत्याचे हे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल.....

सत्र थांबणार नाही.

सभापती महोदय, आणखी एक गोष्ट अत्यंत महत्वाची आहे. मरता क्या, क्या नही करता? आता शेतकरी मरु लागले आहेत. उद्या तुमच्या विरोधात काहीही करु शकतात. असे काही घडू नये. समाज भरकटू नये, समाज आंतकवादी होऊ नये, समाज अतिरेकी होऊ नये असे वाटत असेल, महाराष्ट्र शांत आणि समाधानी राहावा असे वाटत असेल तर हा शेतकऱ्यांचा प्रश्न सुटला पाहिजे. अधिक वेळ न घालविता अतिरिक्त ऊसाला शासन काहीतरी पैसे देणार आहे असे जाहीर करावे हीच माननीय मुख्यमंत्री महोदयांना नम्र विनंती करतो. घरामध्ये भरपूर असेल तर कोणी हाव हाव करीत नाही. परंतु घरात काही नाही त्यामुळे ही हाव हाव थांबायची असेल, अस्वस्थता थांबवायची असेल तर सगळा ऊस गाळप करावा आणि शिल्लक राहिलेल्या ऊसाला 50 हजार रुपये एकरी मदत देण्याची घोषणा करावी. तरच शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबतील. अन्यथा आत्महत्यांचे हे सत्र थांबणार नाही.

सभापती महोदय, आपल्या माध्यमातून मी सरकारला विनंती करतो, हा निर्णय सरकारने तातडीने घोषित करावा आणि लवकरात लवकर अंमलात आणावा एवढे बोलून माझे भाषण पूर्ण करतो.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील (उपमुख्यमंत्री) : सन्माननीय सभापती महोदय, लातूर जिल्हयामध्ये झालेल्या एका शेतकऱ्याच्या आत्महत्येचे प्रकरण घेऊन राज्यामध्ये शेतकऱ्यांच्यासाठी काही केले जात नाही, शेतकरी फार मोठया प्रमाणात आत्महत्या करतात अशा पध्दतीची एक खूप मोठी निराशा शेतकरी जगतामध्ये आहे अशा अर्थाची या सदनामध्ये चर्चा झालेली आहे.

सभापती महोदय, मी खात्रीने सांगू इच्छितो की, राज्य शासनाने शेतकऱ्यांच्या बाबतीत, कष्टकऱ्यांच्या बाबतीत, कामगारांच्या बाबतीत आजपर्यंत घेतलेले सगळे निर्णय पाहिल्यानंतर निश्चितच राज्य शासन संवेदनशील राहिलेले आहे.

सभापती महोदय, कुठल्या सरकारला असे वाटते की, आपल्या राज्यातील शेतकऱ्यांनी आत्महत्या कराव्यात? पण आत्महत्या होत होत्या. वृत्तपत्रातून, विरोधी पक्षाकडून आणि सत्ताधारी पक्षाच्या अनेक सन्माननीय सदस्यांकडून ज्यावेळी या सगळ्या आत्महत्यांची बाजू सरकारपुढे आणली, त्यावेळी शासनाने काही उपाययोजना केल्या.

(नंतर श्री.जुन्नरे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील ....

या बाबतीत संशोधन करणा-या ज्या इंस्टिट्यूट आहेत त्यांचे सहकार्य घ्यावे अशा पध्दतीची भूमिका राज्यशासनाने घेतली. इंदिरा गांधी इंस्टिट्यूट ऑफ डेव्हलपमेंट अँड रिसर्च, टाटा इंस्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स तसेच राज्य शासनाची यशदा या संस्था मार्फत आत्महत्येचे विश्लेषण करण्यात आले. आत्महत्या करणा-या शेतक-यांसाठी नेमके काय केले पाहिजे हे जाणून घेण्याचा राज्यशासनाने जाणीवपूर्वक प्रयत्न केलेला आहे. या संस्थेच्या रिपोर्ट प्रमाणे शेतक-यांच्या आत्महत्या कर्जबाजारीपणा, नापिकी, कर्ज वसुली, सावकार किंवा बँक यांनी केलेला कर्जाचा तगादा, काही दुर्धर आजार, मुलीचे लग्न या मुळे झालेल्या आहेत अशी काही आत्महत्येची कारणे दिलेली आहेत. लोकसंख्येच्या प्रमाणात सर्वाधिक आत्महत्या या मुंबईत झालेल्या आहेत. वेगवेगळया उत्पन्न गटात, वेगवेगळया वयोगटात कमी अधिक प्रमाणात आत्महत्या झालेल्या आहेत. या आत्महत्या महाराष्ट्र शासनाने नाकारलेल्या नाहीत. केरळ सारख्या राज्यात आत्महत्येच्या टक्केवारीचे प्रमाण अधिक आहेत. महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यात आत्महत्या होणे हे शोभादायक नाही.

(अडथळा)

सभापती महोदय, मी शेतक-यांच्या आत्महत्या हा विषय सोडून काही एक बोलणार नाही.मी सन्माननीय सदस्यांचे सर्व ऐकून घेतले आहे. शेतक-यांच्या ज्या आत्महत्या झालेल्या आहेत त्या शासनाने नाकारलेल्या नाहीत. सरकारने सुध्दा कर्जामुळे, नापिकीमुळे आत्महत्या झालेल्या आहेत हे नाकारलेले नाही. 1302 व्यक्तींनी आत्महत्या केलेल्या आहेत याची कबुली महाराष्ट्र शासनाने दिलेली आहे. जेव्हा आत्महत्येचे प्रमाण वाढले तेव्हा इंस्टिट्यूटने ज्या उपाययोजना करण्यास सांगितल्या होत्या त्या सर्व उपाययोजना महाराष्ट्र शासनाने राबवायचे ठरवल्या. या इंस्टिट्युटने ज्या शिफारसी केल्या होत्या त्या शिफारशीच्या उपाययोजनेसाठी शासनाने 1075 कोटी रुपयांचे पॅकेज घोषित केले. हे पॅकेज नागपूर येथे घोषित करीत असतांना माननीय मुख्यमंत्र्यांनी हे पॅकेज विधानसभेत तर मी विधान परिषदेत घोषित केले होते. शेतक-यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी शासनाने सगळया योजना बाजूला ठेवून शेतक-यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याची भूमिका घेतलेली . या आत्महत्येच्या संदर्भात संपूर्ण देशस्तरावर चर्चा झाली. यासंदर्भात स्वत: माननीय पंतप्रधानांनी दोन दिवस जेथे आत्महत्या झाल्या त्या जिल्हयांना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील ....

स्वत: भेट देऊन पाहणी करुन, तज्ञांबरोबर चर्चा करुन 3750 कोटी रुपयांचे पॅकेज घोषित केले. यासंदर्भात राज्यशासनाने 1075 कोटी रुपयांचे पॅकेज घोषित केले होते त्यातील 913 कोटी रुपये प्राप्त झाले असून त्यातील 858 कोटी रुपये प्रत्यक्षात खर्च देखील झालेले आहेत. यासंदर्भात 3750 कोटी रुपयांचे केंद्रशासनाने पॅकेज घोषित केले होते त्यापैकी 281.50 कोटी रुपये प्राप्त झाले असून

यानंतर कु. धनश्री.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील सुरु ...

सभापती महोदय, राज्य सरकारला 1304 कोटी आणि 1986 कोटी इतका निधी प्राप्त झालेला आहे. राज्य सरकारला इरिगेशनसाठी केंद्र सरकारचा मोठया प्रमाणात पैसा मिळणार आहे व हा पैसा आपल्याला 3 वर्षामध्ये खर्च करावयाचा आहे. नियोजन करावयाचे असल्यामुळे, एस्टिमेट करावयाचे असल्यामुळे पहिल्या वर्षी खर्च कमी झालेला दिसत असला तरीही आता त्या संदर्भात कोणतीही अडचण येईल अशी परिस्थिती नाही. हा बॅकलॉग दूर करण्यासाठी गेल्या वर्षी तसेच या वर्षीसुध्दा राज्यपालांच्या निदेशाचे तंतोतंत पालन करण्याची भूमिका या महाराष्ट्र सरकारने स्वीकारलेली आहे. या बजेटमध्ये शेतकऱ्याशी संबंधित असलेल्या सेक्टरमध्ये 4500 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. या पॅकेजमधील पैसा आणि सेंट्रल गव्हर्नमेंटमधून येणारा पैसा 3 वर्षामध्ये खर्च करण्याचा शासन प्रयत्न करणार आहे. पश्चिम महाराष्ट्रामधील कृष्णा खोरे प्रकल्प व इतर प्रकल्प पूर्ण केल्याने तसेच ए.आय. बी. पी प्रोजेक्ट मुळे मोठया प्रमाणात सिंचन क्षमता वाढणार आहे. इरिगेशनचे प्रोजेक्ट पूर्ण करण्याची जिद्द दाखवून इरिगेशन सेक्टरला मदत करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. या संपूर्ण पॅकेजचे इंम्प्लिमेंटेशन करीत असताना 4 लाख 20 हजार खातेदारांचे 239 कोटी रुपयांचे थकीत कर्ज सरकारने भरले आहे. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी म्हणाले की, या सहकारी बँका कोणाच्या आहेत ? त्या बँकांना कर्जबुडीतून बाहेर काढण्यासाठी आपण हा निर्णय घेतलेला आहे.मी त्यांना सांगू इच्छितो की, जर आम्ही हे कर्ज भरले नसते तर त्या थकबाकीदारांना कोणीही कर्ज दिले नसते. संबंधित शेतकऱ्यांना या बँकेमार्फत कर्ज मिळावे म्हणूनच हा निर्णय राज्य सरकारने घेतलेला आहे. हा संपूर्ण पैसा केवळ या बँकाना मदत मिळावी म्हणून राज्य सरकारने दिलेला आहे असे चित्र येथे निर्माण करण्यात आले. या सहकारी बँका आणि राष्ट्रीयीकृत बँका यांनी 1919 कोटी रुपयांचे कर्ज सहा जिल्हयातील शेतक-यांना या वर्षी दिलेले आहे. माझा दावा आहे की, या राष्ट्रीयीकृत बँकांनी त्या परिसरातील शेतकऱ्यांना केलेला कर्जपुरवठा हा एक विक्रम आहे. यापूर्वी कधीही इतक्या मोठया प्रमाणात कर्ज पुरवठा झालेला नव्हता. पूर्वी या शेतकऱ्यांना कर्ज घेण्यासाठी खासगी सावकारांच्या दारात जावे लागत होते. या शेतकऱ्यांजवळ खते, पेस्टीसाईडस खरेदी करण्यास पुरेसा पैसा नसल्यामुळे त्यांच्या अभावीच त्यांना पीक घ्यावे लागत होते. शेतीसाठी शेतकऱ्यांना आवश्यक ते भांडवल मिळाले पाहिजे अशी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील सुरु ...

राज्य शासनाची भूमिका आहे. या भूमिकेतूनच राज्य शासनाने हा निर्णय घेतलेला आहे व त्यामुळे शेतकऱ्याला 1919 कोटी रुपयांचे कर्ज प्राप्त झालेले आहे. नापिकी झाली तर शेतकऱ्यांना पीक विमा योजनेचा लाभ व्हावा अशी भूमिका सुध्दा या शासनाने स्वीकारलेली आहे. उत्पादन वाढीसाठी चांगले बियाणे उपलब्ध करुन देणे , शेती संलग्न जे व्यवसाय आहेत त्यांना प्रोत्साहन देणे, शेतक-यांच्या मुलींच्या विवाहासाठी सामुहीक विवाह योजना आखणे, कापूस पिकविणा-या शेतकऱ्याला दिलासा देणाऱ्या अनेक उपाययोजना या राज्यसरकारने महाराष्ट्रात केलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांच्या एका मताशी मी सहमत आहे. या राज्यामध्ये मरणारे शेतकरी, आत्महत्या करणारे शेतकरी, या सगळयांबद्यल आपण संवेदनशील असावयाला पाहिजे. हा विषय आपल्या सर्वांशी संबंधित आणि निगडीत आहे,अशा प्रकारचे वातावरण आपण महाराष्ट्रात निर्माण करण्याची गरज आहे. शेतकऱ्यांना आत्मबल मिळाले पाहिजे. आपण त्याला आत्महत्येपासून परावृत्त केले पाहिजे. या महाराष्ट्र राज्यामध्ये आपल्याला आत्महत्या करण्याची गरज नाही अशी त्या शेतकऱ्याची मनोभूमिका तयार झाली पाहिजे. या शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे कारण आपण जर बधितले तर आपल्या लक्षात येईल की, अतिशय क्षुल्लक कारणांसाठी या आत्महत्या झालेल्या आहेत. अशा प्रकारे अडचणींचे प्रसंग अनेकांवर येत असतात पण त्या अडचणीतून काही माणसे धैर्याने मार्ग काढत असतात.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.....

तर काहीजण आत्महत्येचा मार्ग स्वीकारतात. शेतकऱ्यांवर दोन पॅकेजचा परिणाम झाला किंवा कसे याचे उत्तर मिळण्यास थोडा वेळ लागेल. सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेस उत्तर देत असताना ज्या पात्र आत्महत्या सरकारला सापडल्या त्याची आकडेवारी सभागृहासमोर दिली होती. त्यावेळी त्यांच्यापैकी बरेच सन्माननीय सदस्य उपस्थित नव्हते. अन्यथा ही माहिती देण्याची माझ्यावर पुन्हा वेळ आली नसती. आज सरकारने दोन पॅकेजची अंमजबजावणी केलेली आहे. त्याचा परिणाम म्हणून राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्येमध्ये घट होण्यास सुरुवात झालेली आहे. जून महिन्यात पात्र आत्महत्या 50 आढळून आल्या. जुलै महिन्यात 48, ऑगस्टमध्ये 44, सप्टेंबरमध्ये 44, ऑक्टोबरमध्ये 40, नोव्हेंबरमध्ये 34 आणि डिसेंबर महिन्यात 34 आत्महत्या झ ाल्या आहेत. या आकडेवारीवरुन स्पष्ट होते होते की, आत्महत्यांमध्ये घट होत आहे. या आत्महत्यांचे विश्लेषण आणखी एका तज्ज्ञ समितीमार्फत करण्यात येईल. राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्या व्हाव्यात असे कोणत्याही राज्यकर्त्यांना वाटणार नाही. शेतकरी आणि आमची नाळ इतकी घट्ट झालेली आहे की, मी पुन्हा एकदा घोषित करतो की, एकवेळ एखादी योजना बाजूला ठेवू, परंतु शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी तज्ज्ञ सांगतील ते करण्यास आम्ही मनापासून तयार आहोत आणि भविष्यात देखील तयार राहू. शेतकऱ्यांच्या आत्महत्या या फक्त विदर्भातील सहा जिल्ह्यात होत आहेत असे नव्हे तर उर्वरित महाराष्ट्रामध्ये सुध्दा शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. कष्टकरी शेतकऱ्यांच्या आत्महत्या होता कामा नयेत, कामगारांच्या आत्महत्या होता कामा नयेत यासाठी जी भूमिका घ्यावी लागेल ती भूमिका घेण्यास आम्ही तयार आहोत.

सभापती महोदय, गेल्या दोन वर्षात राज्यात चांगला पाऊस झाल्यामुळे ऊसाचे उत्पादन वाढणे स्वाभाविक होते. तरी सुध्दा इतक्या मोठ्या प्रमाणावर उत्पादन वाढेल असे तज्ज्ञांना सुध्दा वाटले नव्हते. एक तर राज्यात चांगला पाऊस झाल्यामुळे पिकाचा टनेज ॲन्ड ॲव्हरेज सुध्दा वाढलेला आहे. एका बाजूला ॲव्हरेज वाढला तर दुसरीकडे मंत्रिमंडळात अनुभवी लोक असल्यामुळे सर्वांना या प्रश्नाची जाणीव वेळीच झाल्यामुळे हा प्रश्न सोडविण्यासाठी एक महिना

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.....

अगोदर साखर कारखाने सुरु करण्याचा निर्णय सरकारने घेतला. आता असे सांगितले जाईल की, आणखी एक महिना साखर कारखाने का सुरु करण्यात आले नाहीत ? त्याचे कारण असे की, रिकव्हरीचा प्रश्न असतो, पाऊस सुरु असतो, ऊस तोडणी कामगार त्यांच्या शेतीतील पेरणीची कामे झाल्याशिवाय बाहेर पडत नाहीत, ते ऊस तोडण्यास उत्सुक नसतात. या सर्व कारणांमुळे त्यापेक्षाही अगोदर कारखाने सुरु झाले नाहीत. सभापती महोदय, त्यावेळेच्या स्टेटमेंटची माहिती मी आणलेली आहे. पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यामध्ये ऊसाला अधिक भाव मिळाला पाहिजे या मागणीस जोर मिळायला लागला तेव्हा वाहने अडविणे, कुठे ट्रक पेटवा, ऊसाच्या फडाला आगी लाव अशा अनेक कारणांमुळे कारखाने तीन आठवडे उशिरा सुरु झाले. काही ठिक्राणी रेटून चालवावे अशी परिस्थिती होती त्याठिकाणी चालू झाले. किंबहुना बऱ्याचशा भागात कारखाने सुरु होऊ शकले नाहीत. सभापती महोदय, पावसाने झोडपले तरी सरकार जबाबदार, चुकीच्या पध्दतीने आंदोलने झाली तरी सरकार जबाबदार, शेतकरी संघटनेने चुकीच्या पध्दतीने आडकाठी केली तरी सरकार जबाबदार हे बरोबर नाही. कोणामुळे ऊस शिल्लक राहिला याचे उत्तर शोधण्याची आवश्यकता आहे. मी राज्यातील जनतेच्या नम्रपणे लक्षात आणून देऊ इच्छितो की, मी स्वत:, माननीय मुख्यमंत्री आणि केंद्रीय कृषी मंत्री माननीय श्री.शरद पवार यांनी हे कारखाने बंद ठेवाल भविष्यात फार मोठी किंमत मोजावी लागेल असे सांगितले. आम्हाला शेतकऱ्यांचे फार कळते आणि सरकार शेतकऱ्यांचे शत्रू आहे असे भासवून अव्वाच्या सव्वा मागणी करुन या लोकांनी महाराष्ट्रातील कारखाने लवकर सुरु होऊ दिले नाहीत.

यानंतर श्री.रोझेकर.....

अशुधारित प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.....

सन्माननीय ज्येष्ठ सदस्य, श्री.नितीन गडकरी यांचे मी अभिनंदन करीन की, ऊस कारखानदारीमध्ये आपण प्रवेश केला. पूर्वी असा समज होता की, एखाद्याने कारखाना काढला आणि कारखान्याच्या जीपमध्ये चेअरमन बसला की तो साखर सम्राट मानला जायचा, त्याच्यावर टीकेची झोड उठायची, तो चोर समजला जायचा, असे चित्र निर्माण केले जायचे. सगळया पक्षाचे लोक कारखानदारीमध्ये आले पाहिजेत मगच त्यांना कळून चुकेल की, कारखाना चालविण्यासाठी किती काम करावे लागते. विरोधी पक्षाचे लोक सत्तेमध्ये आल्यानंतर त्यांना अनुभव आला की, प्रदीर्घ काळ काँग्रेसने या राज्यातील सहकार चळवळ आपल्या हाताशी धरुन साखर कारखानदारी निर्माण केली आणि सत्ता स्थिर केली. शिवसेनेच्या लोकांनी शहरामध्ये थोडे राजकारण केले. परंतु, भारतीय जनता पक्षाने पद्धतशीरपणे महाराष्ट्रामध्ये खाजगी कारखान्यातून महाराष्ट्राच्या ग्रामीण भागामध्ये शेतक-यांशी संबंध जोडण्याचा स्तुत्य प्रयत्न केला, मी त्याबद्दल आपल्याला दोष देणार नाही. आजपर्यन्त काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेसचे लोक कारखाने चालवित असतांना त्यांच्यावर टीका केली जाते. आपण अतिशय पारदर्शी असल्यामुळे, चांगल्या प्रकारचे मुल्यमापन करीत असल्यामुळे, आपल्या काळामध्ये खाजगी कारखाने महाराष्ट्रामध्ये निघाले त्या कारखान्यांची, जे खाजगी कारखाने महाराष्ट्रामध्ये आपल्या ध्येयधोरणातून निघाले त्यांची श्वेतपत्रिका सर्वसामान्य जनतेला आणून दाखविली पाहिजे, या कारखान्यांचा नफा-तोटा राज्याच्या जनतेसमोर आणून दाखविला पाहिजे. केवळ टीका करणे सोपे असते.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, पहिली गोष्ट अशी आहे की, भारतीय जनता पक्षाने खाजगी साखर कारखाने काढले, पण तुमचे सरकार त्यांना लायसन्स देत नव्हते, माननीय श्री.गोपीनाथ मुंडे यांनी त्यासाठी फार मोठा संघर्ष केला, जेव्हा आमचे सरकार केंद्रात आले त्यावेळी लायसन्स मिळाले. जरुर शासनाने श्वेतपत्रिका काढावी. सन्माननीय श्री.मुंडे साहेब चालवितात त्या कारखान्यामध्ये किती अडचणी आहेत, तेही तुम्ही पहा. जरुर श्वेतपत्रिका काढा, चौकशी करा, माझे आपल्याला आव्हान आहे की, कुठे भ्रष्टाचार केला आहे, चुकीची बाब झाली आहे काय, याची तुम्ही चौकशी करा.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, मी भ्रष्टाचाराचा आरोप केलेला नाही.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, सन्माननीय श्री.आर.आर.पाटील यांचाही कारखाना होता असे आम्ही ऐकले होते. त्याचे काय झाले ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, तो कारखाना माझ्याकडे सहा महिन्यांसाठी होता त्यावेळी तो नफ्यामध्ये होता व चालू होता. आताही तो चालू आहे. त्या कारखान्याची चिंता सन्माननीय श्री.नितीन गडकरी यांनी करु नये.

श्री.नितीन गडकरी : सन्माननीय मुख्यमंत्री, श्री.विलासराव देशमुख यांच्या बाळापूर परिसरात जो कारखाना आहे त्या कारखान्याला ऑक्टोबरऐवजी सप्टेंबरमध्ये गाळपाची परवानगी दिली असती तर आज ही वेळ आली नसती, तेथील शेतक-याने आत्महत्या केली नसती. सन्माननीय मुख्यमंत्री, श्री.विलासराव देशमुख साहेब आपण हवे तर हे माझे वाक्य खोडावे. सन्माननीय सहकार मंत्री, श्री.पतंगराव कदम यांनी परवानगी देण्यासाठी वेळ का लावला ? सन्माननीय उपमुख्यमंत्री तुम्ही तुमचे मित्र, सहकार मंत्री, श्री.पतंगराव कदम यांच्या कार्याचे कौतुक करीत आहात. परंतु, तुमच्या चेह-यावर वेगळे आणि मनामध्ये वेगळे आहे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, माझा बोलण्याचा चेहरा आणि दाखविण्याचा चेहरा वेगळा नाही.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय उपमुख्यमंत्र्यांनी सहकार मंत्री, डॉ.पतंगराव कदम यांच्या कार्याची श्वेतपत्रिका काढावी. डॉ.पतंगराव कदम कार्यक्षम आहेत असे जर आपल्याला आढळून आले तर आपण जी शिक्षा मला द्याल ती शिक्षा भोगण्यास मी तयार आहे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सहकार मंत्री, डॉ.पतंगराव कदम यांच्या बाकीच्या गोष्टींबद्दल मला बोलावयाचे नाही. परंतु, भारती विद्यापीठ.....

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, भारती विद्यापीठ चांगले. राज्यातील 7/8 कारखान्यामध्ये माननीय मुख्यमंत्री, श्री.विलासराव देशमुख यांना अडचणीत आणण्यासाठी दोन महिने परवानगी देण्यास उशीर लावला गेला, ते कारखाने जर दोन महिने अगोदर सुरु झाले असते तर शेतक-यावर ही वेळ आली नसती. यावर श्वेतपत्रिका काढा. काढून टाका श्वेतपत्रिका एकदाची आणि करा "दूध का दूध और पानी का पानी." सन्माननीय सहकार मंत्री, डॉ.पतंगराव कदम हे सक्षम निघाले तर मी सभागृहाची हात जोडून माफी मागेन.

..3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, मी एवढीच मागणी केली होती की, खाजगी कारखान्यांचे डिटेल्स सरकारकडे असण्याची शक्यता नाही. या कारखान्यांची एखादी श्वेतपत्रिका काढली तर काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे जे लोक साखर कारखाने चालवितात त्यांना यशस्वी साखर कारखाने चालविण्याबाबत मार्गदर्शन मिळेल. कारखाने कशा पद्धतीने चालविले पाहिजेत, याबाबत मार्गदर्शन करण्याची भारतीय जनता पक्षाची जबाबदारी आहे.

यानंतर कुमारी जयश्री.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.....

आपण एखादी श्वेत - पत्रिका काढली तर साखरकारखाने कसे चालवावेत या विषयीचे मार्गदर्शन आम्हाला मिळेल.

श्री.नितीन गडकरी : आपल्या बाजूला माननीय मुख्यमंत्री साहेब बसलेले आहेत, त्यांच्या मुलाचा साखरकारखाना आहे, त्यांच्याकडून तुम्ही साखरकारखाना कसा चालवावा याचे मार्गदर्शन घ्या, माननीय मंत्री महोदय श्री.बबनराव पाचपुते साहेबांचे आणि माझेही मार्गदर्शनही घेतल तरी चालेल.

श्री.आर.आर.पाटील : महोदय, टीका करणे फार सोपे असते, परंतु साखर कारखाना चालविणे अवघड असते.

महोदय, यावर्षी ऊसाचे विक्रमी ऊस उत्पादन येणार याचा अंदाज घेऊन साखरकारखाने लवकर सुरु केले होते. या वर्षी 751 लाख मॅट्रीक टन ऊसाचे उत्पादन झाले, एवढे उत्पादन महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये कधीच झाले नाही. यावर्षी ऊसाचे गाळप अधिक होण्याची शक्यता आहे, ही बाब लक्षात घेऊन यावर्षी सर्व गु-हाळांमध्ये मुक्त परवाने देण्यात आले होते, जे कारखाने बंद पडलेले आहेत, ते सुध्दा लवकर चालू व्हावेत, अशा पध्दतीचा प्रयत्न राज्यसरकारने केला होता, गेल्या वर्षी चालू नसलेले 21 साखरकारखाने त्यापैकी जे 12 महाराष्ट्रामध्ये आहेत, ते सुध्दा अनेक कायदेशीर अडचणींवर मात करीत राज्यसरकारने चालू केले होते. काही कारखान्यांबाबत लवकर निर्णय घेतला नाही कारण लिक्विडेशन ही एक प्रोसिजर आहे, ती कार्यवाही पूर्ण होण्यामध्ये जितका कालावधी जाणार आहे, तो राज्यसरकार कमी करु शकत नाही. एक - दोन वर्षे एखादी इंडस्ट्री बंद पडली तर ती पुन्हा रिपेअर करावयाला एक - दोन महिने सहज निघून जातात. बालघाट हा कारखाना सन 2001 साली चालू झाला होता, त्यावेळी त्या कारखान्याचे फक्त 26 हजार टन ऊसाचे गाळप होते आणि मधील दोन वर्ष हा कारखाना पूर्ण बंद होता. यावर्षी हा कारखाना त्या परिसरातील अतिरिक्त ऊस उत्पादन लक्षामध्ये घेऊन प्रसंगी तोटा आला तरी चालेल, अशा प्रकारचे धाडस करुन, वेळेत चालू होईल की नाही अशी साशंकता असतांना, मजूर मिळतील की नाही हा प्रश्न असतांनाही शेतक-यांला मदत करण्याच्या भूमिकेतून हा कारखाना सुरु करण्याचा निर्णय राज्यसरकारने घेतला आणि चार वर्ष बंद असलेला हा कारखाना रिपेअर करुन दोन महिन्यांमध्ये सुरु करण्यात आला. यावर्षी महाराष्ट्रामधील ऊसाच्या अतिरिक्त उत्पादनाचे नियोजन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.....

साखरसंचालकांनी व सहकार विभागाने केलेले आहे. महाराष्ट्रामध्ये अतिरिक्त ऊसउत्पादनाची शक्यता निर्माण झाल्याने अतिरिक्त ऊस शेजारील जिल्हयांमध्ये म्हणजे नाशिक,अहमदनगर,यवतमाळ,नंदुरबार मध्ये देता येईल, अशीही व्यवस्था सहकार विभागामार्फत केली गेली. हे नियोजन करीत असतांना जर कारखान्यांचे नुकसान झाले तर त्यासाठी लागणारे जास्तीचे अनुदान राज्यसरकारने अगोदरच घोषित केलेले आहे.

यानंतर श्री.बोरले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दूर अंतरावरुन ऊस आणल्यामुळे जो तोटा होईल त्यासाठी अनुदान देण्याची राज्य शासनाने अगोदरच घोषणा केलेली आहे. याच्या पाठीमागची भावना अशी होती की, ऊस संपल्यानंतर कारखाने तातडीने बंद करु नयेत. कारखान्यांनी काही ऊस तेथील कारखान्यांकडून आणि काही ऊस बाहेरुन घ्यावा असे करुन कारखाने सुरु रहावेत, असे राज्य शासनाचे धोरण होते. त्यासाठी राज्य शासनाने वेळेत अनुदान घोषित केलेले आहे. मागच्या वर्षी बाजारामध्ये सारखेचे भाव कमी होते. सारखरेचे अतिरिक्त उत्पादन होत असल्यामुळे निर्यातीसाठी परवानगी मिळाल्यामुळे ऊस उत्पादक शेतक-यांना न्याय मिळाला होता. सुरुवातीला साखर निर्यातीला परवानगी मिळाली नव्हती. मला माननीय पंतप्रधानांचे अभिनंदन केले पाहिजे की, एका बाजूला साखर निर्यातीच्याबाबतीत केंद्र शासनाने ठोस भूमिका घेतली आहे आणि दुस-या बाजूला 20 लाख मेट्रीक टन साखर उत्पादनाचा बफर स्टॉक केला जाणार आहे आणि त्याचा जास्तीत जास्त फायदा महाराष्ट्रातील साखर कारखान्यांना होणार आहे. उत्तर प्रदेश किंवा इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र राज्यातील साखरेचे उत्पादन जास्त आहे. केंद्र शासनाच्या भूमिकेचा फायदा राज्य शासनाला निश्चितपणे होणार आहे. आता राज्य शासनाची खात्री आहे की, मराठवाडयातील ऊसासाठी योग्य पद्धतीने नियोजन केलेले असल्यामुळे मराठवाडयातील साखर कारखान्यांची आजची ऊस गाळपाची क्षमता बघितली तर एका दिवसाला 1 लाख 10 हजार मेट्रीक टन ऊसाचे गाळप केले जाऊ शकते. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये 4 लाख 20 हजार मेट्रीक टन ऊसाचे गाळप केले जाऊ शकते. मराठवाडयातील एकूण ऊस उपलब्धता 196 लाख मेट्रीक टन इतकी आहे. दिनांक 21.03.2007 पर्यंतचे ऊसाचे गाळप बघितले तर 129 लाख मेट्रीक टन ऊसाचे गाळप झालेले आहे. साधारणत: 60 लाख मेट्रीक टन ऊस शेतामध्ये ऊभा आहे. शासनाने साखर कारखान्यांना करुन दिलेल्या नियोजनामुळे साखर कारखाने कोणत्याही अडथळयाशिवाय मे अखेरपर्यंत ऊसाचे गाळप करु शकतील. आपण आणीबाणीच्या परिस्थितीमध्ये मे अखेरपर्यंत कारखाने चालू ठेवलेले आहेत. आज प्रशासनाला असे वाटते की, मराठवाडयातील सर्व ऊसाचे गाळप होणार आहे. ऊस उत्पादक शेतकरी हवालदिल होणे हे मी समजू शकतो. शेतकऱ्यांच्या विहिरींचे पाणी कमी होऊ लागले आहे. शेतातील पिके देखील वाळत आहेत. ऊस कारखान्यामध्ये जात नाही म्हणून

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील .....

शेतक-यांमध्ये नाराजीची भावना निर्माण झालेली आहे, हे मी समजू शकतो. मराठवाडा विशेषत: सोलापूर जिल्हयातील शेतक-यांना मी आश्वासन देऊ इच्छितो की, शेतकऱ्यांचा ऊस शिल्लक राहणार नाही, अशा प्रकारे राज्य शासनाने नियोजन केलेले आहे. आजपर्यंत ज्या पिकामुळे शेतकरी अडचणीत आला त्या शेतकऱ्याला शासनाने वा-यावर सोडण्याची भूमिका घेतलेली नाही. याबाबतचे धोरण आजच घोषित केले तर कारखाने गाळप कमी करण्याचा प्रयत्न करतील. शेवटपर्यंत ऊसाचे गाळप केले जावे आणि त्यातून जरी ऊस शिल्लक राहिला तरी ऊस उत्पादक शेतक-यांना वा-यावर सोडले जाणार नाही. ऊस शिल्लक राहिला तर ऊस उत्पादक शेतक-यांना मदत करण्याची भूमिका स्वीकारली जाईल. कापूस उत्पादक शेतकरी, धान उत्पादक शेतकरी कधी अतिरिक्त उत्पादनामुळे तर कधी नापिकीमुळे अडचणीत आल्यामुळे त्या शेतक-यांना मदत करण्याची भूमिका शासनाने घेतलेली आहे. साखर कारखान्यांकडे बघण्याचा शासनाचा दृष्टीकोन कदाचित ते पीक पश्चिम महाराष्ट्रामध्ये, मराठवाडयामध्ये जास्त घेतले जाते म्हणून नाही तर या क्षेत्रात राज्य शासनाने मोठया प्रमाणावर गुंतवणूक केलेली असल्यामुळे राज्य शासन अनुदानाच्या माध्यमातून परतफेड करीत आहे. 400 कोटी रुपये एक्साईज ड्युटी आणि विविध करांच्या माध्यमातून 1700 कोटी रुपयांचा महसूल साखर कारखान्यांच्या माध्यमातून राज्य शासनाच्या तिजोरीत जमा होतो. राज्याचे उत्पन्नाचे हे एक महत्वाचे साधन आहे. राज्यातील कोणत्याही उद्योगापेक्षा हा उद्योग महाराष्ट्राला आणि राज्य शासनाच्या तिजोरीला मदत करीत आला आहे. साखर उद्योगाची जोपासना करणे, साखर उद्योग अडचणी येणार नाही, ऊस उत्पादक शेतकरी अडचणीत येणार नाही असे वातावरण निर्माण करणे व्यावहारिक दृष्टीकोनातून आवश्यक आहे.

यानंतर श्री.गागरे ....

अशुधारित प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.....

राज्यातील साखर कारखान्यांनी जास्तीत जास्त ऊसाचे गाळप करावे व शेतकऱ्यांचा ऊस शेतामध्ये शिल्लक ठेवायचा नाही असा राज्य सरकारचा प्रयत्न आहे. दुर्दैवाने ऊस राहिलाच तर उपाययोजना करण्यासाठी विरोधी पक्ष व सत्ताधारी पक्षाच्या संबंधित असलेल्या सर्व लोकांची बैठक माननीय मुख्यमंत्री घेतील. राज्य सरकारची भूमिका शेतकऱ्यांना मदत करण्याची आहे व राहिल. त्यामुळे शेतकऱ्यांनी हतबल होण्याची किंवा आत्महत्या करण्याची आवश्यकता नाही. राज्य सरकारने आपल्याला वाऱ्यावर सोडले आहे हा विचार शेतकऱ्यांनी करु नये. शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या प्रश्नावर सरकारची भूमिका त्यांना मदत करण्याची आहे, समाजातील सर्वच घटकांनी त्यांना मदत करण्याची भूमिका स्वीकारली पाहिजे. काही कारखाने अडचणीत आहेत. शेतकऱ्यांनी ऊस तोडून दिला तर तो वाहून नेण्याची काही कारखान्यांची तयारी आहे. ऊन वाढत चालल्यामुळे ऊस तोड करणाऱ्या कर्मचाऱ्यांची क्षमता कमी होत आहे. त्यांनाही आता घरी जाण्याची ओढ लागली आहे, कारण तीही माणसे आहेत. आपला ऊस गाळप होण्यासाठी प्रत्येक शेतकऱ्याने पुढाकार घेतला पाहिजे. आपले स्वत:चे पीक वाचवण्यासाठी मदतीची भूमिका स्वीकारली पाहिजे. शेतकऱ्यांनी ऊस तोडून दिला तर कारखाने वाहून नेतील. अशा वेळी ऊस वाहतुकीसाठी काही कारखान्यांकडे कमी वाहने असतील तर त्यांनी रिक्वीझीशन केल्यास ट्रॅक्टर्स व ट्रक पुरविण्यासाठी सरकार मदत करील. आपल्याकडे केवळ सरकारी मदतीची मोठया अपेक्षेने वाट पाहिली जाते, ही प्रवृत्ती बरोबर नाही. आता सरकारने कडक सूचना दिलेल्या आहेत. एखाद्या कारखान्याने त्यांच्या कार्यक्षेत्रातील पूर्ण ऊस गाळप केला नाही तर किंवा सरकारने याबाबत त्यांच्यावर दिलेली जबाबदारी पार पाडली नाही तर त्यांना जबर दंड करण्याची भूमिका राज्य सरकारमार्फत स्वीकारली जाईल. साखर कारखान्यांनी या राज्यातील शेतकरी अडचणीत असताना त्यांना पूरेपूर मदत केली पाहिजे ही राज्य सरकारची प्रामाणिक इच्छा आहे. याबाबत राज्यातील सहकारी साखर कारखान्यांनी राज्य सरकारला सहकार्य करावे हे आपल्यामार्फत अतिशय नम्र शब्दात त्यांना सांगावयाचे आहे.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ MAP/ SBT/

श्री.आर.आर.पाटील.....

सभापती महोदय, किनवट तालुक्यात नागनाथ आरदवाड या 32 वर्षीय शेतकऱ्याने आत्महत्या केलेली आहे. या शेतकऱ्याची 13 एकर शेती असून त्यापैकी 10 एकर क्षेत्रावर ऊसाची लागवड केलेली आहे. पश्चिम महाराष्ट्रामध्ये 10 ते 13 एकर क्षेत्र असणे हे मोठया शेतकऱ्याचे लक्षण मानले जाते. परंतु हा शेतकरी मराठवाडयातील आहे. गेल्या वर्षी त्या शेतकऱ्याने गुऱ्हाळ करुन ऊसाचे गाळप केलेले आहे. त्याने यावर्षी पुन्हा दहा एकर ऊस लावला होता. हा शेतकरी कोणत्याही कारखान्याचा सभासद नाही. 13 एकर क्षेत्रापैकी 10 एकर ऊस लावत असताना आपण कोणत्याही कारखान्याचे सभासद नाही हे ही बघणे आवश्यक आहे. ऊस लावताना आपल्या परिसरात एखादा कारखाना सुरु आहे का ? हे सुध्दा पाहिले पाहजे. आमच्या माहितीनुसार त्या परिसरातील कारखाने मागील चार वर्षापासून बंद आहेत. ऊस उत्पादक शेतकऱ्याने कोणत्या तरी साखर कारखान्याचे सभासद झाले पाहिजे. त्या शेतकऱ्यास आपल्या शेतमालावर काय प्रक्रिया होऊ शकेल याचा अंदाज घेता आला नसावा. काही शेतकऱ्यांना याची माहिती नसते व काहींचा इलाज नसतो. ज्वारी व गव्हाच्या पिकातून उदरनिर्वाहाचा पूर्ण खर्च भागत नाही, शेतकऱ्यास कर्जातून वर यायचे असेल तर कापूस व उस ही पिके चार पैसे मिळवून देऊ शकतात. तसेच गेल्या वर्षी ऊसाच्या पिकास जास्त दर मिळाल्याने या वर्षी शेतकरी उसाच्या शेतीकडे लोक वळाले आहेत. आत्महत्या करणारा शेतकरी कोणत्याही कारखान्याचा सभासद नव्हता परंतु बालाघाट कारखान्यावर आपला ऊस जावा म्हणून तो शेतकरी स्वत: कारखान्यावर जाऊन आला. गावातील शेतकऱ्यांनी विनंती अर्जही दिला आहे की, त्या परिसरात अजूनही पावणेदोन लाख टन ऊस शिल्लक आहे. तेथील कारखाने अतिशय चांगले चालले आहेत परंतु त्यांच्यावरही बंधन आहे की, पहिल्यांदा सभासदाच्या ऊसाचे गाळप केले पाहिजे. कारखाने गेटकेनचा व बिगरसभासदांचा ऊस गाळपासाठी नंतर घेत असतात.

नंतर श्री.सुंबरे

अशुद्धीत प्रत / शोधनीसाठी नाही

श्री. आर.आर. पाटील ....

कारण त्या सभासदांनी तो कारखाना उभा केलेला असतो. त्यांना तेवढा फायदा देणे भागच असते. त्यामुळे त्या कारखान्याने सभासदांचा ऊस घेण्यास सुरूवात केलेली होती. त्या गावातून काहीच ऊस गेलेला नाही असेही झालेले नाही. आपण सांगितले की, 20 हजार टन ऊस ते आहे. त्या गावामध्ये, वंजारवाडीमध्ये कारखान्याच्या सभासदांची संख्या ही केवळ 63 आहे आणि ऊस नोंद केलेल्या सदस्यांची संख्या केवळ 16 आहे. सदस्यांच्या ऊसाचे क्षेत्र हे 36 हेक्टर असून बिगर सदस्यांच्या ऊसाचे क्षेत्र हे 31 हेक्टर आहे. सभापती महोदय, 31 हेक्टरमध्ये 20 हजार टन ऊस, हा त्यांचा हिशोबही मला कळला नाही. अनेक वेळा आपल्याला माहिती मिळते आणि त्याप्रमाणे आपण बोलूनही जातो. पण ते सारे वस्तुनिष्ठ असतेच असे नाही. त्या गावामध्ये सदस्यांच्या ऊसाचे क्षेत्र 31 हेक्टर आणि बिगर सदस्यांच्या ऊसाचे क्षेत्र 36 हेक्टर असताना, गावातील 29 सदस्यांनी पत्र दिल्यानंतर कारखान्याच्या प्रशासनाने चार दिवसापूर्वीच निर्णय घेतला होता आणि त्याप्रमाणे नियोजन देखील केले होते. कदाचित आपण हे आज मानणार नाही, पण ही वस्तुस्थिती मी सांगतो आहे. प्रशासनाने याबाबत निर्णय घेऊन दुसऱ्याचा फड संपल्यानंतर तेथील अतिरिक्त वाहने या गावाला पाठविण्याच्या सूचनाही दिलेल्या होत्या आणि त्याप्रमाणे दोन ऊस तोडणीची अतिरिक्त वाहने आणि टोळ्या या गावामध्ये पोहोचल्या होत्या. हे गरीबांचे गाव म्हणून असा कोणताही प्रकार घडलेला नाही. पण कधी कधी माध्यमांकडून बातम्या येतात, आतताईपणा म्हणाव्यात अशाही बातम्या त्यातून येतात. आता तेथे शिल्लक राहिलेला ऊसाची जबाबदारी कोणाची ? याला ते श्री.देशमुख, सरकार आणि महाराष्ट्रातील सगळे कारखाने जबाबदार नाही काय ? सभापती महोदय, या शेतकऱ्याने आत्महत्या करण्याची काहीही जरूरी नव्हती. तो शेतकरी तेथे आत्महत्या करणार असल्याचे एसएमएस अनेकांना आलेले आहेत. त्याबाबतीत देखील आम्हाला चौकशी करावी लागणार आहे. मी त्यासाठी ज्यांना ज्यांना त्या शेतकऱ्याचे एसएमएस आलेले आहेत त्या सगळ्यांनाच विनंती करीन, सन्माननीय सदस्य श्री.रावते साहेबांनाही विनंती करतो की, त्यांनी आपले ते मोबाईल सेट, ज्यावर तो एसएमएस आलेला आहे, ते पुढील तपासासाठी म्हणून आमच्याकडे द्यावेत. हा एसएमएस सभागृहात सदस्यांना पाठविला होता याचा अर्थ तो मरण्यापूर्वी त्याने पाठविला होता. आत्महत्या केल्यानंतर तर त्याने तो निश्चितच पाठविला नसणार. त्यामुळे याबाबत ज्यांना एसएमएस आला आहे त्या सर्वांचीच जबाबदारी आहे की, त्यांनी त्याबाबत प्रथमत:

..... 3इ 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर. पाटील ....

तेथील एस.पी.ना कळविले काय ? मला कळविले काय ? जेणे करून ती आत्महत्या होणे टळले असते. म्हणून माझी विनंती आहे की, ज्यांच्या मोबाईल सेटवर हा एसएमएस आलेला आहे तो सेट पुढील तपासासाठी आमच्याकडे द्यावा आणि आम्हाला तपासाच्या कामी सहकार्य करावे. सभापती महोदय, या शेतकऱ्याने आत्महत्या केलेली आहे तो गरीब अपंग शेतकरी होता. त्याचा ऊस गाळपासाठी जाऊ शकला असता. परंतु एक दुर्दैवी प्रसंग राज्यामध्ये हा घडला आहे त्याबद्दल सरकारला देखील खेद आहे, दु:ख आहे. सन्माननीय सदस्य श्री.गडकरी यांनाही मी धन्यवाद देतो की, आपण एवढे मोठे अंतर पार करून नांदेड मधून ऊस करार करून आपल्याकडे नेता आहात. असे केले जात असेल तर एवढे मोठे गाळप करण्याची क्षमता या महाराष्ट्रात निश्चितच आहे. सभापती महोदय, बंद असलेले कारखाने सुरू करण्यासाठी देखील आम्ही प्रयत्न केले आहेत. त्यासाठी बँकांबरोबर चर्चाही केली आहे. गेल्या वर्षी बंद असलेल्या 23 कारखान्यांमुळे हा ऊसाचा प्रश्न भविष्यात गंभीर होईल हे लक्षात घेऊनच राज्य सरकारने त्या दृष्टीने उपाय केलेले आहेत. सुरूवातीस हे कारखाने बंद राहिले नसते तर हा प्रश्नही उभा राहिला नसता. सभापती महोदय, आहे ही परिस्थिती मी आपल्यासमोर ठेवली आहे. या शेतकऱ्याने केलेल्या आत्महत्येचे फोटो सन्माननीय सदस्यांनी दिलेले आहेत आणि आम्ही देखील ती आत्महत्या मान्य केलेली आहे. सरकारच्या धोरणाप्रमाणे आणि नियमानुसार त्याच्या कुटुंबाला मदत करण्याची भूमिका राज्य सरकार कडून घेतली जाईल. सभापती महोदय, या निमित्ताने मराठवाड्यातीलच नव्हे तर राज्यातील सर्वच ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मी आश्वासन देऊ इच्छितो की, एक तर सर्व ऊस गाळण्याचा आटोकाट प्रयत्न केला जाईल आणि तरीही ऊस शिल्लक राहिला तर त्याला भरीव मदत करण्याचीच भूमिका सरकारची राहील यावर आपण विश्वास ठेवावा. अशा प्रकारे आतताई भूमिका स्वीकारल्याने संकटावर मात करता येणार नाही, मार्ग काढता येणार नाही. ....

अशुद्धलिखित मूल / शीघ्रलिपीसाठी नाही

(यानंतर श्री. सरफरे`.... 3एफ 1 ..

श्री. आर. आर. पाटील...

आणि म्हणून शेतकऱ्यांवर आलेल्या आपत्तीवर धैर्याने मात केली पाहिजे. शासन म्हणून आम्ही आणि विरोधी पक्ष म्हणून आपण सर्वजण शेतकऱ्यांबरोबर आहोत. आज राज्यामध्ये ज्वलंत समस्या निर्माण झाली आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी संवेदनशीलपणे ही चर्चा उपस्थित केली. अर्थसंकल्पासारख्या महत्वाच्या विषयावरील चर्चेला आज सुरुवात होत असतांना सुध्दा त्या चर्चेपेक्षा शेतकऱ्याच्या आत्महत्तेला अधिक महत्व देऊन आणि आपल्या भूमिकेशी सहमत होऊन ही चर्चा घेण्यात आली. सभापती महोदय, सभागृहामधील आजपर्यंतचे प्रसंग पाहिल्यास अर्थसंकल्पावरील पहिल्या दिवसाची चर्चा आपल्याला टाळावयाची नव्हती. याबाबतीत आपली जी मनस्थिती आहे तीच सरकारची सुध्दा आहे. आणि म्हणून आपण सर्वजण मिळून विदर्भ मराठवाडयातील शेतकऱ्यांना धैर्य आणि धीर देऊन त्यांना अडचणीतून बाहेर आणण्याचा प्रयत्न करु या असे मी आवाहन करतो. याकरिता आपण सर्वांनी अशापध्दतीची भूमिका घेऊ या अशी मी सदनाला विनंती करतो. माननीय सदस्य श्री. पाशा पटेल हे चांगले बोलले. हा प्रश्न सर्वांशी संबंधित आहे. कोणत्याही भूमिकेतून शेतकरी आत्महत्त्या करण्यास प्रवृत्त होईल अशाप्रकारची भूमिका कुणीही घेता उपयोगी नाही. ज्या आत्महत्त्या होत आहेत त्यांचे पुन्हा एकदा विश्लेषण करुन आत्महत्त्याग्रस्त शेतकऱ्यांना व त्यांच्या कुटुंबियांना भविष्यामध्ये त्यांच्याकडून आत्महत्त्या घडू नये म्हणून तज्ज्ञ जी भूमिका सांगतील ती करण्याची राज्य सरकारची तयारी आहे याची खात्री देऊन माझे भाषण संपवितो.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय उपमुख्यमंत्र्यांकडून समाधानकारक उत्तर न मिळाल्यामुळे मला एकच प्रश्न विचारावयाचा आहे. आपल्या मंत्रिमंडळातील सहकार मंत्र्यांनी छिंदवाडा येथे अतिरिक्त ऊस तयार झाला म्हणून त्याठिकाणी आपल्या एका अधिकाऱ्यांना पाठविले. केंद्रीय मंत्री श्री. कमलनाथ साहेबांचा फोन आल्यानंतर आपले एक अधिकारी त्याठिकाणी गेले होते. त्यासंबंधीचा पुरावा माझ्याकडे आहे. माननीय मुख्यमंत्र्यांना माझी विनंती आहे की, हे 21 कारखाने इंडो शुगरने घेतले असून त्यांच्या दुरुस्तीसाठी दोन महिने लागणार आहेत. हे 21 कारखाने चालू करण्यासाठी महाराष्ट्रामध्ये ज्या गोष्टी घडल्या आहेत त्याची आपणास माहिती आहे. त्यामध्ये राज्य सहकारी बँकेने कशी भूमिका घेतली? टेंडर कसे रद्द करण्यात आले? तुमसरचा कारखाना कसा रद्द केला हे आपणास माहीत आहे. पुढील वर्षी देखील अतिरिक्त ऊसाचे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

उत्पादन होणार आहे. त्याकरिता ज्या कारखान्यांमध्ये भांडवल गुंतविण्यात आले आहे ते कारखाने पुढील वर्षी चालू होणे आवश्यक आहेत. आपणास सांगावयाचे झाले तर या वर्षी साखर आयुक्त व सहकार विभागाकडून ज्या गतीने कारवाई व्हावयास पाहिजे त्या गतीने झाली नाही. म्हणून माननीय मुख्यमंत्र्यांच्या मतदारसंघामध्ये दोन महिने उशिरा कारखाना सुरु झाला. सभापती महोदय, साखरेचे उत्पादन कमी करण्यासाठी व इथेनॉलचे उत्पादन वाढविण्यासाठी माननीय केंद्रीय मंत्री श्री. देवरा साहेबांशी आपण बोला व त्यांना मिटींग घेण्यास सांगा. आज पेट्रोलच्या भावामध्ये पॅरिटी आहे, दोन वर्षे झाली त्यांनी आमचा इथेनॉलचा एक थेंबही घेतला नाही. आज राज्यातील 25 ते 30 कारखान्यांमध्ये साखरेचे उत्पादन जास्त आहे. अशा ठिकाणी साखरेचे इथेनॉलमध्ये कन्व्हर्शन करण्यात यावे. आणि साखरेचे उत्पादन कमी असेल त्याठिकाणी इथेनॉलचे कन्व्हर्शन साखरेमध्ये करावे म्हणजे हा प्रश्न रहाणार नाही. म्हणून माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती आहे की, यावर्षी जी स्थिती निर्माण झाली ती पुढील वर्षी रहाणार नाही त्या करिता खंबीर धोरण स्वीकारुन त्याची तड लावावी.त्या करिता आम्ही आपल्या पाठीशी उभे रहाण्यास तयार आहोत. यावर्षी झालेला खेळखंडोबा पुढील वर्षी होणार नाही या करिता आपण पुढाकार घेतला पाहिजे. साखरेचे भाव ज्यावेळी कमी असतील त्यावेळी आपण इथेनॉलचे उत्पादन करावे, आणि इथेनॉलचे भाव कमी होतील त्यावेळी आपण साखरेचे उत्पादन करावे. अशाप्रकारची टेक्नॉलॉजी आपण स्वीकारण्याच्या बाबतीत खंबीर भूमिका घेऊन पुढील वर्षी त्यादृष्टीने अंमलबजावणी करावी. तसे झाल्यास शेतकऱ्यांवर आत्महत्त्या करण्याची वेळ येणार नाही.

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, ऊसाच्या खोडव्यापासून आणि लागवड करुन आलेला अतिरिक्त ऊसाचा अचूक वेध घेऊन

(यांनतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील (पुढे सुरु..

जे कारखाने अजूनही बंद आहेत, या वर्षी सुरु होऊ शकले नाहीत ते कारखाने सुरु करण्याचा प्रयत्न केला जाईल. जे कारखाने उभारणीमध्ये आहेत, त्यांना विशेष अनुदान देऊन तेही कारखाने पुढच्या वर्षी सीझन घेऊ शकतील, चालू राहू शकतील, यासाठी लागणारा अतिरिक्त निधी देण्याची भूमिका स्वीकारली जाईल. सन्माननीय सदस्य श्री.गडकरी साहेबांनी इथेनॉलच्या संदर्भाने उल्लेख केला. साखर अतिरिक्त होते त्यावेळेला बफर स्टॉक करावयाचा असेल, अन्य ठिकाणी इंधन म्हणून इथेनॉल वापरले जात असेल तर त्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांच्या स्तरावर एक बैठक घेऊन त्यामध्ये साखर संघाचे लोक, केंद्रीय पेट्रोलियम मंत्री आणि आपण, अशी बैठक घेऊन इथेनॉलचा वापर कसा केला पाहिजे याबाबतची भूमिका घेतली जाईल, निर्णय घेतला जाईल.

उपसभापती : आता अल्पकालीन चर्चा संपलेली आहे.

सभा□ह्यापुढील □म□ज संपलेले आहे. सभा□ह्याची बैठ□ आता स्थ□□ होऊ□ परवा, बुधवार, दि□□ 28 मार्च 2007 रोजी स□ळी 10-00 वाजता पु□ भरेल.

बुधवार दिनांक 28 मार्च 2007 रोजी सकाळी 10-00 ते 12-30 पर्यन्त विशेष बैठक होईल व त्यामध्ये अर्थसंकल्पावर चर्चा करण्यात येईल. त्यानंतर सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1-00 वाजता सुरू हाईल. आजच्या कामकाजपत्रिकेवरील लक्षवेधी सूचना, तसेच 93 च्या सूचनेवरील निवेदने 28 मार्च रोजी घेण्यात येतील. तसेच 12 कोटीच्या संदर्भातील निवेदन माझ्याकडे आलेले आहे तेही निवेदन 28 तारखेला करण्यात येईल.

(सभा□ह्याची बैठ□ सायंकाळी 6 वाजू□22 मि□□टां□□, बुधवार, दि□□ 28 मार्च 2007 च्या स□ळी 10-00 वाजेपर्य□त स्थ□□ झाली)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही